

इतिहास विचार तरंग

प्रा. हि. के. देशपांडे

इतिहास विचार तरंग

लेखक

प्रा. दि. के. देशपांडे, एम.ए.
प्रताप कॉलेज, अमळनेर

विक्रेते : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३०

प्रकाशक :
प्रा. दि. के. देशपांडे
वैद्य बंगला, टिळक रोड
न्यू प्लॉट्स एरिया
अमळनेर, जि. जळगाव

प्रथमावृत्ति :
चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८९६
(दिनांक २४ मार्च १९७४)

किंमत आठ रुपये

मुखपृष्ठ :
सुधाकर खाजगीवाले

मुद्रक :
मु. शं. दाते
यशवंत मुद्रणालय,
१८३५ सदाशिव पेठ, पुणे ३०

ई/323

ती. माईस

जीवनात मिळालेले थोडेफार यश

केवळ तुझ्या प्रोत्साहनाचे व आशीर्वादाचे फळ आहे.

आभार

हा लेखसंग्रह प्रसिद्ध करताना मला अनेकांचे साहाय्य झालेले आहे. यातील काही लेख पूर्वी विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. लेखप्रसिद्धीबद्दल प्रथमतः संबंधित संपादकांचे आभार मानले पाहिजेत. त्यांचेपैकी कित्येकांनी हे लेख आवर्जून लिहून घेतले होते. त्यांची या वेळी मला विशेषत्वाने आठवण होते.

गु. प्रा. ग. ह. खरे यांचे आभार मानणे औपचारिक ठरेल. त्यांचेशी अनेक विषयांबाबत चर्चा केली आहे व ती मला उपयुक्त वाटलेली आहे. त्यांनी मला लेखसंग्रहाच्या प्रसिद्धीबाबतही प्रोत्साहन दिलेले आहे. मी त्यांचा ऋणी आहे.

डॉ. ना. र. इनामदार व प्रा. प्र. ग. कुलकर्णी या दोन मित्रांनी या पुस्तकाबाबत अनेक सूचना केल्या. माझे थोरले बंधु ती. द. के. देशपांडे व ती. म. के. देशपांडे यांनीही पुस्तकाच्या प्रकाशनाबाबत लक्ष घालून मदत केली.

श्री. य. गो. कानेटकर यांनी मुद्रणप्रत तयार करून दिली.

'काळ' चे संपादक श्री. शं रा. दाते व त्यांचे चिरंजीव श्री. मुकुंदराव दाते यांनी पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनाप्रमाणेच याही पुस्तकास जरूर ते

सर्व सहकार्य दिले. पुस्तक प्रकाशनाबाबत आज अत्यंत प्रतिकूल परिस्थिति असतानाही श्री. मामासाहेब दाते यांचे आपुलकीमुळेच मी हे धाडस करीत आहे.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचे चालक श्री. अनंतराव कुलकर्णी व श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी माझ्या पुस्तकाची विक्री-वाटपाची जबाबदारी आपुलकीने उचलून माझा भार हलका केला आहे. श्री. सुधाकर खाजगीवाले यांनी सुन्दर व आकर्षक मुखपृष्ठ तयार करून पुस्तकाची शोभा वाढविली आहे. मुखपृष्ठ मुद्रणातही त्यांनी साहाय्य केले.

वर उल्लेख केलेल्या सर्व सद्गृहस्थांचे व उल्लेख न केलेल्या अन्य मदत–निसांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

प्रताप कॉलेज, अमळनेर जि. जळगाव
दि. १४ जानेवारी १९७४
मकरसंक्रमण शके १८९५

दि. के. देशपांडे

अनुक्रमणिका

प्रास्ताविक

'रणजितसिंगकालीन काश्मीर व पंजाब' (बारोन ह्यूगोलचे प्रवासवृत्त) हे पुस्तक प्रसिद्ध केल्यानंतर १६-१७ वर्षांनी हे दुसरे पुस्तक मी प्रसिद्ध करीत आहे. पहिल्या पुस्तकाला पुणे विद्यापीठाने रुपये ५०० पुरस्कार दिला, काही बक्षिसेही मिळाली, अनेक इतिहासतज्ज्ञांनी व साहित्यिकांनी त्यावर उत्तम अभिप्राय दिले. दोन मराठी मासिकांनी त्यावर दीर्घ लेख (त्यांपैकी एकाने विशेषांक काढून) प्रसिद्ध केले. पहिल्या पुस्तकाने मला खूपच नावलौकिक मिळवून दिला हे मान्य केले पाहिजे.

आज दुसरे पुस्तक, मी पूर्वी प्रसिद्ध केलेल्या व काही अप्रसिद्ध अशा ऐतिहासिक निबंधांचा व लेखांचा संग्रह आहे. हे लेख विविध काळात लिहिलेले, विविध ठिकाणी विखुरलेले होते. सर्व नियतकालिकें सर्वांना सहजसाध्य असत नाहीत, हे लक्षात घेऊन हे लेख एकत्रित प्रसिद्ध करीत आहे. या वर्षी शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाला तीनशे वर्षें पुरी होत आहेत. या निमित्ताने शिवाजीसंबंधीही काही लिखाण या ग्रंथात प्रसिद्ध करण्यात मला समाधान वाटत आहे.

'इतिहासाच्या अभ्यासाचे महत्त्व' हा निबंध मी प्रथम विद्यार्थ्यांसाठी लिहिला. परंतु समाजात इतर विषयांतील तज्ज्ञदेखील, 'इतिहासाचा समाजाला उपयोग काय ?' असा प्रश्न विचारताना आढळतात. इतिहास हा समाजाच्या ज्ञानाचा व संस्कृतीचा ठेवा आहे. त्याचे महत्त्व सर्वसामान्य वाचकांचे पुढे

मांडावे असे मला वाटते. महाराष्ट्रात इतिहास-संशोधनाला व अभ्यासाला सुरुवात झाली, त्याला जवळ जवळ एक शतक पुरे होत आले आहे. या काळात महाराष्ट्रात कोणी कोणी, कसकसे प्रयत्न केले व इतिहास-संशोधनाचे फलित काय, हे स्थूलरूपाने दाखविण्याचा प्रयत्न 'मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाचे स्वरूप' या लेखात केला आहे. हा आढावा अधिक सविस्तर व सर्व संशोधकांचे कार्य विस्ताराने सांगणारा असा करावयाचा तर ते काम एका प्रबंधाचे होईल. ते करणे जेव्हा जमेल तेव्हा जमो; आज या कार्याची रूपरेषा जनतेपुढे ठेवीत आहे. ही वानगी आहे. या दृष्टीनेच या लेखाकडे पहावे असे मुद्दाम सांगितले पाहिजे.

लेखांपैकी '१८५७ चा उठाव' हा लेख स्वातंत्र्यशताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने लिहिला. १८५७ च्या उठावाला स्वातंत्र्य युद्ध किंवा शिपायांचे बंड न म्हणता इंग्रजांविरुद्धचा उठाव म्हणून या घटनेला संबोधावे असे मी त्या लेखात सविस्तरपणे चर्चा करून, मत मांडले आहे. या लेखामुळे काहींचा गैरसमज होण्याची शक्यता दिसली. त्या उठावात भाग घेणाऱ्या हुतात्म्यांसंबंधी माझ्या मनात आदर नाही असा गैरसमज निर्माण झाल्याचे लक्षात आले. तेव्हा पुनः संधि मिळताच मी '१८५७ च्या उठावाची मीमांसा व फलश्रुति' हा लेख लिहून या उठावाने समाजाला काय मिळवून दिले व काय साधले यावर चर्चा केली. इतिहासातील घटनांकडे अंधळेपणाने, भाव-विवशतेने न पाहता, वस्तुनिष्ठ दृष्टीने पहावे असे मला वाटते. म्हणून मी १८५७ वर गुणदोषात्मक चर्चा केली आहे. मी येथे मांडलेले विचार चर्चेसाठी जनतेपुढे ठेवीत आहे. इतिहासातील महत्त्वाच्या घटनांवर अनेकांनी अनेक तऱ्हेने प्रकाशझोत टाकल्यावरच सर्व सत्य साकार होते, हे ध्यानात घेऊन हा एक प्रकाशझोत ह्या घटनेवर टाकला आहे. माझी या विषयीची भूमिका मी साररूपाने पुढे मांडली आहे. यावर चर्चा व्हावी, तीही वस्तुनिष्ठ दृष्टीने व सत्यान्वेषणाच्या बुद्धीने व्हावी अशी अपेक्षा आहे.

इतिहासात होऊन गेलेल्या व्यक्तींवर अन्याय होऊ नये हे जितके खरे तितकेच त्यांचे मूळ स्वरूप पालटून त्यांना आपणाला आवडेल व लोकांना रुचेल अशा वेषात व शब्दांत मांडू नये हेही खरे आहे. तसे केल्यास त्यात इतिहासाचा विपर्यास होतो. ललित साहित्यिकांना ऐतिहासिक व्यक्तींच्या-

बद्दल काल्पनिक चित्र रंगविण्याला थोडा वाव देता येईल. कारण बोलून चालून ती ललित कृतीच असते, इतिहास नव्हे. लोकांच्या आवडीसंबंधीची एक आठवण सांगण्यासारखी आहे. खानदेशातील एका गावी एका फारसी शिलालेखाचा ठसा घेण्यासाठी प्रा. ग. ह. खरे यांचे बरोबर मी गेलो होतो. प्रा. खरे ठसा घेण्याचे काम करीत असता, अनेकांनी मला हा शिलालेख शिवाजी महाराजांचा आहे काय ? अशी पृच्छा केली. तो तसा नसल्यामुळे नास्तिपक्षी उत्तर देणे भागच होते. परंतु शिलालेखाचा शिवाजीराजांशी संबंध नाही असे म्हणताच, लोक जी नाराजी व्यक्त करीत ती पाहण्याजोगी होती. आपल्या गावाचा व शिवाजीचा संबंध जोडावा ही त्यांची इच्छा इतिहास होईल काय ? इतिहास हा सत्यानेच जखडलेला असला पाहिजे. हे केव्हाही दृष्टीआड करता येणार नाही.

काही जुने फारसी ग्रंथ मान्यवर आहेत. त्यांची इंग्रजी रूपांतरे वाचीत असता, अहमदाबादच्या १७१४ च्या दंग्याची हकीकत पहावयास मिळाली. हिंदु मुसलमानांत दंगे ही भारतामधील गेल्या पाऊणशे वर्षांतील समस्या आहे असे मानले जाते. या विषयाचा मूलग्राही विचार करावयाचा तर पूर्वीपासून या दोन समाजांतील अन्योन्यसंबंध तपासले पाहिजेत. या दृष्टीने ब्रिटिश-पूर्व काळातील १७१४ च्या दंग्याची हकीकत वाचकांस मोठी उद्‌बोधक वाटेल. सविस्तर निबंध भा. इ. सं. मंडळात, त्रैमासिकात प्रसिद्धीसाठी ठेवून घेतलेला आहे. त्याचा हा सारांश वाचकांपुढे ठेवला आहे. हा निबंध १९७० च्या भा. इ. सं. मंडळाच्या वार्षिक संमेलनात मी वाचला. त्याचे वृत्त एका तरुण पत्रकाराने 'तरुण भारत' मध्ये प्रसिद्ध केले. त्याचे इंग्रजी भाषांतर महाराष्ट्रातील पत्रकारमहर्षि श्री. ग. वि. केतकर यांनी 'इंडियन एक्स्प्रेस' व अन्य काही इंग्रजी नियतकालिकांतून प्रसिद्ध केले. पुणे, मुंबई व नागपूर येथील काही दैनिकांनी या माहितीचे पुनर्मुद्रण केल्याचे काही मित्रांकडून कळाले. सर्व काही मला पहावयास मिळाले नाही. परंतु हा विषय समाजात जिव्हाळ्याचा आहे हे यावरून लक्षात आले. म्हणून निबंधाचा हा अधिकृत सारांश मी येथे प्रसिद्ध करीत आहे. संपूर्ण निबंध योग येईल तेव्हा प्रसिद्ध होईल.

महाराष्ट्रातील इतिहासाभ्यासकांतील रियासतकार डॉ. गो. स. सरदेसाई सर्वांना परिचित आहेत. परंतु बृहन्महाराष्ट्रातील इतिहास-संशोधक व प्राच्य विद्येचे प्रकांडपंडित डॉ. अ. स. आळतेकर यांचा परिचय फार थोड्यांना आहे. त्यांचे सर्व लेखन व संशोधन इंग्रजी भाषेत व महाराष्ट्राबाहेर झाले याचा हा परिणाम आहे. डॉ. आळतेकरांचा व त्यांच्या ग्रंथसंपत्तीचा ओझरता उल्लेख या दृष्टीने लेखरूपाने करून देत आहे. डॉ. आळतेकरांचे सर्व इंग्रजी ग्रंथ मराठीत येणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील विद्यापीठे व महाराष्ट्र सरकारचे 'साहित्य व संस्कृति मंडळ' यांनी हे काम हाती घ्यावे. मराठीतूनच अभ्यास करणाऱ्या सध्याच्या व पुढच्या पिढ्यांना हे ग्रंथ वाचावयास मिळाले पाहिजेत. त्यांच्या बहुतेक ग्रंथांच्या हिंदी आवृत्ति प्रसिद्ध झाल्या आहेत, हे मुद्दाम लक्षात आणून द्यावेसे वाटते. पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही या बाबीकडे मला संबंधितांचे लक्ष वेधावेसे वाटते.

या निवडलेल्या बहुतेक निबंधांची बैठक वैचारिक आहे. निबंधांच्या वर्ण्य विषयांचा ऊहापोह करीत असताना इतिहासाचा शास्त्रीय दृष्टिकोन व इतिहासपद्धति कोठेही सोडलेली नाही. काही ठिकाणी क्वचित् मतभेद संभवेल, काही ठिकाणी चर्चा करावीशी वाटेल. हे सर्व होण्यासही हरकत नाही. फक्त पद्धत व मार्ग इतिहासाच्या कसोटीवर उतरावेत म्हणजे झाले. कोणत्याही विधानाबाबत किंवा विचाराबाबत माझा आग्रही दृष्टिकोन नाही. मला जे वाटले, पटले, ते मी पुढे मांडले आहे. यात जरूर पडल्यास बदल करण्यास मला काहीही संकोच वाटणार नाही. पुस्तक प्रकाशनाच्यावेळी निबंधांच्या मूळच्या स्वरूपात जरूर तेथे थोडासा बदल केलेला आहे.

* * *

१

इतिहासाच्या अभ्यासाचे स्वरूप व महत्त्व

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इतिहास व इतिहासाभ्यास यावरची लोकांची श्रद्धा हळुहळू कमी कमी होत आहे असे दिसते. स्वातंत्र्यापूर्वी इतिहास-लेखन व इतिहास-संशोधन हा देशभक्तीचा एक भाग गणला जाई. आपले पूर्वज फार मोठे होते, त्यांच्या अगी फार कर्तृत्व होते, परंतु पारतंत्र्यामुळे हे कर्तृत्व वाया जात आहे असे प्रतिपादन होत गेल्याने व आरंभीचें इतिहास-संशोधन आपला मोठेपणा गाण्याच्या वृत्तीतून निर्माण झाल्याने आता इतिहासावरची लोकांची दृष्टि इतर प्रश्नांकडे वळत आहे. आम्ही प्राचीन काळात साम्राज्ये स्थापिली व ती दैववशात् नामशेष पावली या एकांगी इतिहास-संशोधनाचा हा दुष्परिणाम आहे. उपयुक्ततेच्या दृष्टीने बघितले तर साम्राज्य मिळविण्याच्या मीमांसे-पेक्षा साम्राज्य व स्वराज्य कां नष्ट झाले याची मीमांसा आता आपण केली पाहिजे. पूर्वीच्या चुकांचे नीट मनन करून त्या पुन्हा होणार नाहीत या दृष्टीने या इतिहासाकडे बघितले पाहिजे. आपले स्वराज्य गेले व इंग्रजांचे साम्राज्य येथे स्थापन झाले यात आपल्या ऱ्हासाची कारणे असतील ती हुडकून काढून त्यांचा आपण विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे इंग्रजांचा वरचढपणा

प्रसिद्धि : ‘ परशुरामियन् ’ पुणे, जानेवारी १९५५

होण्यास जे गुण कारणीभूत झाले, तेही आपण अभ्यासले पाहिजेत. या सर्व गोष्टींची निःपक्षपातीपणाने पाहणी करण्याची वेळ आता आली आहे.

इतिहासाभ्यासाचा समाज व व्यक्ति या दोघांनाही फायदा होतो. इतिहासाचा उपयोग केल्यामुळे समाजाचा झालेला फायदा व इतिहासाकडे दुर्लक्ष केल्याने समाजाचा झालेला तोटा या दोन्ही गोष्टींची उदाहरणे इंग्लंडच्या इतिहासात सापडतात व त्यावरून इतिहासाचे महत्त्व चटकन ध्यानात येतें. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यन्त इंग्लंडचे अमेरिकेतील वसाहतीशी वागण्याचे धोरण, म्हणजे त्यांच्यापासून जास्तीत जास्त फायदा मिळविण्याचे असे. आर्थिक दृष्ट्या मायदेशाकडून अमेरिकेतील वसाहतींची पिळवणूकच होत होती. सामाजिक दृष्ट्या त्यांना मायदेशातील नागरिकांपेक्षा वेगळे व थोडे कमी दर्जाचे लेखले जाई. इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये आम्हांस प्रतिनिधित्व द्या ही त्यांची मागणी अवहेलना करून फेटाळण्यात आली. या धोरणाचा परिणाम पुढे अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात झाला व अमेरिका मायदेशाला कायमची पारखी झाली. या घटनेची चिकित्सा इंग्लंडमधील इतिहास-अभ्यासकांनी केली व यापुढे इतर वसाहतींना समानतेने न वागविले तर त्या हातच्या जाण्याची धास्ती आहे असा निष्कर्ष काढला. राजकारणी लोकांनी ही मीमांसा नीट ध्यानात घेऊन इतर वसाहतींना हळुहळू 'स्वायत्तता' दिली. याचा सुपरिणाम म्हणजे दोन महायुद्धांत या वसाहती इंग्लंडच्या संरक्षणासाठी शेवटपर्यन्त लढत राहिल्या व त्यांनी संकटकाळी इंग्लंडला सर्व तऱ्हेची मदत केली.

इंग्लंडमधील विचारवंतांनी व इतिहास-संशोधकांनी रोमन साम्राज्य व राजनीति यांचा विशेष अभ्यास केला आहे. गिबन या इतिहास-संशोधकाने १६ खंडांत ' रोमन साम्राज्याचा ऱ्हास व विनाश ' यावर विवेचन केले आहे. स्वतःचा मायदेश धोक्यात आल्यावर शांतपणे दूरचे साम्राज्य सोडून देऊन भलेपणा घ्यावा व ' घर ' नीट राखावे ही रोमन लोकांची राजनीति इंग्लंडने हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊन व शांतपणे हा देश सोडून निर्गमन केल्यावरून आत्मसात् केल्याचे दिसून येते. जगाच्या इतिहासात न लढता साम्राज्य सोडल्याची ही दोनच ठळक उदाहरणे आहेत. असे साम्राज्य आपण होऊन न सोडता बळजबरीने येथे राहण्याचा निर्णय जर इंग्रजांनी घेतला असता तर त्यांचे साम्राज्य जातेच, परंतु जगातील पत, सहकार्य व प्रेम या

सर्वांना मुकावे लागले असते. त्याचप्रमाणे अब्जावधि रुपयांची त्यांची येथील मालमत्ताही नष्ट झाली असती. इतिहासाचा सखोल अभ्यास केलेला समाज योग्य निर्णय योग्य काळी घेण्यास कसा पात्र होतो हे यावरून उघड होते.

याउलट इतिहासाशी संबंध नसलेले लोक जर राज्यावर आले तर काय अनर्थ होतात याचे उदाहरण गेल्या महायुद्धापूर्वी इंग्लंडात घडले. इंग्लंडचे त्या वेळचे पंतप्रधान सर नेव्हिल चेंबरलेन व जर्मनीतील इंग्लंडचा वकील सर नेव्हिल हेंडरसन या दोघांना इतिहासाचे वावडे होते. जर्मन देश व युरोपचे राजकारण यांचा त्यांनी कधी अभ्यास केला नव्हता. त्यामुळे हिटलरचे डावपेच व भुलावणी त्यांना कधी आकलनच झाली नाही. १९३७ ते १९३९ या महत्त्वाच्या वेळी जर्मनीत असलेल्या या वकिलांनी "एवढे दिले तर हिटलर गप्प बसेल; यावरचा हक्क मान्य केला तर जर्मन लोक शांत होतील" असा सल्ला पंतप्रधानांना देऊन एकामागून एक सवलती हिटलरला दिल्या व त्याची युद्धाची तयारी पूर्ण होऊ दिली. त्यांनी फ्रेडरिक दि ग्रेट, बिस्मार्क, कैसर इत्यादींचा थोडा जरी अभ्यास केला असता तरी ही चूक या दोघांच्या हातून झाली नसती. इतिहासाचा अभिमानी, विरोधी पक्षातील चर्चिल हा त्या वेळी कंठरवाने सांगत होता. परंतु स्वतःचे धोरण चुकले हे कळून येण्यास या दोघांना वेळ लागला व इंग्लंडला त्याची जबर किंमत द्यावी लागली. सर हेंडरसननी "माझ्या अपयशाची मीमांसा" (The Failure of My Mission) या ग्रंथात ही गोष्ट मान्य केली आहे. इतिहासाची पुनरावृत्ति होते किंवा नाही यावर उलट सुलट मते व्यक्तविली जातात. जो समाज आपली व शेजाऱ्याची पूर्वस्थिति व चालू स्थिति नीट अवलोकन करतो तो इतिहासाची प्रतिकूल पुनरावृत्ति होऊ देत नाही. या उलट जो समाज इतिहासाचा कधी विचारच करीत नाही त्याला ते ते प्रश्न त्या त्या अडचणी पुन्हा पुन्हा नाडतात व त्यावर अचूक मार्गदर्शन न झाल्याने तेथे ही पुनरावृत्ति हटकून होते असे दिसते.

परंतु गतगोष्टींची मीमांसा येवढेच इतिहासाचे महत्त्व नव्हे. चालू राजकारण व परिस्थिति समजण्यासही इतिहास माहीत असणे अवश्य आहे. राजकारणात 'एकाकी,' 'कशाशीही संबंध नसलेली गोष्ट' बहुधा घडत नाही. प्रत्येक घटना व पाऊल पूर्वीच्या गोष्टीशी संबंधित असते. जर पूर्वीचा इतिहास

माहीत नसेल तर चालू राजकारण व घटना यांचे आकलन कोणालाही होणार नाही. लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांना चालू राजकारण समजले पाहिजे असा दंडक आहे. तेव्हा हे राजकारण समजण्यासाठी सर्वांना पूर्वेतिहास माहीत करून देऊन लोकांच्या विचारांची बैठक पक्की करावी हे क्रमप्राप्त ठरते.

समाजाला काय किंवा व्यक्तीला काय इतिहासामुळे ज्ञानाचा व अनुभवाचा एक मोठा साठा अनायासे मिळत असतो. प्रत्येक व्यक्तीच्या किंवा एखाद्या समाजाच्या एका विशिष्ट कालखंडात सर्व घटना घडणे शक्य नसते. परंतु इतिहासामुळे पूर्वीच्या घटनांचे भांडार व अनुभव व्यक्तीच्या व समाजाच्यापुढे आपोआप उभे राहतात. लोकसत्तेने 'अधिक कडकपणाचे' (प्युरिटन) तत्त्व अंगीकारले तर लोक पुन्हा राजसत्तेला आवाहन करतात. ही इंग्लंडमधील क्रॉमवेलच्या राज्यपद्धतीने सिद्ध केलेली घटना, वसाहतींना काहीही अधिकार न देता नुसते त्यांचे शोषण करीत राहिले तर एक दिवस त्या मायदेशाविरुद्ध युद्धाला उभ्या राहतात, हा अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाचा अनुभव, राजांनी प्रजेवर न सोसणारे कर लादले व जुलूम-जबरदस्ती लादली तर काय होते हे फ्रान्सच्या राज्यक्रान्तीने घालून दिलेले उदाहरण व अनिर्बन्ध जनहित-विरोधी सत्ता शेवटी नष्ट होऊन त्यातून साम्यवाद जन्माला येतो ही रशियाच्या राज्यक्रान्तीने पटवून दिलेली घटना या सर्व गोष्टी इतिहासाच्या अभ्यासा-मुळेच आज जगापुढे आहेत. ज्यांना जें उदाहरण व जी घटना उपयुक्त असेल, त्यावर त्यांनी विचार करावा. विचारी समाजाला निदान ही संकटपरंपरा माहीत होऊन तो याची पुनरावृत्ति आपल्या राष्ट्रात होऊ देणार नाही. पूर्वीच्या अनुभवाने मनुष्य शहाणा होतो. पुन्हा त्याला अडचण येते. त्यातून मार्ग काढावा तर नवीनच प्रश्न उपस्थित होतात. हे सर्व खरे असले तरी सोडविलेले प्रश्न व अडचणी त्याला इतिहासामुळे माहीत होतात ही गोष्ट विसरता येत नाही. नाहीतर प्रत्येक व्यक्तीला आपला गाव व शेजारचा प्रदेश यांचे आकलन होत असतानाच त्याचा जन्म जावयाचा व पुढच्या पिढीला पुन्हा तेच प्रश्न व त्याच अडचणी येऊन पुन्हा अंधारात चाचपडत मार्गक्रमण करावयाचा प्रयत्न करणे एवढीच गोष्ट शक्य आहे. इतिहासाभावी सर्व समाज व व्यक्ति घाण्याला

जुंपलेल्या बैलाप्रमाणे आहेत त्या ठिकाणीच फिरून फिरून येतील. त्यांची प्रगति अशी व्हावयाची नाही.

इतिहासामुळे पूर्वीच्या घटना व आजच्या घटना यांचे दुवे जोडले जातात. कंदमुळे व फळे खाणारा वन्य मानव आजच्या प्रगतीला येऊ शकला याचे मुख्य कारण त्याला पूर्वीच्या अनुभवाने दिलेली साथ ही होय. एरवी मानवाच्या प्रगतीची परंपरा सतत टिकणे व वाढणे केवळ अशक्य आहे. 'राज्यशासना'च्या इतिहासाकडे पाहिल्यास जगातील समाज अनेक स्थित्यंतरांतून गेले आहेत. राजसत्ता; पंडितांच्या हातांत दिलेली सत्ता; मर्यादित लोकसत्ता; अनियंत्रित एकसत्ता; साम्यवादी सत्ता; व संपूर्ण लोकशाही असे अनेक मार्ग मानवाने चोखाळून पाहिले व पहात आहे. पूर्व घटनांच्या अभ्यासाने त्याला चांगले व वाईट याची निवड करण्याची शक्ति येते व आलेल्या अडचणीस यशस्वी रितीने तोंड देता येते. इतिहासाचा उपयोग व अनुभव केवळ राजकीय घटनांनाच उपयुक्त आहे असे मुळीच नाही. सातत्याची परंपरा टिकविणे ही इतिहासाची परंपरा, सर्व शास्त्रें, तत्त्वज्ञाने, धर्म व वाङ्मय यांना लागू आहे. किंबहुना प्रत्येक शास्त्र व वाङ्मय याला इतिहास आहे आणि या इतिहासावाचून त्या शास्त्राचा अभ्यास परिपूर्ण होतच नाही. रसायनशास्त्रात एखाद्याने केलेले प्रयोग, वापरलेली साधने व त्याचा पडताळा या गोष्टी लिहून प्रसिद्ध न केल्यास पुढच्या व्यक्तीला ते सर्व प्रयोग पुन्हा करावे लागतील. परंतु त्याच गोष्टी एकदा सिद्ध झाल्या की, पुढच्या पिढीचे काम त्या समजून घेऊन, नवीन प्रयोग करण्याच्या मार्गावर लागावयाचे एवढेच राहते.

इतिहासाचा आणखी एक उपयोग राजकारणी धुरंधर नेहमी करून घेतात. शेजारी किंवा इतर कोठलेही राष्ट्र याच्याशी झगडा सुरू झाल्यास त्या देशाविरुद्ध लोकमत निर्माण करावयास ते इतिहासाला राबवून घेतात. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष लढाईचे वेळी देखील सैनिकांना स्फूर्ति निर्माण करण्यास इतिहासातील घटनांचा भरपूर उपयोग केला जातो. लोकांच्या भावना चेतविण्यास इतिहासासारखे दुसरे साधन नाही. काही वेळा क्षणिक भावना उद्दीपित करून राष्ट्राचे अंतिम व दीर्घकालीन हित राज्यकर्त्यांना पहावे लागते. राष्ट्रवादासाठी इतिहासाचा असा उपयोग करावा की नाही

हा विचाराचा प्रश्न आहे. परंतु एका पक्षाने असे केल्यास, विशेषतः युद्ध-काळात प्रतिपक्ष्याला त्याच शस्त्राचा वापर करण्यावाचून गत्यंतर रहात नाही. इतिहासातील घटनांचा हा असा गैरवापर काही इतिहासज्ञांना मान्य नसला तरी हा केला जातो ही वस्तुस्थिति नाकारता येत नाही.

अलीकडे भौतिक शास्त्रांची चलती होत आहे. या शास्त्रांचा अभ्यास करणारांना भरपूर वाव असल्याने इतर विषयांकडे तुच्छतेने पाहण्याची अनिष्ट प्रवृत्ति यातून निर्माण झाली आहे. त्यांच्या मतें इतिहासाचा अभ्यास अनाठायी व कालापव्यय करणारा आहे. ही विचारसरणी मूलतः चुकीची आहे. इतिहासामुळे समाज समजतो व त्याचे प्रश्न सोडविणे शक्य होते ही गोष्ट हे लोक विसरतात. भौतिक शास्त्रे व इतिहास यांच्या अभ्यासाचे प्रकार व महत्त्व वेगवेगळे आहे. भौतिक शास्त्रे मानवाच्या सुखासाठी काही गोष्टी निर्माण करतात व त्याच वेळी मानवाचे आयुष्य दुःखी करणाऱ्या समस्या निर्माण करून ठेवतात. या समस्या सोडवणे आमचे काम नाही म्हणून अंग झाडून ते यांतून मोकळे होतात. भौतिक शास्त्रांच्या वाढीने निर्माण झालेल्या समस्या समाजशास्त्रांचा, विशेषतः इतिहासाचा, अभ्यास करूनच सुटू शकतील. भौतिक शास्त्रे ही एक शक्ति आहे. या शक्तीला आवर घालून त्याचा सदुपयोग करून घेण्याचे काम समाजशास्त्रांचे आहे.

एका दृष्टीने इतिहास-संशोधन म्हणजे काळाशी झगडा आहे. असेल ते नष्ट करावयाचे व त्याची स्मृतीही मागे राहू द्यावयाची नाही हा काळाचा धर्म आहे. या नष्ट झालेल्या व होऊ घातलेल्या स्मृतींना उजळा देणे, विस्मर-णाच्या खोल डोहात बुडालेली सत्याची माणके वर काढून त्यांचे दर्शन समाजाला घडविणे व समाज-घटकांचे सातत्य टिकविण्याचा प्रयत्न करणे हे इतिहास-संशोधनाचे काम आहे. स्मृति आणि विस्मृति यांच्या झगड्यात इतिहासामुळेच स्मृतीचा विजय होतो. इतिहास-संशोधनाच्या अभावी सर्व व्यक्ति व समाज यांना 'मी कोण' 'तू कोण' या प्राथमिक गोष्टीविषयीचे अज्ञान असल्यावर ध्येय असणे व गांठणे सुतराम् अशक्य आहे.

इतिहासाध्ययनाचा व्यक्ति-जीवनातही असाच उपयोग आहे. किंबहुना इतिहासाभ्यासाइतका दुसऱ्या कोणत्याही विषयाचा जीवनावर परिणाम होत नाही. इतिहासामुळे व्यक्तीला राजकारणाची गोडी लागते व ते समजते.

जगातील सर्व नामवंत राजकारणी व राज्यशास्त्रज्ञ हे इतिहासाचे गाढे अभ्यासू होते व आहेत हे विसरून चालणार नाही. पूर्वापारसंबंध माहीत असल्यामुळे इतिसाभ्यासकाला वस्तुस्थितीचे आकलन होते. अंगीकृत कार्य पार पाडण्याची सवय जडते व दुर्दैवाने अपयश आल्यास ते पचविण्याची सवय होते. वस्तुस्थिति माहीत असल्याने इतिहासाभ्यासकाला कोणत्याही गोष्टीची भ्रांति रहात नाही. इतिहासाभ्यासाने जुने वाङमय समजते व भाषा जोमदार बनते. अनुभवी व जाणत्या इतिहासकाराने चांगल्या शैलीने लिहिलेला इतिहास हा पुढे वाङमयातील एक दालन होऊन बसते.

इतिहासाचे वाचन व मनन ही एक उच्च दर्जाची करमणूक आहे. लहानापासून थोरापर्यंत सर्वांना गोष्टीची आवड असते हे आपण पहातोच. इतिहास हा गोष्टींचाच एक प्रकार असल्याने त्याचे वाचन सर्वांना आवडते. या करमणुकीपासून कोणतीही वाईट संवय लागण्याची भीति नाही. त्याचप्रमाणे या वाचनाचा मनावर परिणाम होऊन विकार उत्पन्न होण्याची धास्ती नसते. पूर्वीच्या परिस्थितीत त्या वेळच्या व्यक्तींनी केलेले कार्य योग्य की अयोग्य याचा निर्णय इतिहासकाराला घ्यावा लागत असल्याने श्रेष्ठ इतिहासकार एक चांगला न्यायाधीशही असतो. बारकाव्याने पाहण्याची सवय लागल्याने, इतिहासकार प्रत्येक गोष्टीचे मर्म जाणू शकतो.

आपण प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या कारणांनी सतत प्रवास करीत असतो. प्रवासाचा वेळ बहुतेकांना कंटाळवाणा होतो. परंतु इतिहासाभ्यासकाला प्रवासाचा कंटाळा कधीच जाणवत नाही. इतिहासाच्या ज्ञानाने प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची एक नवीन दृष्टि त्याला प्राप्त होते. आपण ज्या प्रदेशातून जात आहोत त्या प्रदेशात इतिहासकाली एखादी महत्त्वाची घटना घडली असल्यास आपणांस तेथे एक प्रकारचा अभिमान वाटू लागतो. आपले मन इतिहासाच्या त्या जुन्या काळात रममाण होऊन आपण देहभान विसरून जातो. अशा प्रकारचा आनंद माणसाला दुसऱ्या कशानेही होणे शक्य नाही. सिंहगडावर काहीही पाहण्यासारखे नसताना तेथे जी गर्दी होते याचे मुख्य कारण आज न दिसणाऱ्या परंतु पूर्वी अस्तित्वात असलेल्या गोष्टी मनुष्य अंतश्चक्षूने पाहू शकतो व त्या काळाशी समरस होतो. पडके किल्ले, जुन्या गढ्या, जीर्ण मंदिरे, नष्ट झालेली नगरे ही पाहूनही तो या नवीन प्राप्त

झालेल्या दृष्टीमुळे आनंद मिळवू शकतो. मोडकळीस मिळालेल्या 'उज्जयिनी' नगरीचे सुरस वर्णन कै. वा. वा. खरे यांनी कवितेत करून जे एक चित्र डोळ्यांपुढे उभे केले ते या ज्ञानामुळेच. जवळपासच्या वस्तूचे विषयी दिसतो त्यापेक्षा फार खोल अर्थ, व प्रत्येक प्रवास ज्ञानदायी व सुखकर करण्याची कला मनुष्याला इतिहासाभ्यासामुळे आत्मगत करता येते.

इतिहासाभ्यासामुळे मनोरंजन व ज्ञान या दोन्ही गोष्टी एकसमयावच्छेदेकरून प्राप्त करून घेता येतात. इतर विषयांत जेथे ज्ञान आहे तेथे निरसता व जेथे करमणूक आढळते त्या ठिकाणी ज्ञानाचा अभाव आढळतो. चांगला वेळ जाण्याला इतिहासाचे वाचन किंवा ऐतिहासिक गोष्टीवरील चर्चा यांसारखे उत्तम साधन नाही. 'काव्यशास्त्रविनोद' या तिन्हींचा उत्तम मिलाफ म्हणजे इतिहास होय. इंग्लंडमधील एक नामवंत पंडित बेकन याने सर्व शास्त्रांचे सार थोडक्यात खालीलप्रमाणे सांगितले आहे. "काव्याने मनुष्याची करमणूक होते; गणिताने काटेकोरपणा येतो; तत्त्वज्ञानाने गांभीर्य येते; तर्कशास्त्राने वादविवादपटुत्व येते व इतिहासवाचनामुळे मनुष्य शहाणा बनतो."

* * *

२

मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाचें स्वरूप

हिंदुस्थानचा इतिहास हा या देशातील अनेक प्रान्तांतील लोकांच्या व जमातींच्या कर्तृत्वाने बनलेला आहे. या सर्वांत महाराष्ट्रातील लोकांनी आपल्या कर्तबगारीने व पराक्रमाने या इतिहासात विशेष कामगिरी केली आहे, हे सर्वश्रुतच आहे. हिंदुस्थानचा इतिहास बनविण्यात ज्याप्रमाणे मराठे आघाडीवर व प्रमुख होते त्याचप्रमाणे हिंदुस्थानच्या इतिहासाचे संशोधन करून शास्त्रशुद्ध इतिहासलेखन करण्याच्या कामगिरीतही मराठेच अग्रगण्य व प्रमुख आहेत हे विशेष होय. गेल्या ऐंशी वर्षांत महाराष्ट्रात इतिहासाविषयी दाखविली गेलेली जिज्ञासा, इतिहाससंशोधन शास्त्रशुद्ध पायावर उभारण्यासाठी केली गेलेली खटपट, त्यासाठी कित्येक पुरुषांनी सर्वस्वाचा त्याग करून केलेले परिश्रम व याविषयी महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेत झालेली जागृति याला भारताच्या इतर दुसऱ्या कोणत्याही भागात तोड आढळणार नाही. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास केल्यावाचून हिंदुस्थानचा इतिहास लिहिताच येणार नाही हे जाणून व महाराष्ट्रात इतिहाससंबंधी

प्रसिद्धि : 'परशुरामीय', पुणे; जानेवारी १९५६.
पुरवणी लेख (अप्रसिद्ध) लेखन नोव्हेंबर १९७३.

संशोधन होऊन जे प्रचंड साधनसाहित्य प्रसिद्ध झाले आहे त्याचा उपयोग करून घेण्यासाठी म्हणून बंगालमधील सर यदुनाथ सरकार, सुरेंद्रनाथ सेन, बानर्जी, सिन्हा, प्रतुल गुप्ता, इत्यादि मंडळी मुद्दाम मराठी भाषा शिकली व मराठ्यांच्यासंबंधी प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांचा उपयोग त्यांनी इतिहास-लेखनासाठी केला हा विशेष नमूद करण्यासारखा आहे.

इतिहासाचे लेखन व संशोधन यांचे स्वरूप अगदी वेगवेगळे असते. पाश्चात्य विद्वानांनी परिश्रमपूर्वक इतिहास-संशोधनाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून दिला आहे. इतिहास-लेखन हे फार पूर्वीच्या काळापासून चालत आलेले आहे. याच्या उलट इतिहासाचे शास्त्रशुद्ध संशोधन हा प्रकार अलीकडील व नवीन आहे. पूर्वीच्या इतिहासात अतिशयोक्ति, पाल्हाळ, विसंवादीपणा आणि बऱ्याच वेळा काल्पनिकपणाचा भागच विशेष असे. आख्यायिका, दन्तकथा, लोककथा यांचाही उपयोग पूर्वी इतिहासलेखनासाठी होत असे. परंतु संशोधनाची प्रगति झाल्यापासून इतिहासलेखनाला आता विशेष काटेकोरपणा व बारकावा प्राप्त झाला आहे. इतिहासाच्या संशोधनात पूर्वीची कागदपत्रे, पत्रांच्या नकला, फर्माने, कैफियती, महजरे, करीणे, सरकारी नोंदी इत्यादि गोष्टींची बारकाव्याने छाननी करून सत्यासत्याचा पडताळा पाहण्याची कला प्राप्त होते. संशोधनातून पूर्वीच्या इतिहास-लेखनातील दोषस्थळे उघड होतात, उणीवा भरून निघतात. सत्य घटनांना दुजोरा मिळून घटनांची निश्चितता करता येते. खरे बोलावयाचे म्हणजे इतिहास-संशोधनाच्या आधारावाचून निर्माण केलेला इतिहास परिपूर्ण व व्यवस्थित असूच शकत नाही. इतिहास संशोधनाला महत्त्व येण्याला या विशेष गोष्टी कारणीभूत आहेत. ज्या भागात व देशात व्यवस्थित व शास्त्रशुद्ध इतिहास संशोधन झाले आहे तेथे लिहिले गेलेले इतिहास व संशोधन होण्यापूर्वी प्रसिद्ध झालेले तेथील इतिहास बारकाव्याने तपासले म्हणजे इतिहास-संशोधनाचे महत्त्व स्पष्ट होते.

मराठ्यांचा इतिहास किंवा महाराष्ट्राचा इतिहास हा सतराव्या शतकाच्या सुरुवातीपासून विशेष प्रसिद्ध आहे. यापूर्वीचा महाराष्ट्राचा बराचसा इतिहास काहीसा अज्ञात आहे. सुदैवाने गेल्या ७५ वर्षांत पुराणवस्तु संशोधकांनी विशेष परिश्रमाने इसवी सनापूर्वीच्या काही ऐतिहासिक घटनांचे दुवे जुळवून आता निश्चित केले आहेत. डेक्कन कॉलेज, भारत इतिहास संशोधक

मंडळ, सरकारचे पुराण वस्तु संशोधन खाते, व या विषयाचे जिज्ञासू व तज्ज्ञ यांनी सोपारा (ठाणे जिल्हा), कऱ्हाड (उ. सातारा), ब्रह्मगिरी (कोल्हापूर जिल्हा), नाशिक, जोरवे (नाशिक जिल्हा), बहाळ (खानदेश) इत्यादि ठिकाणी उत्खनन करून बरीच सामग्री मिळविली. उत्खननात नाणी, मातीची भांडी, दगडी व धातूंची हत्यारे, जीवनोपयोगी संसारी वस्तु, मुलांची खेळणी, स्त्रियांचे दागिने, मणी, शिकारीची हत्यारे, घरे बांधण्याच्या विटा, प्रेते पुरण्याच्या पेट्या किंवा इतर साधने या वस्तु सापडल्या. या वस्तूंचे वर्गीकरण करून, वस्तु सापडलेल्या घरांचा अभ्यास करून, नाण्यांवरून व मातीच्या भांड्यांवरून कालगणना निश्चित करून इतिहासाचे दुवे सांधले जातात. रोमन नाणी व भांडी सापडल्यास त्या प्रदेशाचा रोमन लोकांशी केव्हातरी संबंध होता हे निश्चित करता येते. त्याचप्रमाणे प्राचीन काळी निरनिराळ्या ठिकाणी असणाऱ्या जमातींचे एकमेकांशी असलेले संबंध कळतात. महाराष्ट्रात सापडलेल्या वस्तूंवरून इसवी सनापूर्वी हजार वर्षांपर्यंत येथील संस्कृति जुनी होती हे ठरविता आलेले आहे.

यापुढचा इतिहास हा लेणी, मंदिरे, शिलालेख यांवरून निश्चित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. अजंठा, वेरुळ, कार्ले, भाजे, बेडसे, घारापुरी, कान्हेरी इत्यादि ठिकाणी असलेल्या लेणी व विहारांवरूनही या भागांतील इतिहासावर बराच प्रकाश पडला आहे. जैन, बौद्ध व ब्राह्मणी काळातील मूर्ति, स्तूप, शिलालेख व इतर कोरीव कामे यावरून इतिहासज्ञांना काही गोष्टी निश्चित करता आलेल्या आहेत. प्राचीन काळातील उत्खनन व नंतरच्या काळातील लेखांचें वाचन यांवरून इतिहासाचीं साखळी जुळविणे अतिशय कठीण काम आहे. या बाबतीत इंग्रज संशोधकांनी सुरुवात करून अतिशय मेहनत घेतली व इतिहासकाळातील बऱ्याच गोष्टी त्यांनी निश्चित केल्या, हे त्यांचे ऋण मान्य करावे लागेल. प्राचीन धर्मग्रंथांचा व समाजाचा अभ्यास, शिल्पशास्त्राचा अभ्यास, ब्राह्मी, खरोष्टी इत्यादि लिप्यांची माहिती करून घेणे; संस्कृत, अर्धमागधी, पाली इत्यादि भाषांवर प्रभुत्व मिळवून प्राचीन काळातील घटनांवर प्रकाश पाडण्याची अवघड परंतु अतिशय महत्त्वाची कामगिरी युरोपीय संशोधकांनी पार पाडली व म्हणूनच पूर्वी सर्वस्वी अज्ञात असलेल्या इतिहासाला आता काहीसे निश्चित

स्वरूप प्राप्त झाले आहे. या संशोधनविषयाचा काळ इसवी सनापूर्वीच्या तिसऱ्या शतकापासून, इसवी सनाच्या चौथ्या शतकापर्यन्त जातो. प्राचीन इतिहासाची साधने जमिनीच्या खाली तर या काळातील इतिहासाची साधने दगडा-खडकावर, डोंगरातील लेण्यांत साठविलेली आहेत. त्याचप्रमाणे या काळातील राजघराण्यांविषयी व लोकस्थितीविषयी बरीचशी माहिती बौद्ध व जैन यांचे संस्कृत व प्राकृत धर्मग्रंथ, हिंदूंची पुराणे, ब्राह्मणे, आरण्यके, व इतर वाङमय यांतूनही मिळते. महाराष्ट्रातील सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, कदंब, शिलाहार, यादव इत्यादि राजघराण्यांविषयी आता बरेचसे संशोधन झालेले आहे. यांतील काही घराणी ख्रिस्तपूर्वकालीन तर शेवटची बाराव्या, तेराव्या शतकांतील आहेत. व्हिन्सेंट स्मिथ, डॉ. भांडारकर, चिंतामणराव वैद्य, विमलचरण लॉ ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर, म. म. मिराशी इत्यादि संशोधकांनी या कालासंबंधी अभ्यास करून बऱ्याच गोष्टी उजेडांत आणल्या आहेत.

यादवांच्या अस्तापासून बहामनी राज्याच्या अखेरच्या काळापर्यन्त संशोधनाची सर्व भिस्त मुसलमानी तवारिखांवर व शिलालेखांवर आहे. या तवारिखा इतिहास म्हणून लिहिल्या गेल्या असल्या तरी त्या अपूर्ण, त्रोटक असून त्यांत चुकाही फार असतात. कोठे कोठे अर्धवट टिकलेली हेमाडपंती देवळे या इतिहासविषयाचा पुरावा अजून जवळ बाळगून आहेत. मात्र त्यावर जीर्णोद्धाराची आलेली पुट दूर सारून या पुराव्यांचा उपयोग करावा लागेल. क्वचित् एखादा मातीत दडलेला ताम्रपट बाहेर निघून एखाद्या ब्राह्मणाला राजाने दिलेल्या दानाची उपयुक्त माहिती सांगतो. तरी या काळावर अजून जास्त प्रकाश पडावयासाठी फारशी कागदपत्रांचा व नाण्यांचा विशेष अभ्यास करावा लागेल.

शहाजीच्या उदयापासून पुढे पेशवाईपर्यंतच्या काळाचे इतिहास-संशोधन काहीसे झाले आहे व झाले आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक होण्याला त्यात वाव आहे. मराठी कागदपत्रे, राजाज्ञा, बखरी, फारसी फर्माने, व इतर कागदपत्रे, नाणी, ताम्रपट, देवळातील, किल्ल्यातील व इतर ठिकाणचे शिलालेख, संस्कृत काव्यग्रंथ, मराठी संत वाङमय इत्यादि वरून या वेळच्या बऱ्याचशा घटनांवर प्रकाश पडतो. महाराष्ट्रातील

इतिहास-संशोधकांनी यासाठी विशेष कष्ट घेऊन बरीच माहिती उजेडात आणली आहे. वर लिहिलेल्या सामग्रीखेरीज आणखी एक विशेष प्रकारची सामग्री या काळात लिखाणाला मदत करते. पोर्तुगीज, डच, स्पॅनिश, फ्रेंच व इंग्रज व्यापाऱ्यांनी या काळात जी माहिती प्रसिद्ध केली आहे त्यामुळे कालगणना निश्चित होण्यास फार मदत होते. पूर्वीच्या काळातही ह्यूएनत्संग सारख्या प्रवाशांच्या माहितीचा उपयोग होतो. परंतु त्या काळात इतकी भरपूर माहिती आढळत नाही. मात्र हे सर्व पाश्चात्य व्यापारी त्या वेळी किनाऱ्याकिनाऱ्यावर वखारी बांधून असल्याने त्यांच्या माहितीत ऐकीव म्हणून अविश्वासार्ह भाग बराच आढळतो. त्यातील चुका, पूर्वग्रह दोष, उणीवा इत्यादि वगळून त्यातील इतिहासाचे कण जुळवावे लागतात.

पेशवाई कालखंडात विशेषतः उत्तर पेशवाईसंबंधी पुराव्याची उणीव फारशी भासत नाही. पेशवे दप्तरात व इतर संग्रहात असलेले एक लाखाचेवर रुमाल भरून कागदपत्रे या कालावर उपलब्ध आहेत. फारसी, इंग्रजी, फ्रेंच व इतर देशी भाषांतही कागदपत्रे भरपूर आढळतात. इंग्रज, फ्रेंच प्रवाशांनी, मिशनऱ्यांनी, व्यापाऱ्यांनी व लष्करी लोकांनी लिहून प्रसिद्ध केलेले हजारो प्रवासवृत्तांचे ग्रंथ या कालावर छापून प्रसिद्ध झालेले आहेत. यामुळे या भागावर सर्वांत अधिक प्रकाश पाडता आला हे उघड आहे.

मराठ्यांच्या इतिहासावर अभ्यास करून लिहिलेला पहिला ग्रंथ कॅप्टन ग्रँट डफ या इंग्रजाचा आहे. विल्क्सने म्हैसूरचा, फोर्बसने गुजराथचा, टॉडने राजस्थानचा डफने मराठ्यांचा असे चार इंग्रजांनी लिहिलेले ग्रंथ हिंदुस्थानच्या इतिहासात प्रसिद्ध आहेत. डफने साताऱ्याला असताना बरीच मराठी कागदपत्रे हस्तगत केली व हाताखालच्या कारकुनांकडून त्यांची भाषांतरेही करून घेतली. कंपनी सरकारच्या कागदपत्रांचें भांडार तर त्याला खुलेच होते. या सर्वांचा उपयोग करून त्याने अतिशय मेहनतीने मराठ्यांचा इतिहास तीन खंडांत लिहिला. या इतिहासात मराठी कागदपत्रे व परिस्थिति नीट न समजल्याने बऱ्याच चुका झाल्या आहेत. या सर्व गोष्टी खऱ्या असूनही ग्रॅन्ट डफचा इतिहास अजूनही सन्दर्भ ग्रंथ म्हणून उपयोगी पडतो इतकी या ग्रंथाची थोरवी आहे.

ग्रँट डफच्या इतिहासावर पहिली टीका नीलकंठराव कीर्तने यांनी १८६८ त केली. मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाच्या प्रथमावस्थेत ग्रँट डफ व इतर इंग्रजी इतिहासकारांना खोडणें हाच हेतु मनात धरून काहीसे संशोधन झाले. १८७८ त 'काव्येतिहाससंग्रह' या मासिकातून एकापेक्षा एक सरस बखरी सुसंपादित व सटीक अशा प्रसिद्ध झाल्या. रावबहादूर का. ना. साने यांना याचे बरेचसे श्रेय द्यावे लागेल. इतिहासाच्या पुराव्याच्या दृष्टीने बखरी जरी आता तितक्याशा विश्वासार्ह मानल्या जात नसल्या तरी समाजाला इतिहासाची गोडी लावण्यात व सुरुवातीला माहितीं उपलब्ध करून देण्यात त्यांचा फार उपयोग झाला हे नाकारता येत नाही. रा. ब. साने व 'काव्येतिहास संग्रह' या मासिकाच्या इतर संपादकांनी थोडी फार जुनी कागदपत्रे प्रसिद्ध करण्याचा पायंडा पाडून संशोधनाचे नवीन युग सुरू केले असे म्हणावयास हरकत नाही.

न्या. मू. महादेव गोविंद रानडे यांची 'मराठी सत्तेचा उदय' ही व्याख्यानमाला १९ वे शतकाअखेर पुस्तकरूपाने इंग्रजीत प्रसिद्ध झाली. ग्रॅन्ट डफने मराठी सत्ता ही "सह्याद्रीतील वणव्याप्रमाणे एकदम निर्माण झाली व हळुहळू विझली" हे जे एकांगी विधान केले होते त्याला उत्तर देण्यासाठी रानड्यांनी या ग्रंथाचा प्रपंच केला. मराठी सत्तेच्या उदयाचीं मीमांसा व मर्म यावर त्या काळात उपलब्ध असणाऱ्या पुराव्याच्या आधारावर न्या. रानडे यांनी भाष्य केले आहे. माहितींचा अभाव लक्षात घेता, न्या. रानडे यांच्या मीमांसेमागील तीक्ष्ण बुद्धिमत्ता लक्षात येते. उदयाप्रमाणेच न्या. रानडे यांना मराठी सत्तेच्या ऱ्हासाचीही मीमांसा करावयाची होती; परंतु दुर्दैवाने ती करण्याचे आतच त्यांचा अंत झाला.

मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनात मनोरंजकता आणून भरपूर कागदपत्रे प्रसिद्ध करण्याचे श्रेय रावबहादूर द. बा. पारसनीस यांना आहे. 'भारतवर्ष' व 'इतिहाससंग्रह' या दोन मासिकांतून त्यांनी बरीच महत्त्वाची कागदपत्रें प्रसिद्ध केली. पारसनिसांनी संकलनात्मक असे लेख व ग्रंथही बरेच लिहिले आहेत. त्यांची भाषा रसाळ व गोड असून लिहिण्यात मार्दवता फार आहे. इतिहाससंशोधनाच्या निकषावर घासले असता त्यांचे संकलनात्मक लखाण फिके पडते हे मान्य करावे लागेल. पारसनिसांचे मुख्य कार्य म्हणजे

त्यांनी कै. वाड व मावजीशेटजी यांच्या मदतीने पेशवे दप्तराचे आलोडन करून बरेच खंड प्रसिद्ध केले हे होय. याशिवाय ग्वाल्हेर दरबारसाठी त्यांनी शिंद्याची कागदपत्रे पंच खंडात छापून दिली ती निराळीच. प्रवासवर्णनें, चटकदार पद्धतीने त्यांनी लिहिलेली चरित्रें, दन्तकथा व आख्यायिका यांच्यामुळे त्यांची मासिके लोकप्रिय झाली, व त्यात प्रसिद्ध झालेली कागदपत्रे ओघानेच त्यामुळे समाजात वाचली गेली. साने व पारसनीस यांनी केलेले इतिहास-संशोधन काहीसे दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून होते. व्यक्तिशः स्वतःच्या हिमतीवर या क्षेत्रात प्रवेश करून कायमचे नाव टिकविण्याचे श्रेय विश्वनाथ काशिनाथ राजवाडे व वासुदेव वामनशास्त्री खरे या दोघांना आहे. या दोघांनी प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांमुळे मराठ्यांच्या इतिहासाला व संशोधनाला एक नवीन वळण लागले.

राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' २२ खंडात प्रसिद्ध केली आहेत. या साधनांचा पहिला खंड १८९८ त प्रसिद्ध झाला. साधन-ग्रंथाच्या सुरुवातीस विवेचक, दीर्घ, माहितीपूर्ण प्रस्तावना राजवाडे यांनी लिहिल्या आहेत या प्रस्तावनात राजवाड्यांनी आपली सर्व विद्वत्ता व संशोधनाचे मर्म पणाला लावले आहे असे म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही. संसाराच्या मायापाशांत स्वतःला गुरफटून न घेता, अहर्निश तीस वर्षे या महाभागाने मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनात खर्ची घालून संशोधनातील "महर्षिपद" मिळविले. संशोधनाला जरूर म्हणून सर्व हिंदुस्थान त्यांनी पायाखाली घातला. पुणे येथे भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापून इतिहास संशोधनाच्या कार्याला संघटित व स्थायी स्वरूप प्राप्त करून दिले. त्यांनी प्रसिद्ध केलेली कागदपत्रें, साधन ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना, काव्य, व्याकरण, व्युत्पत्ति, इतिहास या विषयांवर लिहिलेले ग्रंथ वा लेख त्यांच्या प्रखर व तीक्ष्ण बुद्धिमत्तेची साक्ष देतात. मराठ्यांचा इतिहास व इतिहास संशोधन यांत राजवाड्यांचे नाव अजरामर राहील यात शंका नाही.

राजवाड्यांच्या समकालीन असलेले वासुदेवशास्त्री खरे हे मिरजेच्या हायस्कूलमध्ये संस्कृतचे शिक्षक होते. शिक्षकाचे काम करीत असता मिरजमळा दप्तरातील पटवर्धनांचा कागदसंग्रह त्यांनी वाचून का ला. उत्तर पेशवाईत

पटवर्धन हे पेशव्यांचे विश्वासू सरदार असल्याने त्या काळातील पटवर्धन दप्तरातील पत्रांना ऐतिहासिक दृष्टया फार महत्त्व आहे. ही पत्रे शास्त्रीबुवांनी वाचून, नकलून व्यवस्थित संपादून १२ खंडांत प्रसिद्ध केली. प्रत्येक पत्राला माहितीपूर्ण टीपा देणे, विवेचक प्रस्तावना लिहिणे इत्यादि व्यवस्थितपणामुळे खरे यांचे 'ऐतिहासिक लेखसंग्रह' अभ्यासकांना फार उपयोगी पडतात. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे मराठीत सुमारे ४०० ग्रंथ आतापावेतो प्रसिद्ध झाले. परंतु वासुदेवशास्त्री यांच्या इतके उत्तम संपादन त्यांच्या काळात कोणीही केलेले नाही. त्या वेळचे बरेचसे साधनग्रंथ म्हणजे हस्तलिखितांचे, कागदपत्रांचे छापील स्वरूप आहेत इतकेच. यामुळे या साधनग्रंथांचा उपयोग करताना कालापव्यय होऊन शिवाय इतर ग्रंथांची संदर्भासाठी जरूरी लागते, ती वेगळीच. गेल्या अर्धशतकात मराठीत प्रसिद्ध झालेल्या इतिहासाच्या संकलित ग्रंथांसाठी खरे यांच्या 'ऐतिहासिक लेखसंग्रहां'चा फार उपयोग झालेला आहे.

वा. वा. खरे यांचे साधनांचे सर्व खंड व इतर साहित्य त्यांनी स्वतःच प्रसिद्ध केले आहे. संशोधनासाठीही त्यांनी इतरांची मदत घेतली नाही किंवा इतर कोणी त्यांना दिली नाही. मिरजेहून मिरजमळ्याला हेलपाटे घालून कागदपत्रांचे वाचन, निवड व नंतर नकला व शेवटी प्रकाशन त्यांनी स्वतःच्या एकट्याच्या हिंमतीवर केले. ज्या पटवर्धनांच्या दप्तराचे ते संपादन व प्रकाशन करीत होते, त्यांचे वारसदार त्या वेळी संस्थानच्या व जहागिरीच्या रूपाने आपला वारसा उपभोगीत होते. परंतु आपल्या पराक्रमी पूर्वजांच्याविषयी आपले काही कर्तव्य आहे, असे त्यांच्या लक्षात आले नाही व त्याविषयी चाललेल्या कामाबद्दल त्यांनी फिकीरही केली नाही. आपल्या पदरचा एक शिक्षक पदरमोड करून, पायपीट करून, परिश्रमाने, व स्वार्थत्यागपूर्वक जे काम करीत आहे, त्याला उत्तेजन देण्याचे, मदत करण्याचे भरीव कार्य यांपैकी एकाही पटवर्धन शाखेने केले नाही, ही केवढी खेदाची बाब आहे. त्यांच्या मनात आले असते तर त्यांच्यापैकी कोणीही एकजण–सर्वजण मिळून तर सोडाच–शास्त्रीबोवांना संशोधनाला स्थैर्य व निवांतपणा मिळवून देऊ शकला असता. परंतु दुर्दैवाने असे काही घडले नाही व शास्त्रीबोवा स्वतःच या कामासाठी झिजत राहिले. इतिहासाविषयी अशी कृतज्ञता व कृतघ्नता एकत्र आढळणे कठीण.

इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रात सतत कार्य करणाऱ्या व्यक्तींपैकी सध्याचे सर्वांना सुपरिचित असणारे डॉ. गो. स. सरदेसाई, म. म. द. वा. पोतदार, प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्या कार्याचा व संशोधनाचा उल्लेख केला पाहिजे. रियासतकार डॉ. नानासाहेब सरदेसाई यांनीं गेली साठ वर्षे इतिहासाच्या अभ्यासात व लेखनात घालविली आहेत. त्यांनीं पेशवे दप्तराचे ४६ खंड सम्पादून प्रसिद्ध केले. मराठ्यांचा इतिहास नव्याने इंग्रजीत लिहिला. त्यांनी लिहिलेल्या रियासती दोन पिढ्यांना संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोगी पडल्या आहेत व गेली ४०–५० वर्षे त्यांचा मराठी प्रदेशात अज्ञापासून तज्ज्ञापर्यन्त सर्वांकडून वापर होत आहे; यातच त्यांच्या कार्याचे श्रमसाफल्य आहे. हजारो पत्रांच्या तारखा लावणे, घराण्यांच्या वंशावळी तयार करणे, व्यक्तींचे कार्यकारणभाव दाखविणे, यासाठी त्यांनी फार कष्ट घेऊन त्या कष्टाचे फळ पुढच्या पिढ्यांना आयते उपलब्ध करून दिले आहे. रियासतीच्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी त्यांनी प्रसिद्ध केलेल्या साधन-ग्रंथांचा व स्वतः संशोधन केलेल्या पेशवे दप्तराचा भरपूर उपयोग करून त्या संपूर्ण बदलल्या व सुधारून प्रसिद्ध केल्या. चिकाटीने व तळमळीने कार्य करून त्यांनी महाराष्ट्राला ऋणी करून ठेवले आहे.

महाराष्ट्रातील सध्याच्या संशोधकांपैकी प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर व म. म. पोतदार यांचा इतिहासाचा अभ्यास सूक्ष्म व दांडगा आहे. गेली ३०-४० वर्षे त्यांनी इतिहास ग्रंथांच्या वाचनात व इतिहास-संशोधनात घालविली आहेत. वाचनातील बारकावे, मोडी लिपीतील नैपुण्य, तीक्ष्ण स्मरणशक्ति, वाचनातील विपुलता, व वैचित्र्य व त्यामुळे आलेला सखोलपणा, इतिहासातील कार्यकारणभाव पाहून त्यावरून निर्णय घेण्याची बुद्धीची विशालता, या गुणांमुळे त्यांच्या इतिहास-संशोधनाला एक विशेष धार व दर्जा प्राप्त झाला आहे हे निर्विवाद आहे. इतिहासकालातील एखाद्या व्यक्तीविषयी बोलताना प्रा. शेजवलकर तिच्या आयुष्याचा सबंध कालपट सूक्ष्मपणे तुमच्यापुढे उभा करतील, तर म. म. पोतदार तुम्हांला सध्याच्या काळातून पूर्वीच्या काळात ओढून नेतील. संशोधकाला जरूर असणाऱ्या सर्व गुणांनी युक्त अशी ही दोन मोठी माणसे मराठ्यांचा तौलनिक इतिहास लिहिण्यास सर्वथैव योग्य अशी आहेत. त्यांना या कामाला प्रवृत्त करून त्यांच्याकडून

लिखाण लिहून घेतले गेले तर मराठ्यांच्या इतिहासात मौलिक ग्रंथांची भर पडेल.

वर उल्लेखलेल्या व्यक्तींखेरीज आणखी २५–३० इतिहास संशोधकांनी स्वार्थत्यागपूर्वक गेल्या ५० वर्षांत परिश्रम करून मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन आपल्या परीने केले आहे. मराठीत प्रसिद्ध झालेल्या साधनग्रंथां-इतके साधनग्रंथ हिंदुस्थानातील दुसऱ्या कोणत्याही भाषेत प्रसिद्ध झालेले नाहीत. त्याचप्रमाणे साधनांची चिकित्साही इतकी दुसरीकडे कोठे होत नाही. संशोधनाला दिलेले महत्त्व व त्याला आलेले संघटित स्वरूप यामुळे महाराष्ट्रात इतिहासाला विशेष दर्जा प्राप्त झालेला आहे. आज चारशेच्या वर साधनग्रंथ प्रसिद्ध होऊनही त्याचा इतिहास लेखनाला विशेष उपयोग अजून केला जात नाही. या उपयोगाभावी हे ग्रंथ प्रसिद्ध करून न करून सारखेच आहेत असा स्पष्ट इशारा रियासतकार डॉ. सरदेसाई यांनी ' सह्याद्रि ' च्या १९५५ च्या दिवाळी अंकात दिला आहे. हा इशारा सर्वांनी लक्षात घेण्याजोगा आहे असे वाटते.

* * *

पुरवणी लेख –

वरील लेख डिसेंबर १९५५ साली लिहिला. त्यानंतर आता दीडतप उलटून गेले आहे. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर व डॉ. गो. स. सरदेसाई हे आता काळाच्या पड्याआड गेले आहेत. म. म. पोतदार यांनी ' शिवचरित्र ' लिहिण्याची सुपारी ' महाराष्ट्र सरकारच्या दरबारातून उचलली आहे. परंतु १३-१४ वर्षे उलटून गेली तरी त्यांचेकडून काम कितपत झाले हे अद्याप प्रकट झालेले नाही. पुण्याहून वाईला त्यांनी स्थलांतर केले आहे. कृष्णेच्या काठी मराठ्यांचा इतिहास पराक्रमाने सजला आहे. म. म. पोतदारांचे शिवचरित्र कृष्णामाईच्या पुण्यमय पाण्याने लौकरच पुरे होवो ही इच्छा. शिवचरित्रा-बरोबरच म. म. पोतदारांचेकडून आणखीही काही अपेक्षा आहेत. भा. इ. सं. मंडळाचा इतिहास, मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाचा इतिहास, शिक्षण व इतिहास यांत जीवनार्पण झालेले त्यांचे आत्मचरित्र इत्यादि त्यांचेकडून पूर्ण व्हावे अशी अपेक्षा आहे.

हें सर्व लेखन होण्यासाठी म. म. पोतदार यांनी बैठक मारून बसावे व काम पूर्ण करावे अशी मराठी जनतेची इच्छा आहे. त्यांच्या वयोमानाकडे व प्रकृतीकडे पाहता म. म. पोतदारांनी आता सभा-संमेलनासाठी प्रवास टाळावा व शरीर स्वास्थ्याकडे लक्ष देत शक्यतो हे काम हातावेगळे करावे. त्यांच्या निकटवर्ती लोकांनी त्यांना लेखनाला निवांतपणा व वेळ द्यावा. या गोष्टी त्यांचे हातून झाल्या तर मराठ्यांच्या इतिहासात मोलाची भर पडेल.

प्रा न. र. फाटक व डॉ दिघे या दोन संशोधकांनी बरेचसे श्रम स्वातंत्र्य-चळवळीच्या इतिहासासाठी खर्ची घातलेले आहेत. इतिहास लेखनात त्यांना खूपच भर घालता येण्याजोगी आहे. त्यांच्या पूर्वीच्या कामाकडे पाहता त्यांचेकडून काम होण्याची इच्छा व्यक्त करणे आवश्यक वाटते.

या कालखंडाचा एक विशेष म्हणजे कोल्हापूरच्या भागाकडे इतिहास-संशोधकांनी दिलेले लक्ष हे होय. श्री. स. मा. गर्गे यांनी खाजगी प्रयत्नाने व कोल्हापूरचे महाराज व इतर जहागीरदार यांचे साहाय्याने करवीर रियासतीच्या इतिहासावर बराच प्रकाश टाकला आहे. साधने व इतिहास या दोन्ही गोष्टी त्यांनी शक्यतो परिश्रमपूर्वक लोकांपुढे ठेवल्या आहेत. या करवीर साधनांच्या प्रकाशनाने इतिहास लेखनाला बरीच मदत मिळण्याची शक्यता आहे. कोल्हापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ अप्पासाहेब पवार यांनी ताराबाईकालीन कागदपत्रांचे तीन मराठी खंड, एक फारसी खंड व इतिहासोपयोगी अन्य साहित्यही विद्यापीठातर्फे प्रसिद्ध केले आहे. हे सर्व साधनसाहित्य अत्यंत अल्प किमतीत त्यांनी संशोधकांना उपलब्ध करून दिले आहे. श्री. गर्गे व डॉ. पवार यांच्या कामाबद्दल इतिहासप्रेमी त्यांचे आभार मानतील.

धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंदिराची स्थापना सन १९२६ साली झाली. गेल्या अर्ध शतकात या संस्थेने साधनग्रंथ प्रकाशन, त्रैमासिकाचे प्रकाशन, राजवाड्यांच्या दुर्मिळ ग्रंथांचे प्रकाशन व इतर निबंधादि साहित्य प्रसिद्ध केले आहे. तज्ज्ञ संशोधकांचे भरीव साहाय्य मिळाल्यास या मंडळाला भरपूर काम करता येण्याजोगे आहे. धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेने, विशेषत: कै. शं. श्री. देव यांनी सर्व आयुष्यभर खपून रामदासी वाङ्मयाचा संग्रह संपादन व प्रकाशन करण्याचा प्रयत्न केला. रामदासी वाङ्मयाचा अभ्यास या

संस्थेला भेट दिल्यावाचून परिपूर्ण होणार नाही इतके महत्त्व या संग्रहाला आहे. रामदास व रामदासी या नियतकालिकातून काही साहित्य व इतिहासाचे साधनसाहित्यही प्रसिद्ध झाले आहे. दुर्दैवाने धुळ्यातील या दोन्हीही संस्थांचे कार्य आज कसेबसे टिकून आहे, इतकेच! लेखन, संशोधन व प्रकाशन इत्यादि गोष्टींचा उत्साह व कृति तेथे आज दिसत नाही. अडचणी अनेक आहेत, परंतु वस्तुस्थिति अशी आहे खरी.

मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाने इतिहास संशोधन शाखा काढून व भारतीय इतिहास व संस्कृति हे त्रैमासिक काढून एक स्तुत्य उपक्रम केला आहे. गेली १० वर्षे या त्रैमासिकाचे प्रकाशन नियमित व त्रैमासिक स्वरूपात होत आहे. या संस्थेनेही काही प्रकाशन केले असून, भरीव कार्याची त्यांचे-पासून अपेक्षा आहे.

मराठीतील, फारसी साधनांच्याकडे लक्ष न दिल्यामुळे ज्या त्रुटी व उणिवा निर्माण झाल्या त्या भरून येण्यासाठी फारसी भाषेवर प्रभुत्व असणे व ही साधने मराठीत आणणे आवश्यक आहे. इतिहास साधनांच्या या श्रीमंत दालनातून मराठी भाषेत बरीच भर घालता येईल. हे कार्य अलीकडे दोन पंडितांनी केले आहे श्री. सेतु माधवराव पगडी यांनी फारसीतून अनेक ग्रंथ मराठीत आणून मराठी इतिहाससाधनांत भर घातली आहे. प्रा. ग. ह खरे यांनी भा. इ. सं. मंडळात सेवा करीत असतानाच फारसी भाषेचा अभ्यास करून व त्यावर प्रभुत्व मिळवून मंडळाच्या सहकार्याने बरीच फारसी साधने मराठीत संपादन करून प्रसिद्ध केली आहेत. फारसी साधने ज्या प्रमाणात मराठीत येतील त्या प्रमाणात मराठी इतिहास लेखनाला उपयोग होण्यासारखा आहे. या कार्याची गति अजूनही मंद आहे. उपेक्षित भागाकडे लक्ष दिले पाहिजे.

मराठी इतिहास संशोधकांच्या आजच्या कार्यात प्रा. ग. ह. खरे यांचा मोठा वाटा आहे. उणेपुरे अर्धशतक ते संशोधनकार्यात गर्क आहेत. महाविद्यालयीन शिक्षण अपुरे राहिले तरी ती उणीव स्वतः ज्ञान संपादन करून त्यांनी भरून काढली आहे. कानडी, फारसी इत्यादि लिप्यांचा व भाषांचा अभ्यास, प्राकृत लिप्या व भाषेचा अभ्यास, उत्खनन, नाणकशास्त्र, मूर्तिविज्ञान, शिलालेखांचे व ताम्रपटांचे वाचन, चित्रकला व शिल्पकलेचा अभ्यास त्यांनी स्वतः ग्रंथांवरून करून या विषयात व शास्त्रात पारंगतता

प्राप्त करून घेतली आहे. गेल्या अर्धशतकात अर्धशतकाचे वर पुस्तके व चारशेच्या जवळपास लेख, निबंध त्यांनी लिहून व प्रसिद्ध करून एक मोठे कार्य केले आहे. ा. खरे व भारत इतिहास सं ो ा क मंडळ यांचा चाळीस वर्षाचा कार्याचा संबंध आता तुटला असला तरी लोक श्री. खरे व मंडळ यांत भिन्नता करीत नाहीत इतका त्यांचा मंडळाच्या कार्यावर ठसा उमटलेला आहे. गेल्या ५० वर्षांत संशोधनात त्यांनी जे प्रावीण्य प्राप्त करून घेतले आहे त्याचे फलित सार संशोधकांचे पुढे व जनतेपुढे आले पाहिजे. या दृष्टीने प्रा. खरे यांनी आपल्या लेखन-संशोधनाची व प्रकाशनाची नवी वाटचाल केली पाहिजे. इतिहास हाच संसार मानून त्यांनी आपले जीवन-सर्वस्व इतिहासाला वाहिलेले आहे. त्यांच्यासारखे सव्यसाची व सर्वशास्त्र-पारंगत इतिहासाभ्यासू आता पुढे दिसणार नाहीत. त्यांच्या ऊर्वरित आयुष्याचा सदुपयोग कसा करून घेता येईल इकडे भा. इ. सं. मंडळ, विद्यापीठे, सरकार व सुजाण नागरिक यांनी विचारपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक नवी विद्यापीठे महाराष्ट्रात निर्माण झाली. त्यात पुणे विद्यापीठाने आतापर्यंत इतिहासाकडे दुर्लक्षच केले. अलीकडे इतिहासाचे अभ्यासन निर्माण करून कार्य सुरू झाले आहे. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्यासारखे तरुण, उत्साही व संघटनाकुशल प्राध्यापक या आसनावर आरूढ झाले आहेत. त्यांनी २–३ ग्रंथ व काही निबंध प्रसिद्ध करून कार्याला सुरुवात बरी केली आहे. त्यांचेपासून इतिहास संशोधनात व प्रकाशनात भरीव मार्ग-दर्शन व काम होण्याची अपेक्षा आहे. सुदैवाने असे कार्य होण्यासाठी आवश्यक असलेली पूर्व तयारी त्यांचे जवळ आहे.

हा आढावा परिपूर्ण नाही. तसा घेण्यास स्थलकालाची अडचण आहे. सर्व संस्था, व्यक्ति यांचे कार्याचा व्याप समजून घेण्यासाठी एक ग्रंथही उणा पडेल. तेव्हा वाचकांनी या संशोधनकार्याकडे केवळ एक स्थूल रूपरेषा या दृष्टीनेच पहावे. सवडीने मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनावर सविस्तर लिहिण्याची इच्छा मात्र येथे व्यक्त करून ठेवतो. स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या पाव शतकात मराठ्यांच्या इतिहाससंशोधनाला व अभ्यासाला गति प्राप्त झाली असली तरी ती मंदगति आहे स्वातंत्र्याचा ओज व उत्साह या गतीत दिसत नाही हे नमूद केले पाहिजे.

* * *

३

१८५७ चा उठाव : काही विचार

इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानात स्थिर झाल्यानंतर त्या सत्तेला ज्या एका अभूतपूर्व उठावाने हादरा दिला, त्या उठावास या वर्षी बरोबर शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. इ. स. १६०० साली लंडनला काही व्यापाऱ्यांनी सौदागिरी करण्यासाठी काढलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने पहिल्या दीडशे वर्षांत अमाप नफा तर मिळविलाच परंतु, त्याचबरोबर या देशातील लोकांचे आपापसांतील वैमनस्य, दुर्बलता, स्वार्थवृत्ति, घरभेदेपणा इत्यादि दुर्गुण हेरून त्या अनुरोधाने फायदा उठविण्यासाठी कौशल्याने व धीमेपणाने पावले टाकण्यास सुरवात केली. १७५७ साली प्लासीच्या लढाईत विजय संपादन केल्यापासून शंभर वर्षांचे आत त्यांनी सर्व हिंदुस्थान व शेजारील देश यांवर आपले स्वामित्व बसवून आपला पाय या देशात कायमचा रोवला. या घटना इतक्या वेगाने घडल्या की, गमावणारे व कमावणारे या दोघांनाही यासंबंधी विचार करावयास सवडच मिळाली नाही. ती सवड मिळताच इंग्रजांनी आपली संस्कृति येथे लादण्याचा प्रयत्न करावयास सुरुवात केली. या प्रयत्नास त्यांना जनतेचा पाठिंबा मिळाला

प्रसिद्धि : प्रताप कॉलेज नियतकालिक, अमळनेर मार्च १९५७

नाही. उलट त्यांच्याच लष्करातील शिपाई बिथरून विरोध करण्यास पुढे आले. त्यांनी व इंग्रजांविरुद्ध असंतुष्ट असणाऱ्या इतर मंडळींनी एकत्र येऊन १८५७ साली इंग्रजांची राजवट उलथून टाकण्यासाठी प्रयत्न केले. १८५७ सालचा इंग्रजांविरुद्धचा हा उठाव हिंदी शिपाई व राजेमहाराजे यांच्या संयुक्त नेतृत्वाखालील पहिला प्रयत्न होता. हा उठाव जरी उत्तर हिंदुस्थानपुरता मर्यादित असला तरी त्याचे परिणाम सर्व हिंदुस्थानभर झाले असल्याने त्याचे महत्त्व फार आहे.

१८५७ साली हा जो उठाव झाला, त्याला इंग्रज व हिंदी इतिहासकारांनी वेगवेगळ्या नावांनी संबोधिले आहे. इंग्रज इतिहासकार या घटनेस 'शिपायांचे बंड' म्हणतात, तर देशभक्त हिंदी इतिहासकार या उठावास 'स्वातंत्र्ययुद्ध,' 'धर्मयुद्ध' असे संबोधतात. या स्वातंत्र्ययुद्धात हौतात्म्य मिळविलेल्या शूरांच्या मरणापासून ते स्फूर्ति मिळविण्याची चेतावणी लोकांना देतात. इंग्रजांचे राज्य येथे असेतोपर्यंत निर्विकारपणाने या घटनेकडे दोन्ही पक्षांना पाहता आले नाही. बंडवाल्यांनी इंग्रज बायकामुलांची कत्तल केली म्हणून इंग्रज लोक रुष्ट तर बंडाचा उपशम करताना व नंतर इंग्रजांनी पुरुषांच्या सरसहा कत्तली केल्या त्याची स्मृति हिंदी लोकांना डाचत असे. सुदैवाने आता आपला देश स्वतंत्र झाला असल्याने पूर्वग्रह व दोष विसरून या घटनेकडे पाहणे आता लोकांना शक्य आहे, व या घटनेचा असा शांतपणे विचार करून त्याचे स्वरूप तपासण्याची वेळ सध्या आली आहे. या वर्षी १८५७ च्या प्रयत्नांना बरोबर शंभर वर्षे पुरी होत असल्याने, यापूर्वीच्या प्रयत्नांची आठवण होणे सहाजिकच आहे व त्याच अनुरोधाने भारत सरकारने 'शताब्दि महोत्सव' साजरा करण्याचे ठरविले आहे. आतापर्यंत चिकित्सेच्या अभावी स्वपक्षाची स्तुति व परपक्षाची निंदाच करण्यात सर्व लोक धन्यता मानीत आलेले आहेत. परंतु या घटनेच्या यथायोग्य मूल्यमापनाचा मात्र प्रयत्न झाला नाही. तसे मूल्यमापन करण्याची वेळ आता आली आहे. '१८५७ शताब्दि-महोत्सवाच्या निमित्ताने ही संधि साधून हा एक अल्पसा प्रयत्न केला आहे.

१८५७ च्या 'बंडा' संबंधी इंग्रजीत शेकडो ग्रंथ आहेत. या धामधुमीत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या लोकांनीच 'चक्षुर्वै सत्यम्' म्हणून लिहिलेल्या आठवणी, रोजनिशा माहितीपूर्ण पत्रे इंग्रजीत विपुल आहेत. या उठावात भाग

घेणाऱ्या मराठे व उत्तर भारतीय व मुसलमान यांच्यात मात्र मूळ साधनांचा तुटवडा आहे. इतिहासातील घटना शास्त्रशुद्ध पद्धतीने लिहिण्याची आमचेकडे प्रथा नसल्याने ही पंचाईत आहे. याशिवाय प्रस्थापित इंग्रज सरकारच्या भीतीने देखील कित्येकांनी ही माहिती लिहून किंवा प्रसिद्ध करून सरकारचा रोष पत्करण्यापेक्षा ती माहिती नष्ट झालेली बरी याच विचाराने याविषयी मौन स्वीकारले. प्रसिद्ध झालेल्या मराठी साधनांत वरसईकर गोडसे भटजींनी लिहिलेले 'माझा प्रवास' (१८५७ सालच्या बंडाची हकीकत) हे पुस्तक फार महत्त्वाचे आहे. वरसईकर गोडसे भटजी धनलाभाच्या आशेने उत्तरेत हिंडत असता या वावटळीत सापडले व त्यांचेवर अनेक प्राणसंकटे कशी आली याची रसभरित माहिती या पुस्तकात आढळते. गोडसे भटजींनी या 'उठावा'-तील काही कृति प्रत्यक्ष पाहिलेल्या व काही ऐकीव आहेत. दक्षिणेत परत आल्यावर सुमारे पंचवीस वर्षांनी त्यांनी या आठवणी लिहिल्या. यामुळे या पुस्तकात घटनांच्या काळासंबंधी बऱ्याच चुका आढळतात. श्री. द. ब. पारसनीस यांची 'झाशीची राणी लक्ष्मीबाई' व 'अयोध्येचा नबाब' ही दोन पुस्तकेही या विषयासंबंधी काही माहिती देतात. परंतु सत्यापेक्षा रसाळ कथांचा भागच या दोन पुस्तकांत अधिक आहे.

'१८५७' वर मराठीतील सर्वात महत्त्वाचे पुस्तक म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे होय. हे पुस्तक ग्रंथलेखकाप्रमाणेच क्रांतिकारक ठरले. इतिहासाविषयी लिहिलेल्या या पुस्तकाने भारतीय स्वातंत्र्यचळवळीत एक स्वतःचा इतिहास निर्माण केला. या पुस्तकाच्या लिखावटीपासून छपाईपर्यंत व विक्रीपासून त्याच्या वाचनाचा लोकांवर झालेल्या परिणामापर्यंतचा सर्वच इतिहास अतिशय रोमांचकारी अशा घटनांनी भरलेला आहे. स्वातंत्र्य संपादनात हा ग्रंथ लोकांचे स्फूर्तिस्थान होता. परंतु केवळ याच कारणाने या ग्रंथाला महत्त्व आले आहे असे नव्हे. या ग्रंथात स्वा. विनायकराव सावरकरांनी एक नवीन विचार मांडला आहे. व या विचाराच्या दृष्टीनेही हा ग्रंथ क्रांतिकारक ठरला आहे. '१८५७'चे बंड हा शब्दप्रयोग चुकीचा असून १८५७ ची घटना 'स्वातंत्र्ययुद्ध' या अभिधानास पात्र होते. हा दावा या पुस्तकात फार प्रभावीपणे मांडला आहे. 'स्वदेश आणि स्वधर्म' यासाठी सर्व भारतीय एकत्र येऊन त्यांनी हे स्वातंत्र्ययुद्ध

लढविले, परंतु दुर्दैवाने त्यात भारतीयांना अपयश आले, असे ग्रंथकाराचे प्रतिपादन आहे.

१८५७ साली घडलेल्या या घटनांचे मूल्यमापन करण्यापूर्वी किंबहुना त्यासाठीच, या घटना घडण्यास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्या सर्व कारण-परंपरेचा नीट विचार झाला पाहिजे. इतिहासात एकाकी अशी घटना केव्हाच घडत नसते. अनेक कारणांची मालिका प्रत्येक कृतीमागे असते. या सर्व कारणांचा शांतपणे विचार झाल्याशिवाय यशापयशाचे मूल्यमापन नीट होऊ शकत नाही. यासाठी प्रथम या १८५७ च्या कृतीला कोणती कारणपरंपरा झाली आहे त्याचा विचार केला आहे. इंग्रज व हिंदी इतिहासकारांनी यासंबंधी सुचविलेल्या कारणांचा समावेश त्यात केला आहे. या अनेक कारणांपैकी प्रत्येक कारणासंबंधीही विचार झाला पाहिजे. परंतु त्याला या ठिकाणी अवसर नसल्याने नुसती कारणांची जंत्रीच प्रथम दिली आहे. पुढे केलेल्या मीमांसेवरून प्रत्येक कारणाच्या महत्त्वाचे मूल्य-मापन कोणालाही करता येईल. या उठावाला केवळ तात्कालिक कारणेच आहेत व त्यातही 'काडतुसाच्या चरबीची' दंतकथाच बहुतांशी कारणीभूत आहे ही इंग्रज लेखकांची दृष्टि तितकीशी बरोबर नाही. दारूच्या कोठारावर ठिणगी पडल्यावर भडका उडतो यात दारूकोठार असणे ही गोष्ट काडीपेक्षा जास्त महत्त्वाची असते हे ध्यानात घेतले पाहिजे. या उठावाला राजकीय, सामाजिक, धार्मिक, लष्करासंबंधी व काही तात्कालिक अशी सर्व तऱ्हेची कारणे आहेत. नंतर घडलेल्या घटनांवरूनच यांपैकी कोणत्या कारणाला किती महत्त्व आहे हे ठरविणे शक्य आहे. यासाठी ही कारणपरंपरा पुढे दिलेली आहे

लॉर्ड डलहौसीने दत्तक वारस नामंजूर करून नागपूर, सातारा व झाशी ही तीन मराठी राज्ये व ओरछा, जैतपूर, संबळपूर, बाघत, उदेपूर ही इतर राज्ये खालसा केल्याने क्षोभ निर्माण झाला. वरील राज्यांप्रमाणेच आपलीही राज्ये खालसा होतील, ही भीति वारसा असणाऱ्या राजे-नबाबांनाही निर्माण झाली. त्याचप्रमाणे बिठूरचे (ब्रह्मावर्त) नानासाहेब, तंजावरचे राजे व अर्काटचा नबाब यांच्या नेमणुका कमी करून पैसे वाचविण्याचा एक नवीन पायंडा डलहौसीने पाडला. वंशपरंपरा पेन्शन मिळत राहील या लोकसमजुतीला यामुळे फार धक्का बसला. पैसे व वतन यांबाबत इंग्रजांच्या

शब्दाला हिंदुस्थानात फार किंमत होती. परंतु डलहौसीच्या या नवीन धोरणाने दुखावलेलेच नव्हे तर इतरही लोक साशंक झाले व इंग्रजी नीती-विषयी लोकांच्या कल्पना पार बदलल्या. आपल्या सख्ख्या भावावर विश्वास न ठेवणारे लोक पूर्वी इंग्रजांच्या शब्दावर विश्वास ठेवीत असत, हे या संदर्भात ध्यानात घेतले म्हणजे या अविश्वासाचा परिणाम किती सार्वत्रिक व खोलवर असेल हे ध्यानात येईल. केवळ वारसाच्या अभावीच तेवढी राज्ये खालसा केली किंवा पेन्शने बंद केली असे नव्हे. उत्तर हिंदुस्थानातील सर्वांत मोठे राज्य, अयोध्येच्या नवाबाच्या स्वामित्वाचे होते. नबाब कर्जबाजारी झाला व राज्यात अव्यवस्था माजली या सबबीखाली ते खालसा केले. मुंबई राज्यात जहागिरी व इनामे यांची वास्तपुस्त करण्यासाठी एक कमिशन १८५० च्या सुमारास नेमले होते. या कमिशनने सर्व वतनदारांना इनामदारांना जमिनीच्या मालकीबद्दल पुरावे तरी दाखवा, नाहीतर जमिनी परत करा असा इशारा दिला. सुमारे तीस हजार इनामदारांना जमिनी वंश-परंपरा मालकीच्या असून व त्याची नोंद गावदप्तरी असूनही सबळ पुरावा हजर करता न आल्यामुळे आपली इनामे परत करावी लागली. इंग्रजांना पाठिंबा देणारा इनामदार-जमिनदारांचा वर्गच अशा रीतीने दुखावला गेला हेही या संदर्भात लक्षात घेण्याजोगे आहे.

अयोध्या प्रांतातील जमिनदार, तहशीलदार फार प्रबळ आसामी होते. त्यांच्याजवळ स्वतःची सैन्ये होती. गढ्या किंवा किल्ले बांधून त्यांत ही मंडळी फार मानाने राहत होती. लॉर्ड कॅनिंगने अधिकार हाती येताच या लोकांचा 'सारा' वसूल करण्याचा हक्क काढून घेऊन या लोकांना 'नामधारी' व निर्बल बनविले. शेकडो वर्षे पिढ्यानुपिढ्या मानपान उपभोगणारी ही मंडळी अधिकार हातातून जाताच जागी झाली व आपणांला दुखावणाऱ्या शत्रूला दंश करण्यास सिद्ध झाली. याच संदर्भात एक तत्कालीन कारणही महत्त्वाचे ठरले. दिल्लीच्या बादशहाला त्याच्या राजवाड्यातून काढून 'कुतुबमिनार'-च्या बाजूस कोठेतरी नेऊन ठेवण्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांत घाटत होते. दिल्लीच्या बादशहाचा अधिकार नाममात्र असून इंग्रज सर्वसत्ताधीश आहेत ही गोष्ट माहीत असूनही बादशहाची त्याच्या राजवाड्यातून उचलबांगडी करण्याची कल्पना लोकांना असह्य वाटली. वस्तुतः इंग्रज राज्य करीत असले

तरी ते बादशहासाठी व त्याच्यातर्फेच आहेत या त्यांच्या समजुतीला या घटनेने धक्का दिला. उत्तर हिंदुस्थानातील मुसलमान इंग्रजांविरुद्ध बिथरण्यास जी अनेक कारणे आहेत यातील हे एक महत्त्वाचे कारण आहे.

इंग्रजांचे राज्य येथे स्थिरावण्याच्या वेळी चोहीकडे अंदाधुंदी, अव्यवस्था व गोंधळ होता. त्या मानाने इंग्रजांच्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था चोख असल्याने लोकांना त्या राजवटीचे मोठे आकर्षण वाटावयाचे व बऱ्याच ठिकाणी इंग्रजी राजवट लोकांच्या आग्रहाखातर आली होती हेही नाकारता येणार नाही. परंतु या गोष्टीला चाळीस पन्नास वर्षे लोटल्यानंतर नवीन पिढीला तुलनात्मक वाईट राजवट डोळ्यापुढे नसल्याने हे आकर्षण नाहीसे झाले व ते या नवीन राजवटीच्या दोषांवर दृष्टि ठेवून त्याचाच जास्त विचार करू लागले.

राजकीय कारणांपेक्षा सामाजिक व धार्मिक सुधारणा व त्यासंबंधी हिंदी लोकांचा जो गैरसमज झाला त्यातच या 'बंडाचे' मुख्य उगमस्थान आहे असे इंग्रज इतिहासकारांचे प्रतिपादन आहे. अर्थात् त्यांच्या मताशी संपूर्ण सहमत झालेच पाहिजे असे नाही. इंग्रजांच्याविरुद्ध जो द्वेष किंवा अविश्वास समाजात निर्माण होत होता त्यात या तथाकथित सामाजिक व धार्मिक कारणांचा कितपत परिणाम झाला याचा विचार केला गेला पाहिजे.

इंग्रजांच्या सामाजिक मूल्यांचा व येथील सामाजिक मूल्यांचा प्रथमपासूनच मेळ बसत नव्हता. ईस्ट इं. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सुरवातीपासून हातात अधिकार आल्यानंतर येथील समाजात सुधारणा करण्यासंबंधीचे विचार पूर्वी अनेकदा बोलून दाखविले होते. विशेषतः 'सती'ची चाल ही रानटीपणाची चाल आहे अशी इंग्रजांची मनोमन खात्री होती. लॉर्ड बेंटिंगने १८२९ साली 'सती' ची चाल कायद्याने बंद केली. जे लोक 'सती'स प्रोत्साहन वा मदत देतील त्यांना जबर शिक्षा देण्याचे धोरण जाहीर केले. पूर्वी उच्चवर्णीय हिंदु स्त्रियांना पुनर्विवाह करण्यास धर्मशास्त्राची अनुमति नव्हती. १८५६ साली कंपनी सरकारने पुनर्विवाहासंबंधी कायदा पास करून या विवाहास कायद्याने मान्यता दिली. सतीच्या चालीस बंदी व पुनर्विवाहास अनुमति या गोष्टी धर्मविरुद्ध आहेत अशी याविषयी त्या काळी बरीच ओरड झाली होती.

लॉर्ड मेकॉलेने धार्मिक व प्राच्य विद्यांच्या शिक्षणाऐवजी इंग्रजी भाषा व युरोपीय संस्कृति यांचे शिक्षण येथे द्यावे असे सुचविले होते. १८३५ नंतर त्याची अंमलबजावणी सुरू झाली. या शिक्षणामुळे मुले पाखंडी बनून त्यांचा देवादिकांवरील विश्वास कमी होऊन ती कदाचित् 'किरिस्ताव' होतील अशी भीति सर्वसामान्य लोकांत व्यक्त केली जात होती. कंपनीचे अधिकारी व काही उत्साही ख्रिती मिशनरी ख्रिस्ती धर्माचा प्रचार व हिंदु संस्कृतीची हेटाळणी सार्वजनिक ठिकाणी करू लागल्यामुळे लोकांची मने बिथरू लागली. सरकारी अधिकाऱ्यांच्या पाठिंब्याचा अर्थ ही सरकारचीच इच्छा आहे असे गृहीत धरून कंपनी सरकारला हिंदु व मुसलमानी धर्म नाहीसे करून येथे ख्रिस्ती धर्माचा प्रसार करावयाचा आहे असा अर्थ लोकांनी केला. त्यात नवीन कायद्यांनी या मताला पुष्टि मिळाली. तुरुंगातील कैद्यांना एकच जेवण एकत्र द्यावयाचे असा नवीन हुकूम काढला गेला होता. त्याचप्रमाणे एकत्र हिंदु कुटुंबातील एखादा भाऊ ख्रिस्ती झाल्यास त्याचा इस्टेटीवरील हक्क कायम राहून त्याला आपल्या पूर्वीच्या घरी राहता येईल असा कायदा झाला होता. या दोन्ही कायद्यांचा अर्थ, सरकारच्या मनात 'सबगोलंकार' करावयाचा आहे असा लोकांनी लावला.

लॉर्ड डलहौसीने दत्तक वारस नामंजूर केला. यामागील आर्थिक व राजकीय कारणांप्रमाणेच आणखी एक शंका लोकांनी घेतली. पुत्रावाचून गति नाही ही हिंदूंची भावना, परंतु औरस पुत्राभावी दत्तक घेण्याची परंपरा व शास्त्र अमान्य केल्यामुळे हाही एक हिंदुधर्मावरील घालाच आहे असे लोकांनी मानले. नव्या इंग्रजी कायद्याने सर्वांना एका पातळीवर आणले. सरंजामदार, जहागीरदार, श्रीमंत, सावकार व उच्चवर्णीय इत्यादि लोकांना पूर्वी असलेले विशेष हक्क या नव्या कायद्यामुळे नाहीसे झाले. अर्थातच ज्यांचा मान गेला त्यांना हे रुचले नाही.

सुधारणा करण्यासाठी म्हणून ज्या गोष्टी इंग्रजांनी सुरू केल्या त्याचा विपरीत अर्थ लोकांनी लावला. आगगाडी, तारायंत्रे, टपालपेटी या सुधारणा पाहून लोक भांबावून गेले. उत्तर हिंदुस्थानात असलेल्या सैन्यात पुरभय्ये, राजपूत अशा कडव्या उच्चवर्णीयांचा भरणा होता. हे लोक धर्माच्या बाबतीत अतिशय कर्मठ होते. हिंदुधर्मात 'समुद्रपर्यटन' निषिद्ध मानले आहे

अशा समजुतीने पहिल्या ब्रह्मी युद्धात १८२४ साली 'बंगाली सैन्यांतील शिपायांनी जहाजावर पाय ठेवण्यास नकार दिला होता. त्या वेळी एका तुकडी-वर तोफा डागण्यात आल्या होत्या. या नकाराची पुनरावृत्ति होऊ नये म्हणून एक नवीन नियम जारी करण्यात आला होता. या नियमाप्रमाणे सैन्यातील शिपायांनी 'पृथ्वीच्या पाठीवर वाटेल तेथे गेले पाहिजे' असे फर्माविण्यात आले आणि या सर्व सामाजिक व धार्मिक कारणांवर कळस चढविण्याचे कार्य एका नवीन प्रकारच्या बंदुकांनी केले. १८५६ च्या सुमारास 'एनफील्ड रायफल्स' (कडामिनी) या नवीन बंदुका शिपायांना देण्यात आल्या होत्या. यात वापरावयाच्या काडतुसांना गाईंची व डुकराची चरबी लावण्यात आली होती अशी वार्ता सर्व शिपायांत पसरली. हिंदूंना गाय पूज्य व मुसलमानांना डुक्कर निषिद्ध, यामुळे आपल्या धर्मभावना डिवचण्यासाठीच किंबहुना आपणांला बाटविण्यासाठीच हे सर्व मुद्दाम करण्यात येत आहे अशी शिपायांची समजूत झाली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी व इंग्रज इतिहासकारांनी प्रथम ही केवळ अफवा असल्याचे प्रसिद्ध केले असले तरी निषिद्ध चरबी लावण्यात येत होती असेच पुढे सिद्ध झाले हेही ध्यानात घेण्याजोगे आहे. इंग्रजाविरुद्ध शिपाई लोक उठण्यास हे एक फार महत्त्वाचे कारण आहे. 'हे कारण केवळ निमित्तमात्र होते' हे स्वा. सावरकरांचे म्हणणे शिपायांच्या एकंदर कृतीवरून पटत नाही. या कारणाभावी शिपायांची इंग्रजांविरुद्ध इतकी जलद व बळकट संघटना झाली असती कीं नाही यात शंका आहे.

१८५७ च्या उठावाविषयी राजकीय वा धार्मिक कारणांबाबत आजपर्यन्त बराच ऊहापोह झाला आहे. परंतु या उठावामागच्या आर्थिक कारणांचा मात्र आजपर्यन्त म्हणावा तसा विचार झाला नाही. हिंदी व इंग्रज अशा दोन्ही बाजूंच्या इतिहासकारांनी या बाबतीत आतापर्यंत मौनच पाळले आहे. या-साठी या उठावामागच्या आर्थिक भूमिकेचा या ठिकाणी ऊहापोह केला आहे.

मराठ्यांचे राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाईपर्यन्त सर्व मराठे संरजामदारांचे स्वतःचे असे सैन्य असे. त्याचप्रमाणे उत्तर हिंदुस्थानातील राजेरजवाडे व नबाब, तालुकदार व जमिनदार या सर्वांचे पदरी फौजफाटा असे. समाजातील फार मोठा वर्ग या शिपाईगिरीवर किंवा 'मुलूखगिरी'वर जगत असे. ईस्ट इंडिया कपनीचे राज्य जसे वाढत गेले, त्या प्रमाणात व त्यांनी तैनाती फौजेच्या

नावाखाली स्वतःच्या फौजा देशी राजे-नबाबांकडे ठेवल्यामुळे निरनिराळ्या राजे-नबाबांकडील पूर्वीचा अफाट फौजफाटा कमी करण्यात आला. इंग्रजांना कवायती फौजेमुळे व दारूगोळा व तोफा उत्तम असल्यामुळे जास्त फौजेची गरजच भासत नव्हती. त्यामुळे कमी केलेले हे शिपाई बेकारीत जीवन कंठू लागले. इ. १६८६-८७ साली औरंगजेबाने विजापूर व गोवळकोंडा येथील राज्ये जिंकून घेतल्यामुळे त्या ठिकाणचा लष्करी वर्ग जसा मराठ्यांच्या बाजूने लढाईस उभा राहिला, त्याचप्रमाणे अन्नास मोताद होऊ लागलेला परंतु लढाईची खुमखुमी असलेला हा हत्यारबंद शिपाईवर्ग बंडवाल्यांना जाऊन मिळाला व केवळ शिपायांचे बंड असणाऱ्या या उठावाचे क्षेत्र त्यांनी व्यापक केले व ही लढाई दीर्घकाल टिकविली.

तालुकदार व जमिनदार लोकांचे आर्थिक हक्क काढून घेतल्यामुळे अयोध्या प्रांतातील हे लोक बेकार झाले. आपल्या गतवैभवाची व ते ज्यांच्यामुळे गेले त्या इंग्रजांची त्यांना पदोपदी आठवण होत होती. या श्रीमंत लोकांवर व राजे-नबाबांवर एक आश्रित वर्ग अवलंबून होता. मालकाचे वैभव गेल्यामुळे हा वर्ग उघडा पडला. आचारी, पाणके व दरबारी हुजऱ्यापासून ते गवई, उस्ताद, कलावंत इत्यादीपर्यन्तच्या सर्व तऱ्हेच्या गुणी लोकांवर एक तऱ्हेचे संकट कोसळल्यासारखे झाले. या लोकांचे सर्वसामान्य लोकांवर वजन असल्याने त्यांनी इंग्रजांविरुद्ध उठाव करणाऱ्या सर्वांना हाक दिली. विशेषतः बिठूर, लखनौ, दिल्ली, झांशी, कानपूर येथील उठावात या मंडळींनी बंडवाल्यांना चांगलेच चेतविले व साहाय्यही केले. पूर्वीच्या राज्यांतील अधिकारी व मुत्सद्दी अशा शहाण्या मंडळींचीही हीच स्थिति झाली होती. इंग्रजांच्या राज्यात कारकुनीचे दुय्यम जीवन जगणे याशिवाय दुसरा उपाय नाही असे आढळल्यावर त्यांनी या राजवटीविरुद्ध असणाऱ्या उठावाला आशीर्वाद दिला.

या सर्व आर्थिक कारणांपेक्षा आणखी एक महत्त्वाची घटना या काळात घडत होती. इंग्लंडमध्ये सुरू झालेली औद्योगिक क्रांति तेथे पूर्णावस्थेस पोचून यंत्रयुगाला सुरवात झाली होती. यंत्रावर तयार झालेला स्वस्त व सुबक माल हिंदी बाजारपेठेत उतरू लागला होता. यापूर्वीचे येथील ग्रामीण अर्थ-जीवन स्वयंपूर्णतेच्या तत्त्वावर आधारलेले होते. या नवीन आयातीमुळे अलुतेदार-बलुतेदारांची पोटावर धारण बसली. काश्मिरी शाली, डाक्क्याची

मलमल व इतर कलाकुसर श्रेष्ठ प्रतीची असूनही तिची मागणी कमी झाली. औद्योगिक क्रांति किंवा यंत्रयुग यांपैकी कोणतीही गोष्ट त्या वेळी हिंदी समाजास समजत नव्हती. प्रत्येक अनर्थाला कारण इंग्रज व त्यांची नवीन राजवट आहे अशीच समजूत सर्वांची असे. पूर्वी जमीनमहसुलाव्यतिरिक्त फारसे कर नसत. क्वचित् असलेच तर ते नैमित्तिक असत. ईस्ट इंडिया कंपनीने इंग्लंडमधील राज्यपद्धति येथे सुरू केल्यामुळे आणि शांतता व सुव्यवस्था चांगली राखल्यामुळे त्यांनी येथे बरेच नवीन कर बसविले. कराचे हे स्थायी स्वरूप लोकांना मोठे जिकिरीचे वाटू लागले. सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक कारणांसाठी ज्याप्रमाणे लोक एकदम उतावळे होतात त्याप्रमाणे अन्य कारणांनी होत नसले तरी लोकांची मनोभूमिका तयार होण्यास या कारणांचा फार परिणाम होतो हे उघड आहे.

या सर्व घटनांत लष्करात असंतोष उत्पन्न होण्याची कारणे फार महत्त्वाची आहेत. या उठावाच्या वेळी लष्करातील सेवानिवृत्तीला वयोमर्यादा नव्हती. बरेचसे अधिकारी ७० च्या पुढे असत. त्यामुळे नवीन लोकांना वरच्या जागा मिळण्यास अडचण पडत असे. अधिकारांच्या मोठ्या जागा गोऱ्या लोकांनाच मिळावयाच्या व ज्या थोड्या सुभेदार, हवालदार, जमादार इत्यादि हिंदी लोकांना मिळावयाच्या त्याही अशा अडचणीमुळे लायक लोकांना मिळत नसत पंजाबातील शीख सत्तेचा पाडाव झाल्यापासून शिखांना लष्करात प्रवेश मिळू लागला. शिखांचे लष्करातील हे प्राबल्य, पिढीजात शिपाईगिरी करणाऱ्या हिंदूंना आवडले नाही. त्यामुळे आपली मुले बेकार होतील असे त्यांना वाटले.

ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरवातीच्या वेळेपासून कंपनीच्या हद्दीबाहेर जाताना कंपनीच्या लष्कराला 'दुप्पट भत्ता' देण्याची पद्धत सुरू होती. कंपनीचे राज्य वाढल्यानंतर हा मुलूख कंपनीच्या हद्दीत आल्यामुळे दुप्पट भत्ता देण्याची पद्धत बंद झाली. क्लाईव्हच्या वेळेपासून या बाबतीत लष्करात असंतोष होता. या कारणाने अनेक बंडेही झाली होती. १८०७ चे वेलोरचे बंड फारच गाजले होते. नवीन राज्य जिंकण्यासाठी लष्करातील शिपायांनी आटोकाट प्रयत्न करावयाचा, परंतु ते राज्य हाती येताच या शिपायांच्या तोंडाला पाने पुसली जावयाची अशी स्थिति बराच काळ चालू होती. कंपनीची भिस्त नेहमी गोऱ्या लष्करावर

असावयाची. गोऱ्या शिपायांचे पगार हिंदी शिपायांपेक्षा जास्त होते. काम करताना गोऱ्या शिपायांबरोबर सर्व संकटे सोसावयाची, आपल्याच जातभाईविरुद्ध लढून इंग्रजांना राज्य मिळवून द्यावयाचे, परंतु पगार घेताना मात्र कमी घ्यावयाचा, ही भावना हिंदी शिपायांना फार जाचू लागली. कवायती शिक्षण मिळण्यापूर्वी त्यांना कमी पगाराचे वैषम्य वाटत नव्हते. परंतु नंतर मात्र हा भेदभाव असह्य होऊन त्यातून असंतोषाचा स्फोट झाला. या सुमारास हिंदी शिपायाला दरमहा ८।। रु. पगार मिळत असे. या पगारात स्वतःचा खर्च त्याला भागवावा लागे. 'बंगाली सैन्या'तील बरेचसे शिपाई ब्राह्मण किंवा राजपूत असल्यामुळे ते लष्करात देखील स्वतःचे अन्न स्वतः शिजवून खात असत. लष्करी मोहिमेच्या वेळी सर्व सामान स्वखर्चाने इकडून तिकडे न्यावे लागत असे. त्यामुळे त्यांना बराच त्रास होई किंवा उपासमारही होई. कमी पगार, विषम वागणूक, भत्ता नाही, उपासमार व कामे मात्र जोखमीची यांमुळे बंडाचे वेळी हे सर्व लष्कर बिथरले होते.

या सर्व कारणांबरोबरच काही तत्कालीन कारणांचाही परिणाम या उठावाच्या वेळी झाला होता. ही कारणे तशी पाहिली तर फारच क्षुल्लक होती. परंतु लोकमत बिथरण्यास विशेषतः इंग्रजांविरुद्ध क्षोभ निर्माण होण्यास यांचा फार मोठा वाटा आहे. ई. इं. कंपनी जोपर्यंत मुख्यतः व्यापारी कंपनी होती, तोपर्यंत कंपनीचे अधिकारी हिंदी लोकांशी फार नमून वागत असत. मराठ्यांच्या व शिखांच्या पाडावानंतर त्यांना शत्रु असा कोणीच न उरल्याने त्यांची हिंदी लोकांशी वागण्याची पद्धत बदलली. जित व जेते यांचे नवीन नाते निर्माण झाले व ते पदोपदी हिंदी लोकांना जाणवू लागले. कंपनीच्या वरच्या अधिकाऱ्यांत बहुतेक गोरेच असले तरी सुभेदार-हवालदार इत्यादि लोक हिंदीच होते व त्यांचे शिपायांवर फार वजन होते.

१८५७ च्या क्षोभाच्या वेळी हे अधिकारी प्रथम फितविले गेले व नंतर त्यांच्यामार्फत बाकीचे सर्व लष्कर इंग्रजांविरुद्ध उठले. या क्षोभाच्या वेळी ज्या अनेक घटना झाल्या त्यांत अफवांचा सुळसुळाट लोकक्षोभास विशेषतः अराजक निर्माण करण्यास कारणीभूत झाला. लोकांवर ज्यांचे

वजन आहे अशा ज्योतिषांपासून, सोंगे घेणाऱ्या रायरंदापर्यन्त सर्वांनी या बाबतीत इंग्रजांविरुद्ध कौल दिला. कोणी प्लासीच्या लढाईची आठवण देऊन इंग्रजांच्या राज्याला शंभर वर्षे भरली असल्याने ते हमखास बुडणार असे भविष्य केले तर कोणी इंग्रजांची संख्या जगात थोडी असल्याने यापुढे विलायतेहून इकडे इंग्रज लोक येऊ शकणार नाहीत असा शोध लावला. श्रद्धाळू व भाबड्या लोकांचा यावर विश्वास बसला. इंग्रज लोक व त्यांचे राज्य यांविषयी लोकांच्या मनांत जो आदर निर्माण झाला होता त्याला या अफवांमुळे फार मोठा धक्का बसला. यांशिवाय आणखीही एक कारण महत्त्वाचे आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या उत्तर हिंदुस्थानातील 'बंगाली सैन्यात' या वेळी सर्व हिंदी लोकच होते. इंग्रजांच्या हिंदुस्थानातील तेहतीस युरोपीय पलटणींपैकी काही क्रिमियात, काही इराणच्या आखातात व बाकीच्या ब्रह्मदेशात गुंतलेल्या होत्या. कलकत्ता ते आग्रा या ७५० मैलांत एकही युरोपीय पलटण उभी नव्हती. त्यामुळे बंडवाल्या हिंदी लष्कराला धास्ती अशी कुणाचीच वाटली नाही. हिंदी लष्कराची शस्त्रे काढून घेण्याची इच्छा असूनदेखील इंग्रज अधिकाऱ्यांना ही गोष्ट करता आली नाही. बंडाचा उठाव व वाढ कशी झाली हे समजून घेण्यास या तत्कालीन घटना देखील फार महत्त्वाच्या आहेत.

वर १८५७ च्या उठावाची जी कारणे दिली आहेत त्यांपैकी प्रत्येक कारणाचा या क्षोभात भाग किती याचा ऊहापोह व निर्णय साधार केला गेला पाहिजे. परंतु तसे करण्यास येथे अवसर नसल्याने नुसती कारणेच पुढे मांडली आहेत. इतिहासात एकाकी किंवा अकस्मात् अशी घटना सहसा घडत नसते. प्रत्येक घटना ही अनेक गोष्टींचा परिपाक असते. सर्वसामान्य माणसाला पाठीमागच्या कारणांचे अज्ञान असल्याने त्याला त्या घटनेचा अर्थ तितकासा न लागल्याने तो त्याविषयी एकदम काही विधान करतो. बऱ्याच वेळेला कारणांची परंपरा लावणेही कठीण होते. कोठलेही शास्त्र समूहाच्या मनाचा अभ्यास करू लागते त्या वेळी त्या शास्त्राचे सिद्धान्त बदलते व अपूर्ण असणार हे उघड आहे. तेव्हा १८५७ च्या या घटनेचा अर्थ या कारणांचा विचार करून स्वतंत्र रीत्या लावणे जरूर आहे. ज्या माणसांनी या घटनेत भाग घेतला ती आता काळाच्या उदरात गडप

झाली आहेत. स्मृतिमय असे त्यांच्याविषयीचे जे ज्ञान आहे त्यावरूनच त्यांच्या मनाचा अंदाज बांधणे आता क्रमप्राप्त आहे व या दृष्टीनेच याविषयीचा पुढील ऊहापोह केला आहे.

या क्षोभाची मीमांसा करताना या घटना कोठे व कशा घडल्या हे प्रथम समजून घेतले पाहिजे, म्हणजे यांतील बऱ्याच घटनांचा अर्थ नीट लागेल. २६ फेब्रुवारी १८५७ ला पहिल्या प्रथम डमडमला शिपायांनी काडतुसे घेण्यास नकार दिला. २९ मार्चला बराकपूरच्या छावणीत मंगल पांडे याने अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्या. १० मेला मिरतच्या पलटणींनी उठावणी करून दिल्लीचा रस्ता धरला व त्यानंतर लगेच सार्वत्रिक उठावणी झाली. प्रथम बचाव व नंतर एक एक स्थळ ताब्यात घेऊन इंग्रजांनी सर्व प्रदेश परत जिंकून घेतला. उठावातील सर्वांत कडवा प्रतिकार तात्या टोपे यांच्याकडून झाला. चारी बाजूंनी इंग्रजी फौजा चालून आल्या असता, एतद्देशीय लोकांचा फारसा पाठिंबा नसता व हाताखालच्या फौजा स्वतःचा पक्ष सोडून जात असता तात्या टोपे यांनी नाणावलेल्या इंग्रज सेनानीस ज्या हुलकावण्या दिल्या तो सबंध इतिहास रोमांचकारी घटनांनी भरलेला आहे. १८५९ च्या सुरवातीस तात्या टोपेला शिंद्यांच्या राज्यातील एका जमीनदाराने फसवून रात्री बेसावधपणे पकडले व १८ एप्रिल १८५९ ला सिप्री येथे त्याला फाशी देण्यात आले. १८५७ च्या क्षोभाचा हा शेवटचा प्रसंग होय. या दोन वर्षांतील घटना मराठीतील रियासतकार डॉ. सरदेसाई यांच्या 'ब्रिटिश रियासत : उत्तरार्ध' या ग्रंथात किंवा ना. के. बेहेरे यांच्या '१८५७' या ग्रंथात दिल्या आहेत, त्या जिज्ञासूंनी पाहाव्यात. इंग्रजीत केंब्रिज इतिहासाच्या ६ व्या खंडात या क्षोभाची हकीकत चांगल्यापैकी आहे.

१८५७ साली घडलेल्या या घटनेला काय नाव द्यावे याबद्दल इतिहासकारांत बरेच मतभेद आहेत. या युद्धात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या कंपनीच्या अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी या घटनेला 'शिपायांचे बंड' असे नाव दिले आहे. काडतुसाला गाईची व डुकराची चरबी लाविली आहे, या अफवेने हिंदु-मुसलमान बिथरले व हे बंड उद्‌भवले असे त्यांचे म्हणणे आहे. या म्हणण्यात तथ्य असले तरी नाण्याची ही एक बाजू झाली.

शिपायांप्रमाणेच बिठूरचे नानासाहेब, झांशीची लक्ष्मीबाई, अयोध्येचा नवाब, दिल्लीचा बादशहा, बुंदेलखंडातील तालुकदार इत्यादि मंडळीही या युद्धात होती. ही मंडळी या युद्धात कां उतरली याचे उत्तर स्वतंत्र रीत्या द्यावे लागेल. बंड केलेल्या शिपायांचा व यांचा काहीही संबंध नसता शिपायांचे नेतृत्व यांचेकडे कसे आले व दोघांनीही आत्माहुतीची तयारी कां दर्शविली हा प्रश्न शिल्लक राहतो व त्याचे उत्तर 'शिपायांचे बंड' म्हणून देता येत नाही.

इंग्रज इतिहासकारांच्या दुसऱ्या टोकाला जाऊन स्वातंत्र्यवीर सावरकरांनी या क्षोभाला 'क्रांतियुद्ध', 'स्वातंत्र्ययुद्ध' म्हणून संबोधिले आहे. त्यांच्या मते १८५७ साली शिपाई, जनता व राजे-नवाब या सर्वांनी पद्धतशीर संघटना करून इंग्रजांना या देशातून घालवून देण्याचा प्रयत्न केला. ३१ मे १८५७ या दिवशी एकाच वेळी सर्व ठिकाणी उठाव करून रविवारी इंग्रज चर्चमध्ये गेल्यानंतर त्यांच्यावर हल्ला करावयाचा, त्यांना ठार मारावयाचे व राज्ययंत्र आपल्या ताब्यात घ्यावयाचे असा हा कट होता. परंतु काही शिपायांच्या उतावळेपणाने हा कट सिद्धीस न जाता अगोदरच उठाव झाला व त्यामुळे इंग्रज सावध झाले. डमडम, बराकपूर व मिरत या ठिकाणचा उतावळेपणा शेवटी सर्वांना बाधला. या क्षोभाची पूर्वतयारी बरेच दिवस अगोदर चालू होती. एका बराकीतून दुसऱ्या बराकीत पोळ्या पाठविणे, ब्राह्मणांचे हातून फुले पाठविणे इत्यादि गोष्टी पद्धतशीरपणे चालू होत्या. मौलवी व ब्राह्मण शिपायांना इंग्रजांविरुद्ध चेतवीत होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १८५७ च्या या क्षोभाला 'स्वातंत्र्य-युद्ध' हे दिलेले नाव लोकांना इंग्रजांविषयी द्वेष वाटत असल्यामुळे व सावरकरांच्या प्रभावी भाषेमुळे इतके आवडले की, त्याबद्दल फारसा कोणी विचारच केला नाही. हा शब्दप्रयोग हिंदुस्थानात इतिहासकार व इतिहासाचे जाणते विद्यार्थी सोडल्यास सर्वमान्य असा झाला आहे. 'जगाच्या इतिहासाचे ओझरते दर्शन' या ग्रंथांत भारताचे पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू यांनीही हा शब्दप्रयोग, सावरकरांचा उल्लेख न करता वापरला आहे. डलहौसीने राज्ये खालसा करण्याचे जे तंत्र सुरू

केले त्यात ज्यांच्या जहागिरीच्य राज्यांच्या किंवा उत्पन्नाच्या आहुती पडल्या ते सर्व असंतुष्ट लोक या शिपायांच्या उठावात सामील झाले. इंग्रजांनी त्यांच्यावर जो अन्याय केला असे त्यांना वाटत होते त्याचा त्यांनी सूड घेण्याचा प्रयत्न केला. शिपायांनी बंड केले नसते तर या जहागिरदार, नबाबांनी इंग्रजांशी युद्ध पुकारले असते का? व यांचे नेतृत्व मिळाले नसते तर शिपायांनी उठाव केला असता का? या दोन प्रश्नांचा ऊहापोह झाला पाहिजे.

या स्वातंत्र्ययुद्धाच्या पाठीमागे संघटित शक्ति उभी होती असे विधान स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केले आहे. परंतु या विधानाला निश्चित पुरावा देण्याचे त्यांनी टाळले आहे. इंग्रज अधिकाऱ्यांनी व लेखकांनी एवढा मोठा क्षोभ पूर्वनियोजनावाचून होणे शक्य नाही असा जो संशय व्यक्त केला, त्यावरून सावरकरांनी हे अनुमान बांधलेले आहे. इतकी तयारी जर सुरवातीपासून होती तर इंग्रजांना त्याचा सुगावा कां लागला नाही? हिंदी दरबारातल्या बितंबातम्या इंग्रजांना कळत व त्यांच्याच जोरावर त्यांनी हिंदुस्थान जिंकून घेतला होता. नेमके याच वेळी त्यांच्या सर्व नोकरांनी त्यांना कसे फसविले? या कटात सर्व मोठे लोक सामील होते, असे जर धरले तर हा कट उत्तर हिंदुस्थानपुरताच मर्यादित कां होता याचेही उत्तर द्यावे लागेल. त्याचप्रमाणे सर्व हिंदुस्थानात एकदम उठाव करून राजयंत्र ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणारा हा महापुरुष कोण होता याचेही उत्तर मिळाले पाहिजे. त्याशिवाय या विधानाला बळकटी येणार नाही.

इतिहासात 'क्रांतियुद्ध' किंवा 'स्वातंत्र्ययुद्ध' कशाला म्हणावे याचे काही संकेत ठरले आहेत. क्रांतीसाठी युद्ध किंवा स्वातंत्र्यासाठी युद्ध इतक्या मर्यादित अर्थाने हे शब्द वापरले जात नाहीत. ज्या युद्धामुळे पहिली राजवट जाऊन दुसरी राजवट आली व ती स्थिर झाली किंवा पारतंत्र्यातील जनतेवर असलेली परकीय राजवट जाऊन स्वकीय राजवट आली तर त्याबद्दल हे शब्दप्रयोग करता येतील. एरवी नाही. कायद्याने प्रस्थापित झालेल्या कोणत्याही सरकारविरुद्ध जर बेकायदेशीर अशी कृति झाली व ती अयशस्वी ठरली तर या अयशस्वी कृतीस 'बंड'च म्हणावे

लागेल. कायद्यात याला दुसरा पर्याय शक्य नाही. यशस्वी झाल्यास क्रांति व अयशस्वी झाल्यास बंड हे ठरलेलेच आहे. या न्यायाने इंग्रजांनी कायदेशीरपणे या कृतीस बंड म्हटल्यास त्यात वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. सत्याची ती एक बाजू आहे हे मान्य करणे भाग आहे.

या क्षोभाला घटकाभर 'बंड' हे नाव मान्य केले तरी 'शिपायांचे बंड' हा शब्दप्रयोग बरोबर आहे का हा विचारही केला पाहिजे. या बंडात प्रामुख्याने इंग्रजांच्या लष्करातील शिपाई होते, ही गोष्ट खरी; परंतु इतरही इंग्रजांविरुद्ध असंतुष्ट असणारे लोक त्यात सामील झाले होते. शिपायांपासून जहागिरदारांपर्यंत इंग्रजांविरुद्ध जे जे लोक रुष्ट झाले होते त्या सर्वांनी या घटनेत भाग घेतला. 'शिपायांचे बंड' हा शब्दप्रयोग बव्हंशी खरा असला तरी सर्वस्वी खरा नाही.

तांत्रिक दृष्टीने हे युद्ध स्वातंत्र्ययुद्ध नव्हते असे म्हटले तरी काही घटना विचारात घ्याव्या लागतात. या युद्धाला स्वातंत्र्ययुद्ध म्हणणाऱ्यांनी आपले म्हणणे सिद्ध केले नसले तरीही हा शब्दप्रयोग आता लोकप्रिय झाला आहे. त्यामुळे हे स्वातंत्र्ययुद्ध नव्हते असे म्हणणारांना आता ते 'स्वातंत्र्ययुद्ध' कां नव्हते हे सिद्ध करण्याची पाळी आली आहे व या दृष्टीने या क्षोभाच्या वेळच्या सर्व घटना लक्षात घेऊन या मुद्द्याचा विचार केला आहे.

१८५७ सालच्या या क्षोभात मुख्यत: इंग्रजांच्या लष्करातील शिपायांचा हात होता याबाबत मतभेद नाहीत. हे शिपाई इंग्रजाविरुद्ध धर्मासाठी उठले कीं स्वातंत्र्यासाठी स्वत:च त्यांनी उठाव केला कीं या बाबतीत त्यांना कोणी मार्गदर्शन केले हे मतभेदाचे मुद्दे आहेत. शिपायांनंतर यात असंतुष्ट जमीनदारांचा भरणा होता. दिल्लीच्या बादशहाचे हस्तक, लखनौच्या नबाबाच्या बेगमा, ब्रह्मावर्तास राहणारे दुसऱ्या बाजीरावाचे दत्तक चिरंजीव नानासाहेब व त्यांचे साथीदार, झाशीची राणी लक्ष्मीबाई व इतरही अनेक तालुकदार, जहागिरदार यात सामील झाले होते. परंतु या सर्वांच्या बाबतीत ध्यानात घेण्याजोगी गोष्ट ही आहे की, हे सर्व लोक त्यांच्या जहागिरी किंवा नेमणुका नष्ट झाल्या म्हणूनच या क्षोभात उतरले. ते स्वत: किंवा त्यांचे साथीदार, आश्रित मंडळी सोडल्यास इतर एकही मान्यवर व्यक्ति या युद्धात

इंग्रजांविरुद्ध उभी राहिली नाही. ही गोष्ट 'स्वातंत्र्ययुद्ध' हे नाव देणाऱ्यांनी डोळ्याआड केली आहे. १८८० ते १९४७ पर्यंत इंग्रजांविरुद्ध नि:शस्त्र किंवा सशस्त्र प्रतिकार करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांत लो. टिळकांपासून म. गांधीपर्यंत व स्वातंत्र्यवीर सावरकरांचेपासून देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत देशभक्तांची अशी एक मालिका दाखविता येते की, कोणताही वैयक्तिक स्वार्थ नसताना या मंडळींनी इंग्रजांविरुद्ध चळवळी उभारल्या व शस्त्रे सरसावली. परंतु १८५७ च्या या प्रचंड क्षोभात शिपाई व असंतुष्ट राजे-नबाब यांच्या व्यतिरिक्त एकही पुढारी किंवा राजा-नबाब सामील झाला नाही. यावरून या क्षोभात लोकोत्तर व देशप्रेमाच्या ध्येयापेक्षा आत्यंतिक वैयक्तिक स्वार्थच उघड दिसतो.

घटकाभर हा प्रयत्न स्वातंत्र्यासाठी आहे असे धरले तरी स्वातंत्र्य कुणाचे? व इंग्रजांना या देशातून घालवून दिल्यानंतर राज्य कोणाच्या हातात द्यावयाचे? हे प्रश्न उत्पन्न होतात. दिल्लीला गेलेल्या बंडवाल्यांनी दिल्लीत बादशहाच्या नावाने द्वाही फिरविली; व बिठूरच्या जवळ असलेल्या कानपुरातल्या बंडवाल्यांनी पेशवाईची द्वाही फिरविली. विशेष म्हणजे एकाच ठिकाणच्या पलटणीतल्या काही लोकांनी दिल्लीला व इतरांनी इतर ठिकाणी अशा वेगवेगळ्या गोष्टी केल्या. या दोन्ही गोष्टी एकच आहेत कीं काय याचा वाचकांनी शांतपणे विचार करावा. एकमेकांशी दोनशे वर्षे झगडणाऱ्या या सत्ता जणू एकच आहेत असा भास या घटनेने करून दिला जातो. याचा विचार अद्याप कोणी केला नाही याचा मोठा खेद वाटतो.

वरसईकर गोडसे भटजींनी 'माझा प्रवास' म्हणून १८५७ च्या क्षोभाविषयी जे पुस्तक लिहिले ते इतिहास-साधनांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. त्या पुस्तकात नानासाहेब या बंडात कसे सामील झाले याची हकीकत वाचण्याजोगी आहे. ('माझा प्रवास' : पृष्ठ २६–२७) कानपुरातल्या शिपायांनी बंड उभारले व नानासाहेबांना पुढारीपण स्वीकारण्याची विनंती केली. घटकाभर विचार करून नानासाहेबांनी ती विनंती मान्य केली. दिल्लीच्या बादशहाचीही हीच स्थिति आहे. बंडवाले शिपाई ११ मे १८५७ ला दिल्लीला आले व त्यांनी 'खल्क् खुदाका, मुल्क् बादशहाका' अशा घोषणा करीत बादशहाला 'बादशहा' केले. या घटना

एवढेच दर्शवितात की बंडात पुढाकार शिपायांचा होता व त्यांनी या 'पुढाऱ्यांना' खेचून आपल्या मागे ओढून नेले. झाशीला असणाऱ्या इंग्रजी पलटणीतील काळचा लोकांनी बेदिली करून दंगा आरंभिला. "सर्व गोरे लोक मारून...छावणी जाळून टाकली. सर्व काळचा पलटणी तेथून निघून बाईसाहेबांच्या वाड्यासमोर येऊन बाईसाहेबांस हाका मारू लागल्या. तेव्हा त्यांनी बाहेर येऊन ऑफिसर लोकांस भेटून अभयवचन दिले व त्यांनीही सांगितले की, तुम्ही आमचे यजमान, आम्ही तुमचा हुकूम ऐकू व तुम्हापासून दरमहा मुशाहिरा घेत जाऊ..." ('माझा प्रवास' पृष्ठ ६२) अशी ही घटना वरसईकर गोडशांनी आपल्या पुस्तकात दिली आहे तीही वरील विधानाला पुष्टि देणारीच आहे. शिपायांच्या असंतोषाला कोणतेही कारण का असेना, परंतु इतर मंडळी मात्र मूळची असंतुष्ट परंतु नंतर इंग्रजाविरुद्ध लाट आलेली पाहून त्यात सामील झालेली अशी आहेत. नानासाहेब, झांशीची राणी, लखनौचे नबाब या सर्वांना स्वतःचे सरंजाम जाताना वाईट वाटले होते. या गोष्टीचा सूड घेण्याची इच्छाही प्रथमपासून त्यांच्या मनात असेल कदाचित्; इतर असंतुष्ट मंडळींशी त्यांनी पत्रव्यवहारही केला असेल. हे सर्व गृहीत धरूनही या क्षोभाच्या उभारणीचे श्रेय त्यांना देता येणार नाही. या क्षोभाचा फायदा घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला इतकीच गोष्ट यात सिद्ध होते.

दुसऱ्याही तऱ्हेने हे 'स्वातंत्र्ययुद्ध' नव्हते असे म्हणता येईल. कोल्हापूरचे छत्रपतिमहाराज, मिरज, सांगली, तासगाव, कुरुंदवाड, बुधगाव येथील पटवर्धन मंडळी, फलटणचे निंबाळकर, ग्वाल्हेरचे शिंदे, इंदूरचे होळकर, धारचे पवार, बडोद्याचे गायकवाड, तंजावरचे भोसले, हैद्राबादचा निजाम किंवा राजपुतान्यातील राजपूत राजे-महाराजे यांच्यापैकी एकानेही या स्वातंत्र्ययुद्धाच्या रणकुंडात उडी टाकू नये हे आश्चर्य नव्हे काय? मराठ्यांची गोष्ट सोडली तरी इतर पुढाऱ्यांना या स्वातंत्र्ययुद्धाबद्दल प्रेम कां वाटू नये? उत्तर हिंदुस्थानात एवढे रणकुंड चालू असता सबंध दक्षिण हिंदुस्थान या घटनेकडे निर्विकार मनाने पहात कां राहिला? या क्षोभाला स्वातंत्र्ययुद्ध म्हणणाऱ्यांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. केवळ इंग्रजांविरुद्ध लढले म्हणून झांशीची राणी लक्ष्मीबाई

व बिठूरचे नानासाहेब 'स्वदेश व स्वधर्म' यासाठी लढले असे होत नाही. यासाठी निश्चित व सबळ असा पुरावा पुढे केला पाहिजे. जो पुरावा उपलब्ध आहे त्यावरून ते स्वार्थासाठी यात उतरले असा दाखविणाराच आहे हेही लक्षात घेण्याजोगे आहे. शिपायांनी बंड करून इंग्रजांचे राज्ययंत्र मोडून टाकले नसते तर ही मंडळी 'उमीचंद व अयोध्येच्या बेगमां'प्रमाणेच इंग्रजांविरुद्ध नुसती हात चोळीत बसली असती हे अगदी उघड आहे.

आता शिपायांनी बंड कां केले याची पार्श्वभूमि तपासून बघितली पाहिजे. सुरवातीला या क्षोभाची जी लष्करी कारणे दिली आहेत ती वाचून वाचकांनी त्यावर शांतपणे विचार करावा. इंग्रजी लष्करातील शिपायांचे हे पहिलेच बंड नव्हते. इंग्रजांविरुद्ध त्यांच्या लष्करातील शिपायांनी अनेकदा बंडे केली होती. भत्ता प्रकरण, पगारातील विषमता, वाईट वागणूक ही बंडाची नेहमीची कारणे होती. १८५७ साली ही सर्व कारणे तर होतीच परंतु त्या व्यतिरिक्त इतरही नवीन व प्रक्षोभक कारणे पुढे आली होती. हिंदुस्थानच्या इंग्रजी सैन्याचे त्या वेळी 'मुंबईचे सैन्य' 'मद्रासचे सैन्य' व 'बंगालचे सैन्य' (Bengal Army) असे तीन विभाग होते. उत्तर हिंदुस्थानात असलेल्या सर्व सैन्याला 'बंगालचे सैन्य' असे संबोधिले जाई. मुंबई व मद्रासच्या सैन्यांत पूर्वी अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांचा भरणा बहुतांशी होता. या उलट बंगालच्या सैन्यात कर्मठ ब्राह्मण व कडवे राजपूत व पुरभय्ये यांचा भरणा होता. १८५७ च्या उठावात फक्त बंगालच्या सैन्यानेच उठावणी केली.

१८२४ साली ब्रह्मदेशांत झालेल्या पहिल्या युद्धाच्या वेळी बंगाली सैन्यापैकी बराकपूरच्या ४७ व्या पायदळ तुकडीने जहाजावर चढण्यास नकार दिल्याने त्या तुकडीवर तोफा डागून ती उधळून लावली होती. (पहा Rawlinson : British Achievements in India, Page 95) लष्करात शिरतेवेळी समुद्रावर जाण्याचा प्रश्न नव्हता म्हणून आम्ही या सैन्यात शिरलो; नाहीतर आमची जात बुडविण्यासाठी यात आम्ही शिरलो नसतो असा त्या शिपायांचा दावा होता. ब्रह्मदेश, चीन, इराण या ठिकाणी १८५६ च्या सुमारास यामुळेच इंग्रजी पलटणी पाठवाव्या लागल्या. अशा स्थितीत अडचणी उत्पन्न होतात म्हणून १८५६ साली कंपनी सरकारने

एक वटहुकूम जाहीर केला. त्यात सैन्यातील शिपायांनी 'पृथ्वीच्या पाठीवर कोठेही पाठविले तेथे गेले पाहिजे' असे बजावण्यात आले. त्यामुळे त्यांच्यात क्षोभ निर्माण झाला. त्यातच काडतुसांचे प्रकरण पुढे आले व या क्षोभाच्या अग्नीचे वणव्यात रूपांतर झाले. लष्करातील लोकांच्या असंतोषाचा हा सर्व इतिहास व क्षोभाचे तत्कालीन कारण लक्षात घेतल्या-वाचून १८५७ च्या घटना समजणार नाहीत. ज्या शिपायांनी स्वतःच्या जातभाईविरुद्ध लढून एकामागून एक राज्ये इंग्रजांना जिंकून दिली त्यांची मने बदलून ते 'स्वातंत्र्या'साठी लढू लागले असे म्हणण्याचा चमत्कार इतिहासापेक्षा कादंबरीत व काव्यातच अधिक शोभून दिसेल. आपण या-पुढे लष्करात राहिल्यास आपली जात बाटेल व समाजात छीः थू होईल ही भीति ज्या वेळी या शिपायांना वाटली त्याच वेळी त्यांनी इंग्रजांविरुद्ध शस्त्रे सरसावळी.

१८५७ च्या या युद्धात एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसते. कोणत्या का कारणाने असेना, बंडातील सर्वांचा शत्रु इंग्रज असल्यामुळे ते एकत्र आले. या उठावानंतर काय करावयाचे याची योजना उठाव करणाऱ्यांजवळ नव्हती. नाहीतर 'मोगल बादशाही' व 'पेशवाई' एकदम स्थापन झाल्या नसत्या. निश्चित पुढारी नव्हते. शिपायांनी उठाव करावा; 'मारो फिरंगीको' म्हणून इंग्रजांच्या कत्तली कराव्यात; जाळपोळ, लुटालूट यांतील जमेल ते करावे; नंतर दिल्लीला धावत सुटावे असा सर्व प्रकार होता. नेतृत्वाचा व संघटनेचा अभाव असल्यामुळेच बंडवाले पराभूत झाले. अनेक लढायांत कसास उतरलेले, त्वेषाने चवताळलेले, सशस्त्र व संख्येने प्रचंड अशा या लोकांचा पराभव झाला त्या पाठीमागची कारणमीमांसा ही अशी आहे. पूर्वीच्या लढायांत कवायतीविरुद्ध इतर फौजा असल्यामुळे इंग्रजांना जय मिळे. परंतु या वेळी दोन्ही बाजूंकडील फौजांना 'कवायत' चांगली माहीत होती. परंतु युद्धात चिमुकल्या इंग्रज फौजा बंडवाल्यांना पुरून उरल्या यातले इंगित ध्यानात घेतले पाहिजे. शिस्त व कवायत माहिती असलेले पलटणीतील हिंदी शिपाई बेशिस्तीने वागले व म्हणून चिमुकल्या इंग्रजी फौजांपुढे ते हतबल झाले. या सर्व विवेचनाचा निष्कर्ष हाच की १८५७ च्या या घडामोडींना 'स्वातंत्र्य युद्ध' असे नाव रास्त

अर्थाने देता यावयाचें नाही. हिंदु व मुसलमान एकाच वेळी इंग्रजांविरुद्ध लढत असल्याने 'धर्मयुद्ध'ही म्हणता येणार नाही. धर्मयुद्धातील दोन्ही बाजूंकडे एकाच धर्माचे व धर्मासाठी प्रेरित होऊन आलेले लोक असावे लागतात. येथे बंडवाल्यांविरुद्ध शीख, गुरखे, हिंदु, मुसलमान सर्वजण खांद्याला खांदे लावून लढलेले आढळतात.

१८५७ च्या क्षोभाला काय म्हणून संबोधावे हा एक प्रश्न नेहमी चर्चेस घेतला जातो. 'धर्मयुद्ध' 'स्वातंत्र्ययुद्ध' ही नामाभिधाने कशी अयोग्य आहेत ते आतापर्यन्त आपण पाहिले. पद्मभूषण डॉ. सरदेसाई यांनी 'लोकक्षोभ' व '१८५७ चा बनाव' अशी दोन नावे या कृतीला दिली आहेत. लोकांत क्षोभ निर्माण झाला होता, हे खरे असले तरी या क्षोभाचे रूपांतर प्रतिकारात झाले नव्हते. १८५७ साली इंग्रजांच्या राज्याविषयी प्रेम असे कोणालाच वाटत नव्हते. '१८५७ चा बनाव' हा शब्दप्रयोग बरोबर असला तरी सर्व गोष्टी या नावातून स्पष्ट होत नाहीत. 'काही तरी घटना' घडली इतकाच याचा अर्थ होईल. यासाठी निराळा शब्दप्रयोग करणे जरूर आहे.

१८५७ च्या कृतीला 'इंग्रजांविरुद्धचा उठाव' हे नाव योग्य आहे. मात्र 'राष्ट्रीय उठाव' हे नाव अयोग्य ठरेल. '१८५७ चा उठाव' म्हटल्याने यात शिपायांप्रमाणेच इतरांनी भाग घेतला हेही सिद्ध होते व सर्वांचे इंग्रजांविरुद्ध एकमत होते ही वस्तुस्थितीही उघड दिसते. 'उठाव' या शब्दात, 'बंड' या शब्दात कृति करणाराला कमीपणा देण्याचा जो हेतु असतो, तो हेतूही चिकटविला जात नाही. स्वार्थ, देशप्रेम, धर्मप्रेम कोणत्याही कारणासाठी उठाव होऊ शकतो. त्यामुळे हा शब्दप्रयोग अर्थवाही असून याच्या वापराने कोणावरही अन्याय होणार नाही. यासाठी हाच शब्दप्रयोग सर्वोत्तम असून त्याचा वापर केला जावा असे सुचवावेसे वाटते.

सारांश : १८५७ साली इंग्रजांविरुद्ध जी लाट उसळली होती तिचे स्वरूप अभूतपूर्व असे होते. बंगालच्या सैन्यापैकी बहुतेक सैन्य यात सामील झाले होते. इंग्रजांच्या लष्करातील शिपायांप्रमाणेच इंग्रजी राजवटीमुळे ज्यांची वतने, जहागिऱ्या व नेमणुका नाहीशा झाल्या होत्या अशी मंडळीही यात सामील झाली. काय करावयाचे याची योजना नव्हती. त्यामुळे

कोणी दिल्लीच्या तख्ताचे पुनरुज्जीवन करू पहात होता तर काहींना पेशवाईची पुनः स्थापना करावयाची होती. इंग्रजांविरुद्धचा असंतोष हा मात्र समान बिंदु होता. उत्तर हिंदुस्थानात या क्षोभाने चोहोकडे पेट घेतला, तरी सर्व दक्षिण हिंदुस्थान शांत होते. लोकांना इंग्रजांविषयी प्रेम वाटत नसले तरी त्यांनी प्रत्यक्ष कृति फारशी केली नाही. संघटनेच्या अभावी व निश्चित नेते नसल्याने कसलेले सैन्यही यशस्वी होऊ शकले नाही. सर्व दृष्टींनी विचार करता या क्षोभाला व कृतीला 'स्वातंत्र्ययुद्ध' किंवा 'राष्ट्रीय उठाव' असे म्हणता यावयाचे नाही. 'शिपायांचे बंड' या नावापेक्षा 'इंग्रजांविरुद्धचा उठाव' हे नामाभिधान अधिक योग्य वाटते. यासाठी याचा वापर व्हावा असे सुचवावेसे वाटते.

* * *

४

१८५७ च्या उठावाची मीमांसा व फलश्रुति

१८५७ च्या उठावासंबंधी विचार करताना काही प्रश्नांचा विचार केला पाहिजे. मराठी भाषेत '१८५७' वर बरेच साहित्य पूर्वी होते व या वर्षी १८५७ च्या स्वातंत्र्य समरशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने नवीनही निर्माण झाले. परंतु या सर्व साहित्यात शीख या उठावात सामील न होता, इंग्रजांना साहाय्य करण्यास कां प्रवृत्त झाले? व १८५७ च्या या उठावाची फलश्रुति काय? या दोन प्रश्नांचा नीट ऊहापोह केला गेला नाही असेच म्हटले पाहिजे.

१८५७ चा उठाव मुख्यत: उत्तर हिंदुस्थानपुरता मर्यादित असला तरी त्या ठिकाणी त्याचे स्वरूप तीव्र होते. रणजितसिंगाने मोठ्या परिश्रमाने निर्माण केलेले प्रचंड साम्राज्य, इंग्रज शक्तीच्या खाईत भस्मसात् झाले ही घटना अगदी ताजी होती. आपल्या आवडत्या नेत्याने कष्टाने निर्माण केलेले हे राज्य नष्ट करणाऱ्या इंग्रजांच्याविषयी शिखांच्या मनात खरे म्हणजे तिरस्कार व द्वेष वाटणे नैसर्गिक होते. इंग्रजांच्याविरुद्ध सगळीकडे आग निर्माण झाल्यावर तीत आहुति टाकावयास शिखांनी प्रथम पाऊल उचलावयास हवे होते. असे असताना १८५७ च्या वेळी शीख समाज

प्रसिद्धि : सन्मति (मासिक) : दिवाळी विशेषांक १९५७.

या उठावाकडे निर्विकार मनाने कां पहात राहिला? त्यांनी या उठावात आपला वाटा उचलून शिखांचे राज्य नष्ट करणाऱ्या इंग्रजांचा सूड कां घेतला नाही? हे प्रश्न या उठावाचा अभ्यास करणाऱ्या सर्वांना भेडसावीत असतात. शीख नुसतेंच तटस्थ राहिले नाहीत तर त्यांनी हा उठाव मोडून काढण्यास इंग्रजांना मदत केली ही वस्तुस्थिति आहे. शिखांच्या या कृतीला काहींनी देशद्रोही, धर्मद्रोही अशी शेलकी विशेषणेंही लावली आहेत. परंतु शिखांच्या इतिहासाचा अभ्यास केला तर हे सर्व अयोग्य व अनाठायी आहे हे लक्षात येते. व्यक्तीप्रमाणेच समाजाच्या विचारामागे एक मानस-शास्त्र असते. त्याकडे दुर्लक्ष करून, प्रश्नाचा अभ्यास केल्यास, अभ्यास अशास्त्रीय होतो व प्रश्न नीट समजत नाही. भावनात्मक दृष्टीने या प्रश्नाकडे पाहून घटनांचा उलगडा किंवा बोध होणे अशक्य आहे.

लष्करातील शिखांनी इंग्रजांना साहाय्य केल्याबद्दल त्यांना दोष द्यावयाचा तर मद्रासपासून ग्वाल्हेरपर्यंत सर्व देशी पलटणी हा उठाव मोडण्यात पुढे होत्या त्यांना कां दोष देऊ नये? लष्कराव्यतिरिक्त इतर शीख समाज या उठावात सामील न होता तटस्थ राहिला याचे कारण शीख समाजाच्या मनात दिल्लीच्या मोगल बादशाहीविषयी एक मोठी अढी होती. शिखांचे अनेक धर्मगुरु मोगल बादशाहांनी अत्यंत क्रूरपणे हालहाल करून ठार मारले होते. शिखांच्या देवस्थानांची विटंबना केली होती. शिखांची ससेहोलपट करून अनेकदा त्यांच्या कत्तली केल्या होत्या. कित्येक शतके हा अमानूष प्रकार चालला होता. तेव्हा आपल्या समाजाची, धर्माची व गुरूंची अवहेलना व उच्छेदन करणाऱ्या मोगल बादशाहीचा पुनरुद्धार न करण्यात शिखांचे काय चुकले? चुकले तर नाहीच परंतु तिचा पुनरुद्धार न करण्यात त्यांचा स्वाभिमानच व्यक्त होतो. मोगल बादशाहीची अशी जुलमी राजवट व शीख समाजाची झालेली परवड ज्यांना माहीत आहे ते शिखांना या उठावातील उदासीनतेबद्दल मोगल बादशाहीला पाठिंबा न देण्याबद्दल कधीही दोष देणार नाहीत. उलट इंग्रजांच्या साहाय्याने पुन-रुज्जीवित होत असलेली आपल्या शत्रूची राजवट त्यांनी मुळातच उखडून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यातच त्यांचा धर्माभिमान व कांही अंशी सुडाचीही भावना व्यक्त होते.

शिखांना दोष द्यावयाचा असेल तर त्यांनी या उठावात प्रयत्न करून, रणजितसिंगाचे नष्ट झालेले राज्य पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न कां केला नाही याबद्दल देता येईल. रणजितसिंगाच्या मृत्यूनंतर शीख लष्करातील बेदिली, बेशिस्त व गोंधळ यांमुळे रणजितसिंगाच्या राणीनेच–जिंदाराणीने–त्यांना इंग्रजांवर लोटून, त्यांचा चक्काचूर केला होता ही घटना अगदी ताजी होती. संघटनेचा व नेतृत्वाचा अभाव हे या औदासीन्याचे प्रमुख कारण आहे. देशातील इतर भागातील जनतेप्रमाणेच शिखांनाही असे वाटले की, इंग्रजांचे राज्य आता कायमचे आपल्या डोक्यावर लादले गेले आहे. त्याला विरोध करून कपाळमोक्ष करण्यात शहाणपणा नाही.

शीख, गुरखे व देशातील इतर समाजाच्या औदासिन्याचा आणखी एक अर्थ स्पष्ट होतो तो हाच की, उठावाच्या समकालीन लोकांना हे स्वातंत्र्य-युद्ध आहे किंवा क्रांतियुद्ध आहे असे वाटले नव्हते. नंतरच्या राजकारणी लोकांनी पुढच्या राजकारणाच्या घटनांवरून, पाठीमागच्या घटनांची केलेली मीमांसा निदान त्या वेळी तरी सर्वांना अमान्य होती असाच याचा अर्थ निघतो.

* * *

या उठावाची फलश्रुति काय ?

१८५७ च्या या घटनेला कोणतेही नामाभिधान दिले तरीही त्याची तीव्रता स्पष्ट होते. उठावामागच्या हेतूबद्दल काही मतभेद असू शकतील, परंतु या उठावाच्या फलश्रुतीबद्दल मात्र मतभिन्नता असण्याचे काही कारण नाही. या फलश्रुतीचा नीट विचार करावयाचा तर एक प्रश्न विचारात घेऊन त्याचे उत्तर पाहून या घटनेचा पडताळा पाहता येईल. १८५७ झालेच नसते तर काय झाले असते ? असा प्रश्न विचारात घेण्याजोगा आहे. शिवाजी झाला नसता तर सर्व हिंदुस्थान यवनमय झाले असते असे 'भूषण' कवीने म्हटले आहे व ते अगदी यथार्थ आहे. दक्षिण हिंदुस्थान व पर्यायाने सर्व हिंदुस्थान मुसलमानमय होत असता शिवाजीने ती लाट परतवून लावली व यातच शिवाजीचा मोठेपणा सिद्ध होतो. तशीच गोष्ट या १८५७ च्या उठावाने झालेली आहे. १८५७ झाले नसते तर सर्व हिंदुस्थान खिरस्तीस्थान होऊन गेले असते.

१७५७ साली प्लासीच्या लढाईत विजय मिळाल्यापासून ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी व इतर ख्रिश्चन मिशनरी हिंदुस्थानात ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यात गुंग झाले होते. १७५७ ते १८५७ या शंभर वर्षांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार हिंदुस्थानात अनेकविध मार्गांनी व मोठ्या प्रमाणावर होत होता. सरकारी कायदे ख्रिश्चन धर्मप्रसाराला अनुकूल असेच होत जात होते. रजिस्टर लग्नाचा कायदा, एकत्र कुटुंबांतील एखादी व्यक्ति ख्रिश्चन झाल्यास त्याचा हिंदु कुटुंबातील मालमत्तेवरील मान्य केलेला हक्क, ख्रिश्चन मिशनऱ्यांना शिक्षण प्रसाराला प्रच्छन्न नावाने परंतु वस्तुतः धर्मप्रसारासाठी मिळत असलेली मदत, ख्रिश्चन झालेल्यांना नोकऱ्यांत बढतीमध्ये मिळत असलेले लाभ, या व इतर गोष्टींवरून कंपनी सरकारचे धोरण, उघडपणे ख्रिश्चन धर्मप्रसाराचे होते हे व्यक्त होते. या धर्मप्रसाराला १८५७ च्या उठावाने पायबंद बसला हा या उठावाचा सर्वांत मोठा फायदा म्हणता येईल. धार्मिक बाबतीत ढवळाढवळ केल्यास हे लोक आपल्याविरुद्ध शस्त्रदेखील हातात घेतात याचा अनुभव आल्याने नंतर राणीने जाहीरनाम्यात धर्मात ढवळाढवळ न करण्याचे आश्वासन दिले व ब्रिटिश राजवटीच्या ९० वर्षांच्या कारकीर्दीत हे वचन नोट पाळले गेले हे मान्य केले पाहिजे.

१८५७ पर्यंत हिंदुस्थानात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट होती. व्यापाराकरिता स्थापन झालेल्या या कंपनीने जगातील सर्वांत मोठे साम्राज्य पैदा केले होते व हे त्या वेळी जगातील एक मोठे आश्चर्य मानण्याजोगेच होते. इंग्लंडपेक्षा कितीतरी पटीने मोठे असलेल्या ह्या प्रदेशावर काही व्यापाऱ्यांचे नियंत्रण असावे ही घटना खुद्द इंग्लंडमधल्या अनेक विचारी माणसांना नापसंत होती. पार्लमेंटचे नियंत्रण अपुरे असल्यामुळे कितीतरी अनिष्ट गोष्टी हिंदुस्थानात घडत होत्या. या कंपनीच्या हातून त्यातील अधिकाऱ्यांना नालायक ठरवून राज्यकारभार पार्लमेंटच्या हातात घेण्याचे पूर्वीचे सर्व प्रयत्न फसले होते. तेव्हा या उठावाद्वारे हिंदुस्थानातील जनमत पार्लमेंटला कळून आले व कंपनी सरकार बरखास्त झाले. पुढील प्रगतीच्या दृष्टीने ही घटना फार महत्त्वाची ठरणारी अशी होती हे आता अगदी स्पष्ट झाले आहे.

कंपनीचे राज्य जाऊन पार्लमेंटचे राज्य आले ही घटना केवळ एक राजवट जाऊन दुसरी आली इतकी सामान्य नव्हती. इंग्लंडमधील सर्व जनतेची प्रतिनिधि अशी सभा या साम्राज्यावर नियंत्रण करणार असल्याने पुढच्या काळात अनेक लोकोपयोगी गोष्टी सरकारकडून झाल्या. अन्यायाला वाचा फुटू लागली व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे यामुळे लोकशाहीचा आरंभ सुरू झाला. सुरवातीला पार्लमेंटचा अधिकार याचा अर्थ इंग्लंडात लोकशाही व हिंदुस्थानात साम्राज्यशाही असाच होता. परंतु कालांतराने उदारमतवादी लोकांच्या आग्रहाने, इंग्रजी शिक्षणाचा येथे प्रसार होऊन स्वातंत्र्याच्या चळवळी निर्माण झाल्याने व जागतिक राजकारणातील इतर शक्तींच्या दडपणाने पुढे या देशात लोकशाहीची पद्धतशीर वाढ झाली असा इतिहास आहे. कंपनी सरकारचेच राज्य कायम असते तर लोकशाहीचा येथे आरंभ होणे कठीण होते. लोकशाहीमुळे फार काळ हुकूमशाही किंवा साम्राज्यशाही राहू शकत नाही हा इतिहासाचा सिद्धान्त येथे पुन्हा प्रत्ययास आला. इंग्रजी शिक्षणामुळे येथील जीवनावर, साहित्यावर व विचारावर काय परिणाम झाले हा प्रश्नही पाहण्याजोगा आहे. परंतु त्याचा स्वतंत्रच विचार पुढे मागे केल्यास अधिक शोभून दिसेल.

कंपनीचे राज्य जाऊन, संसदेचे राज्य या देशावर निर्माण झाले व धर्माचा प्रभाव असलेली पक्षपाती राजवट नष्ट झाली, याचा आणखी एक सुपरिणाम येथे झाला. ब्रिटिश सरकारचे राज्य लोकांना सर्वमान्य नसले व त्यातून लोकांच्या आकांक्षा पुऱ्या होत नसल्या तरी ही राजवट बरीचशी धर्मनिरपेक्ष होती हे आता मान्य करावयास हवे. भारताने धर्मनिरपेक्ष (Secular) राजवटीची जी प्रणाली स्वीकारली तिचा उगम या उठावानंतरच्या परिणामांतून झालेला दिसतो. या उठावाने अप्रत्यक्ष रीत्या हेतु मनात न धरताही, अंतिम परिणामाने या देशाला धर्मनिरपेक्ष राजवटीची देणगी दिली असे घटकाभर कां म्हणू नये ? उठावाची ही फलश्रुतीही उपयुक्त ठरलेली आहे.

१८५७ च्या उठावामागील हेतु कोणताही असला व त्यात कोणाचा कोणता कार्यभाग साधला गेला हा प्रश्न विवाद्य मानला, तरीही सर्व हिंदुस्थानच्या दृष्टीने, किंबहुना जागतिक दृष्टीने बघताना देखील या

घटनेमुळे पुढील इतिहासाला वेगळी, चांगली कलाटणी मिळाली हे मान्य करावे लागेल व या दृष्टीने विचार करता या उठावात आपल्या मानाची, वित्ताची किंवा जीवाची आत्माहुति ज्या हजारो लोकांनी दिली त्यांचा त्याग वाया गेला नाही. उठावात काहींना अभिप्रेत असलेले आपले राज्य जरी पुन्हा निर्माण करता आले नाही, तरी आपला धर्म व संस्कृति यांचे रक्षण करता आले हे निर्विवाद आहे. आफ्रिका, सीलोन, फिलिपाईन्स, लॅटिन अमेरिका इत्यादि ठिकाणी ज्या प्रमाणात ख्रिस्तीकरण झाले तसे ते भारतात झाले नाही. याचे श्रेय या उठावात हिरिरीने भाग घेणाऱ्या योद्धयांनाच द्यावे लागेल. पिढ्यानुपिढ्यांची संस्कृति, भावी पिढीसाठी जतन करण्याचे महान् कार्य या लोकांनी केले आहे व यासाठी ते निश्चितच वंदनीय आहेत. न कळत त्यांच्या हातून आधुनिक भारताचा पाया घातला गेला. या सर्व हुतात्म्यांना शताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने अभिवादन.

* * *

५

एक साहसी इंग्रज प्रवासी : डॉ. जॉन हेंडरसन

आपल्या रोमांचकारी साहसांनी अज्ञात स्थळांचा शोध लावण्याचा प्रयत्न करावयाचा व या प्रयत्नात येतील त्या अडचणी सहन करावयाच्या असा बाणा अंगी बाळगून, ज्या प्रवाशांनी व शोधकांनी १९ व्या शतकात हिमालयाची गिरिशिखरे व दऱ्याखोरी धुंडाळली, त्या साहसी शोधकांतील एक डॉ. जॉन हेंडरसन यांची कथा उद्बोधक, रोमांचकारी व करुणाजनक अशी आहे.

डॉ. जॉन हेंडरसन १८३५ च्या सुमारास लुधियाना येथे ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करी नोकरीत होते. नोकरीत असतानाच अनेक चळवळीत भाग घेऊन त्यांनी काही सांस्कृतिक व आर्थिक संस्था स्थापन केल्या होत्या. 'आग्रा बँक' स्थापन करण्यात प्रामुख्याने त्यांचाच हात होता. एक वृत्तपत्रही ते चालवीत होते. या वृत्तपत्रातून कंपनीच्या धोरणावर व कारभारावर त्यांनी अतिशय तिखट अशी टीका केल्यामुळे त्या वेळी युरोपीय समाजात व कंपनीच्या अधिकारीवर्गात फार खळबळ माजली. सरसेनापति त्या वेळी राजधानीत कलकत्त्याला होते. त्यांनी जाब देण्यासाठी डॉ. हेंडरसनना समक्ष कलकत्त्याला ताबडतोब हजर व्हावे असा हुकूम फर्माविला.

प्रसिद्धि : वाङ्मयशोभा. जानेवारी १९५९

सरसेनापतींनी जाब देण्यासाठी कलकत्त्याला बोलाविले तेव्हा यात नोकरी जाऊन तुरुंगवास किंवा परत मायदेशी जाण्याची शिक्षा होईल अशी धास्ती डॉ. हेंडरसन यांच्या मनाला चाटून गेली. शिक्षेच्या स्वरूपापेक्षा या सापळ्यात एकदा सापडल्यास आपल्या ध्येयाचा चक्काचूर होईल व मनाला शांतता लाभणार नाही म्हणून डॉक्टरसाहेबांनी मनात एक योजना आखून कंपनीच्या अधिकारीवर्गाला चकविण्याचे ठरविले. जलदगतीने जाणारी रेल्वे, मोटारी किंवा इतर यांत्रिक वाहने त्या वेळी नव्हती. त्यामुळे घोडा, उंट किंवा पालखी यांचा वापर करून देखील लुधियाना ते कलकत्ता अंतर तोडण्यास कित्येक आठवडे लागत. प्रवासाची हौस असल्यामुळे आपण पायीच हे अंतर काटणार आहोत अशी सबब सांगून डॉक्टरांनी कलकत्त्याला पोचण्यास चार महिन्यांची मुदत घेतली. प्रथम गुप्तपणे सतलज नदी ओलांडून पंजाब, जम्मू, कश्मीर असा प्रवास करीत सिंधू नदीच्या उगम स्थानाचा शोध लावावयाचा व मार्गातील लडाख, इस्कर्डू, तिबेट आणि हिमालयातील इतर प्रदेश पहात पहात वनस्पती, प्राणी, पक्षी, माणसांच्या चालीरीती व इतर गोष्टींची माहिती जमा करावयाची असा त्यांनी बेत केला. हे सर्व पाहून लौकरच परत यावयाचे व नन्तर घोड्यावरून कलकत्ता गाठून चार महिन्यांच्या आत तेथे दाखल व्हावयाचे व ध्येयसिद्धि व कर्तव्यपालन या दोन्हींचा मेळ घालावयाचा असे त्यांनी ठरविले. डॉ. हेंडरसनना ध्येयसिद्धीचा आनन्द मिळणे त्यांच्या नशिबात नव्हते. नियतीने त्यांच्यापुढे निराळेच ताट वाढून ठेवले होते.

सतलज नदीच्या पश्चिमेकडील व उत्तरेकडील प्रदेशात त्या वेळी रणजितसिंगाचे राज्य होते. रणजितसिंगाशी असलेली मैत्री टिकविण्यासाठी कंपनी सरकारने त्या वेळी सतलज नदी ओलांडण्यास सर्व इंग्रजांना बंदी केली होती. व ही बंदी कोणी मोडणार नाही याची दक्षता कंपनीचे अधिकारी फार कसोशीने घेत. सिधु नदीचा उगम शोधणे व हिमालयातील इतर शास्त्रीय माहिती जमा करणे ही महत्त्वाकांक्षा साध्य करण्यासाठी डॉक्टरांना ही बंदी-आज्ञा मोडणे जरूरच होते; म्हणून शिक्षा होण्यापूर्वीच आणखी एक गुन्हा करणे त्यांना अवश्य वाटले व त्याप्रमाणे त्यांनी तो जाणूनबुजून केला.

१८३५ च्या मे महिन्यात डॉ हेंडरसननी लुधियाना सोडले व गुप्तपणे मंडीहून रणजितसिंगाच्या राज्यात प्रवेश केला. जलदीने प्रवास करून त्यांनी लडाख गाठले. ओळख पटू नये यासाठी त्यांनी 'इस्माईलखान' हे टोपण नाव धारण केले व फकिराच्या वेशात हा सर्व प्रवास केला. डॉ. हेंडरसन गुप्तपणे पळाल्याचा गवगवा हिंदुस्थानात एव्हाना सर्वत्र झाला होता. त्यामुळे व युरोपीय जिज्ञासेने सर्व वस्तु पाहण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे लडाखमध्ये एक इंग्रज आला आहे हे तेथील लोकांनी व राजांनी ओळखून त्यांना दरबारात नेले.

लडाखला जात असता कुंडल या गावी त्यांना बरेच लोक चिंताक्रांत दिसले. गावातील एका मोठ्या तळ्यातील पाणी आटून त्यातील मासे तडफडून मेल्यामुळे गावकरी उदासीन दिसत होते. गावकऱ्यांनी, फकिराच्या वेशातील डॉक्टरांना आपले दुःख सांगितले. 'फकीर' हेंडरसननी या सर्व गोष्टी महंमद पैगंबराने अजमीरलाच मला स्वप्नात सांगितल्या आहेत असे सांगून 'सब ठीक हो जायेगा' असा आशीर्वाद दिला. गावकऱ्यांनी याचे कारण विचारल्यावर, तांब्याच्या खाणीचा नवीन उद्रेक झाल्यामुळे विष निर्माण झाले व त्यामुळे मासे मेले अशी फकिराने मल्लीनाथी केली. गावकऱ्यांकडून अन्न व इतर वस्तु प्राप्त करून नंतर डॉक्टरांनी आपला प्रवास पुढे चालू ठेवला.

लडाखच्या राजाला डॉक्टरांची ओळख पटल्यावर त्याने त्यांचा सत्कार केला व मूरक्रॉफ्टने पूर्वी केलेल्या तहावर कंपनीतर्फे सही करण्याची विनंती केली. डॉ. हेंडरसनना याची काहीच माहिती नसल्याने ते या गैरसमजाबद्दल काही बोलणार तोच लडाखच्या राजाने त्यांना पूर्वीचा तहनामा दाखविला. हेंडरसनना या तहासंबंधी काहीही माहिती नाही, याची खात्री पटूनसुद्धा व या तहावर सही करण्याचा त्यांना अधिकार नाही याची जाणीव असूनदेखील एक इंग्रज मनुष्य आपल्या राज्यात आला आहे, त्याचा फायदा करून घेण्याचे लडाखच्या राजाने ठरविले. या वेळी रणजितसिंगाचा सेनापति झोरावरसिंग हा लडाख जिंकण्यास प्रचंड सैन्य घेऊन आला असल्यामुळे लडाखच्या राजाच्या मनात झोरावरसिंगाला हा इंग्रज वकील मदतीचे आश्वासन देण्यास आला असल्याचे भासवावयाचे होते व यासाठीच डॉक्टरांना अटक होऊन लडाख बाहेर जाण्यास बंदी झाली. बिचारा हेंडरसन सिंधू नदीचा शोध घेऊन

घाईने परत जाणार तोंच या राजकारणामुळे अडकून पडला. मध्यंतरी पळून जाण्याचा एक अयशस्वी प्रयत्न त्यांनी केला; परंतु त्या धडपडीत त्यांना जखमा झाल्या व त्यांची कैद जरा कडक झाली.

मध्यंतरी ई. इं. कंपनीचा वकील मदतीचे आश्वासन देण्यासाठी लडाखच्या राजाकडे आला आहे असे कळताच झोरावरसिंगाने आपली मोहीम तहकूब करून जम्मू काश्मीरचा सुभेदार गुलाबसिंग याला ही हकीकत कळविली व पुढच्या आज्ञेची वाट पहात तो सावध राहिला. गुलाबसिंगाने रणजितसिंगाला ही हकीकत कळविल्यावर, रणजितसिंगाने लुधियानाच्या इंग्रज रेसिडेंटला कंपनीच्या या वागण्याचा अर्थ काय असे स्पष्ट विचारले. रेसिडेंटने कंपनी सरकारच्या मर्जीविरुद्ध डॉ. हेंडरसन सतलज नदी ओलांडून लडाखमध्ये गेल्याचे व रणतजितसिंगाला काश्मीरमध्ये मुलुखगिरी करण्याची इच्छा असल्यास कंपनीला या कामात ढवळाढवळ करण्याची बिलकूल इच्छा नाही असे कळविले. रणजितसिंगाकडून गुलाबसिंगाला व गुलाबसिंगाकडून झोरावरसिंगाला ही हकीकत कळून, झोरावरसिंगाची ही थांबलेली मोहीम पुढे सुरू झाली. हे राजकारण फसल्याचे लक्षात आल्यावर लडाखच्या राजाने डॉ. हेंडरसनला सोडून दिले.

लडाखच्या तुरुंगात तीन महिने काढावे लागल्याने डॉ. हेंडरसनची मूळची योजना साफ ढासळली. सतलज नदी ओलांडून रणजितसिंगाच्या राज्यात गेल्याने त्याच्या मूळच्या गुन्ह्यात सरकारच्या दृष्टीने आणखी एकाची भर पडली. कलकत्त्याला वेळेवर परतणे त्यांना अशक्य झाले व हिमालयात सर्वत्र बर्फ पडावयास प्रारंभ झाल्याने प्रवास चालू ठेवणे धोक्याचे ठरले. लडाखच्या तुरुंगातून मुक्तता होताच ते तिबेटला गेले व तिबेटातून इस्कर्डूच्या छोट्या राज्यात आले. इस्कर्डूच्या राजाने त्यांचे चांगले स्वागत करून त्यांना सुखसोयी मिळवून देण्याचा प्रयत्न केला. हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांत या वेळी इतके बर्फ पडते की, माहितगारावाचून या वेळी प्रवास करणे म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूला आमंत्रण देण्यासारखेच असते. बर्फाच्या थरामुळे रस्ते दिसत नाहीत व चालताना एकदम दरीत कोसळले जाण्याची धास्ती असते. कित्येक वेळा बर्फाच्या राशीत बुडून वर निघणे अशक्य

होऊन थिजून मरण्याची पाळी येते. डॉक्टरांनी वर्ष वाया घालविण्याऐवजी धोका पत्करून निघण्याचे ठरविले व राजाने दिलेल्या नोकरांसमवेत सामानसुमानासह श्रीनगरचा रस्ता धरला. सामानासह निघताना वेळ जातो म्हणून नोकरांना सामान पाठीमागून आणण्यास सांगून डॉक्टर पुढे सटकले. सामान मागे राहिल्याने कपडे व खाणेपिणे या बाबतीत त्यांचे फारच हाल झाले.

श्रीनगरला डॉक्टर आले त्या वेळी त्यांचे अंग फुटून भेगांतून रक्त वाहत असे. सर्वांगाला रात्रंदिवस ठणका लागत असे. मागाहून सामान येईपर्यंत श्रीनगरला राहणे त्यांना जरूर होते. थोड्याच दिवसांत त्यांच्याबरोबरचा नोकर त्यांना श्रीनगरात भेटला व थंडीने घोडे मेले व सामानसुमान नौबाक घाटातून आणताना दरीत पडले अशी त्याने वर्दी दिली. जिवापलीकडे जपलेले सामान सर्वस्वी नष्ट झाल्याने त्याचे डॉक्टरांना वाईट वाटले असलेच पाहिजे. परंतु त्यांनी पुढे हाती घेतलेली योजना पाहता ते हतबुद्ध झाले नाहीत येवढे मात्र निश्चित. श्रीनगर शहरातील त्यांचे दिवस इतर दोन युरोपीय प्रवाशांच्या सहवासात सुखाचे गेले. या तीन प्रवाशांनी एका शिलालेखावर, आठवणीप्रीत्यर्थ आपली नावे कोरावयाची व त्यावर आजपर्यंत काश्मीरमध्ये येऊन गेलेल्या सर्व युरोपियन प्रवाशांची नोंद करावयाची असे ठरवून, मशिदीतील तेथे पडलेला एक दगड आणावयाचे ठरविले. श्रीनगरच्या सुभेदाराची त्याप्रमाणे त्यांनी परवानगीही आणली. परंतु शहरातल्या मुसलमानांना हे कळताच त्यांनी एकच गिल्ला केला व मशिदीतील दगडाला हात लावू न देण्याचे ठरविले. वातावरण इतके तापले की, या तिन्ही प्रवाशांना श्रीनगरमध्ये हिंडणेदेखील धोक्याचे ठरले. त्या वेळी शांतपणे दुसरा दगड विकत घेऊन या प्रवाशांनी त्यावर शिलालेख कोरला व आपले काम भागविले.

कलकत्त्याला परतण्याची चार महिन्यांची मुदत एव्हांना संपली होती. हिंदुस्थानात परतल्यावर शिक्षा होणार हेही आता निश्चित झाले होते. म्हणून डॉक्टरांनी एक नवे साहस करण्याचे ठरविले. काश्मीरच्या दऱ्याखोऱ्यांतून कोणाहीं युरोपीयाने प्रवास न केलेल्या मार्गाने सिंधु नदी व हिंदुकुश पर्वत ओलांडून जावयाचे व नंतर अत्युच्च अशा खिंडीतून हिंदु-

स्थानात परत यावयाचे अशी त्यांनी योजना आखली. या मार्गात आडमुठे व आडदांड पठाणांची वस्ती असल्याने हा बेत डॉक्टरांनी सोडावा असे त्यांच्या दोन मित्रांनी सुचविले. परंतु निषेध किंवा उपदेश याला जुमानणे हा डॉक्टरांचा मन:पिंडच नव्हता. त्यांचा हट्ट पाहून त्या दोन युरोपीय प्रवाशांनी त्यांना घड्याळ, कपडे व जरूर अशी काही औषधे दिली. डॉक्टरांनी पठाणांच्या टोळ्यांपासून बचाव करता यावा म्हणून पठाणी वेश परिधान करून प्रवासास सुरवात केली. परक्या लोकांवर हल्ले करून त्यांना ठार मारणे यात पठाणांना काहीच वाटत नसे म्हणून हे वेशांतर करणे जरूरच होते.

श्रीनगरहून निघाल्यावर बारामुल्ला घाटाने ते मुझफराबादेला गेले. प्रवासात मुसलमानी वेशात असल्यामुळे बर्फ पडत असताना देखील त्यांना दारूला स्पर्श करता आला नाही. याचा त्यांच्या बिघडलेल्या प्रकृतीवर फारच परिणाम झाला. वाटेत एका ठिकाणी नेहमीप्रमाणे ते आपल्या प्रवासाची टिपणे लिहीत असताना एका ठाणेदाराने त्यांना पकडले व वेश खोटा केला व हेरगिरी करण्याचा प्रयत्न आहे म्हणून तुरुंगात त्यांची रवानगी केली. सोने तयार करण्याची किंवा इतर एखादी किमया केल्यासच सोडीन नाहीतर नाही अशी त्याने तंबीही दिली. गोड बोलून किंवा बहुधा थोडे सोने देऊनच डॉक्टरांनी तेथून सुटका करून घेतली.

दऱ्यांतून व पहाडातून पुढे जात असता डॉक्टर आणखी एका प्राणसंकटात सापडले. एका गावातून जात असता त्यांच्या नोकराने अनवधानतेने किती वाजले हे पाहण्यासाठी जवळचे घड्याळ काढून त्यात पाहिले. त्याबरोबर हा पठाण नसून फिरंगी आहे या संशयाची लोकांना खात्री पटली. पठाणांच्या तेथील टोळीने त्यांची सर्व चीजवस्त लुबाडली. औषधे, घड्याळे, अन्नाचा साठा, कपडे व रोख पैसे सर्व गेल्यामुळे व मार खावा लागल्यामुळे त्यांना फारच त्रास झाला. रस्त्यात अशा तऱ्हेने आपल्यावर हल्ले होऊन लुबाडले जाण्याच्या धास्तीची जाणीव त्या वेळी डॉ. हेंडरसनना असल्यामुळे परक्या देशात सोय करून घेण्याची एक नामी युक्ति त्यांनी योजली होती. प्रवासाला निघण्यापूर्वी सोन्याचे बारीक तुकडे करून घेऊन ते चिंध्यातून शिवून डॉ. हेंडरसन त्या चिंध्या हातापायाला घट्ट बांधीत असत. चालल्यामुळे हातपाय ठणकत

असल्यामुळे या चिंध्या हातापायाला बांधल्या आहेत असा पाहणाऱ्याला भास होई. प्रसंगविशेषी जरूर लागेल तेव्हा यांतील एकेक तुकडा काढावयाचा व तो विकून जरूर त्या वस्तू खरेदी करावयाच्या असा त्यांचा खाक्या होता.

प्रवासाचे धक्केचपाटे खातखात डॉक्टरसाहेब एकदाचे पेशावरला पोहोचले. प्रवासात दगदग सोसावी लागली. चीजवस्तु लुटली गेली, लुटारूंचे दंडुके खावे लागले, बर्फाने अंग फुटून शरीराला भेगा पडल्या, मित्रांनी दिलेल्या भेटी पळविल्या गेल्या, प्रकृति बिघडली याचे डॉक्टरांना वाईट वाटले. परंतु त्याहीपेक्षा रस्त्यांत प्रवासवृत्त लिहिलेल्या त्यांच्या रोजनिशा व प्रवासाची टिपणे पळविली गेल्याने त्यांना मरणप्राय दुःख झाले. नवीन भागाची सर्वांगीण माहिती आपल्या देशबांधवांना करून द्यावयाची व शोधक म्हणून नाव कमवावयाचे या इच्छेने ते हा सर्व प्रवास करीत असत. त्यामुळे ही टिपणे गेल्याने एखाद्याने हातपाय तोडावेत परंतु जीवे मात्र मारू नये अशी त्यांची स्थिति झाली.

आपला प्रवासाचा मार्ग बदलून डॉक्टरांनी पेशावर गाठले. पेशावरला रणजितसिंगाच्या राज्यातील एक फ्रेंच सेनानी मि. ऑव्हिताबल यांनी त्यांचे चांगले स्वागत केले. त्यांनी डॉक्टरांना युरोपीय पद्धतीचे जेवण दिले. डॉक्टरांना युरोपीय कपडे घालावयास शिल्लक न राहिल्याने मि. ऑव्हिताबलने त्यांना आपला एक लोकरी सूट दिला. याच पोशाखात डॉक्टर पेशावरहून लाहोरला रणजितसिंगाच्या राजधानीत आले. "या सुटात डॉक्टर एखाद्या विदूषकासारखे दिसत. मि. आव्हिताबल हे अतिशय स्थूल व बुटके होते. उलट डॉक्टर हेंडरसन उंचेपुरे व लांबटांगे होते. यामुळे त्यांच्या गळ्याचा आणि हातापायाचा बराचसा भाग हा सूट घातल्यावर उघडा रहात असे. आणि बाकीचा भाग इतका सैल रहात असे की त्यात दोन डॉक्टर सहज सामावू शकले असते." असे त्यांचे या पोशाखातील वर्णन ह्यूगेल या सहप्रवाशाने केलेले आहे.

डॉ. हेंडरसन लाहोरात आले खरे परंतु त्यांचे आगमन व एकूण त्यांची वर्तणूक रणजितसिंगाला आवडली नव्हती. परवानगी न घेता, चोरून आपल्या सर्व राज्यात प्रवास केला व सर्व भागांची माहिती करून घेतली ही हेरगिरी आहे असे रणजितसिंगाला वाटले असल्यास नवल नाही. डॉक्टरांचा हेतु

जरी निराळा असला तरी त्यांनी मिळविलेली माहिती हेराप्रमाणेच कंपनीला पुरविली असती व त्या दृष्टीने रणजितसिंगाचा संशय खोटा नव्हता. त्यामुळे डॉक्टरांना अटक करून त्यांना कंपनी सरकारकडे पाठवावे असा रणजितसिंगाचा विचार होता. डॉक्टरांच्या सहप्रवाशाने मध्यस्थी करून डॉक्टरांचा हा तुरुंग वाचविला; मुलाखतीत रणजितसिंगाने डॉक्टरांना प्रवासाच्या हेतूबद्दल अनेक प्रश्न विचारले. 'सिंधू नदीच्या उगमाचा शोध घेणे' किंवा 'हिंदुकूशपर्वत ओलांडून खिंडीची माहिती करून घेणे' या मागील डॉक्टरांचा हेतु रणजितसिंगाला पटला नाही. कंपनीचा गुप्त हेर म्हणूनच हे काम ते करताहेत असाच संशय शेवटपर्यंत रणजितसिंगाला वाटला. परंतु इंग्रजांशी तंटा टाळावयाचा असल्यामुळे त्यांनी डॉक्टरांना शिक्षा न देता ते काम कंपनीवर सोपविले. सतलज नदी ओलांडून इंग्रजांच्या हद्दीत येताच डॉक्टरांना अटक करण्याचा हुकूम कंपनी सरकारने सोडल्याचेही रणजितसिंगाला गुप्त हेरांकडून कळले होते म्हणून त्याने कडवटपणा घेण्याचे टाळले.

रणजितसिंगाचा निरोप घेऊन डॉ. हेंडरसन सतलज नदी ओलांडून लुधियानाला आले. हद्दीत येताच कंपनी सरकारच्या हुकुमान्वये त्यांना अटक झाली व कंपनीच्या बंदी हुकुमाला न मानता सतलज नदी ओलांडणे, सेनापतीच्या हुकुमाचा अवमान करणे इत्यादि गुन्ह्यांबद्दल त्यांच्यावर खटले भरले. प्रवासातील त्रासाने व दगदगीने डॉक्टरांची प्रकृति इतकी ढासळली होती की त्यांना ताप येऊ लागला व तो वाढत जाऊन शेवटी त्यातच त्यांचा लुधियाना येथे फेब्रुवारी १८३६ मध्ये अंत झाला. डॉक्टरांनी अत्यंत परिश्रमपूर्वक जमा केलेली माहिती त्यांच्याबरोबरच नष्ट झाल्याने त्यांच्या मित्रांना व कंपनीच्या अधिकाऱ्यांना फार वाईट वाटले. भूगोल, वनस्पती, पशुपक्षी व इतरही माहिती जमा करण्यासाठी डॉक्टरांनी अपरंपार कष्ट घेतले होते. परंतु त्यांच्या दुर्दैवाने यातील ज्ञानाचा इतरांना काहीच उपयोग झाला नाही. डॉक्टरांना जे श्रेय मिळावयाचे तेही मिळू शकले नाही. प्रवासातली टिपणे चोरांनी लांबविली व स्वतःच्या स्मरणाने प्रवासवृत्त लिहावे तो अटक होऊन खटले भरले गेल्याने डॉक्टरांना स्वास्थ्य मिळाले नाही. दुर्दैवाने त्यांना जरा लौकर मृत्यु आला व त्यांनी मिळविलेली अपूर्व मौलिक माहिती त्यांच्याबरोबरच काळाने नष्ट केली. त्यांना झालेले कष्ट व त्यांनी मिळविलेली

माहिती यासंबंधी जेव्हा त्यांच्या सहप्रवाशांनी इतरांना जाग आणली तेव्हा हिंदुस्थानातील व विलायतेतील त्यांचे मित्र फार हळहळले. कंपनीच्या अधिकारी वर्गाला देखील नंतर वाईट वाटले. डॉ. हेंडरसन गेले ते सर्वांना चुटपूट लावून गेले. त्यांच्या पाठीमागे त्यांच्या परिश्रमाचीं, हालअपेष्टांची व त्यांच्या ज्ञानपिपासु मनाची स्मृतीच काय ती शिल्लक राहिली.

* * *

६

इतिहासमार्तंड गो. स. सरदेसाई

रविवार दिनांक २९ नोव्हेंबर १९५९ रोजी कामशेत मुक्कामी रियासतकार डॉ. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे निधन झाले व महाराष्ट्र एका तपस्वी इतिहासकाराला मुकला. महाराष्ट्राच्या इतिहास प्रांतात यामुळे एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. साधारणपणे ज्यांनी एखाद्या विषयाला थोडेबहुत वाहून घेतले आहे अशा कोणत्याही माणसाच्या मृत्यूने थोडीबहुत पोकळी ही निर्माण होणारच. परंतु डॉ. सरदेसाई यांच्या मृत्यूने निर्माण झालेली पोकळी ही निराळ्या प्रकारची आहे व महाराष्ट्राच्या आजच्या इतिहासाभ्यास व इतिहासप्रेम यासंबंधीच्या अवस्थेकडे पाहता ही पोकळी निदान नजीकच्या काळात भरून निघेल अशी थोडी देखील आशेला जागा नाही. म्हणून या वेळी निर्माण झालेले दुःख हे अनेकपटींनी भासणारे व आवरण्यास कठीण असे आहे.

डॉ. गो. स. सरदेसाई यांनी इतिहासाच्या अभ्यासाला स्वतःला वाहून घेतले तो काळ किमान साडेपाच तपांचा आहे. इतिहास संशोधकांच्या तीन पिढ्यांबरोबर काम करण्याचे भाग्य त्यांना लाभले. या ६०–७० वर्षांच्या

प्रसिद्धि : प्रतिष्ठान, औरंगाबाद, जानेवारी १९६०.

दीर्घ काळात कोणताही अंगचुकारपणा न करता किंवा द्रव्यलोभाने इतर विषयांकडे लक्ष न देता त्यांनी सतत इतिहासाभ्यास, इतिहाससंशोधन व इतिहासलेखन चालू ठेवले. परमेश्वराने दिलेले दीर्घायुष्य आपल्या आवडत्या विषयाला वाहून त्यांनी व्यासंगाचा एक नवा विक्रम निर्माण केला असे म्हटले तर वावगे वाटू नये.

रियासतकार सरदेसाई यांचा जन्म कोकणातील सुप्रसिद्ध मावळंकर सरदेसाई घराण्यात झाला. भारतीय लोकसभेचे पहिले अध्यक्ष (स्पीकर) दादासाहेब मावळंकर व रियासतकार सरदेसाई हे एकाच घराण्यातील होत. ह्या घराण्यात ज्यांनी सरदेसाई हे वतन मिळविले ते सरदेसाई हे आडनाव लावू लागले. इतरांनी आपले पूर्वीचे मावळंकर हेच नाव कायम ठेविले. १७ मे १८६५ हा रियासतकारांचा जन्म दिवस व गोविल हे त्यांचे जन्मग्राम. गोविलच्या परिसरात सृष्टिनिरीक्षण व कावाडकष्ट करीत सरदेसाई यांनी आपले बालपण घालविले. सरदेसाई घराण्यात हुकमी पैसा येण्याची साधने नसल्यामुळे व संततीचा वरदहस्त सढळ असल्यामुळे आर्थिक दैन्य त्यांच्या पाचवीलाच पुजले होते.

वेरवली-शिपोशी या गावात प्राथमिक शिक्षण व रत्नागिरीत माध्यमिक शिक्षण घेऊन कॉलेजच्या अभ्यासासाठी सन १८८५ साली सरदेसाई पुण्याला आले. मुंबईहून पुण्याला केलेला हा त्यांचा पहिलाच रेल्वेचा प्रवास. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना नातेवाईकांचा आश्रय घ्यावा लागला. रत्नागिरीच्या हायस्कूलमध्ये ते त्या वेळी एक हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात. त्यांचे सहाध्यायी शिवराम महादेव परांजपे व वामनराव पोतदार यांनी मुख्याध्यापकाशी भांडून रत्नागिरी सोडली, परंतु सरदेसाई मात्र तेथेच मॅट्रिक होईपर्यंत राहिले. त्यांच्या तेथील शिक्षकांपैकी ज्यांनी त्यांच्या जीवनाला योग्य वळण लावले ते एक शिक्षक श्री. कीर्तने यांनी सरदेसाई यांना जावई करून घेऊन पुढच्या शिक्षणासाठी पुण्यास नेले व सर्वच दृष्टीने त्यांच्या जीवनात क्रांति केली. सरदेसाई पुण्याला आले त्या वेळी फर्ग्युसन कॉलेजचे पहिलेच वर्ष होते. लोकमान्य टिळक, समाजसुधारक आगरकर, वामन शिवराम आपटे या प्राध्यापकांच्या मार्ग-दर्शनाखाली त्यांनी एक वर्षभर अभ्यास केला. याच वेळी श्वशुरांची

पुण्याहून सोलापूरला बदली झाल्यामुळे त्यांचे पुढचे शिक्षण मुंबईला दुसऱ्या एका नातेवाइकाकडे झाले. १८८८ च्या अखेर ते बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले.

बी. ए. झाल्यावर त्या वेळी राजमान्य झालेला व आर्थिक दृष्टीने लोभनीय असा वकिलीचा व्यवसाय करावा या हेतूने त्यांनी कायद्याचा अभ्यास आरंभिला. ते कायद्याची एक परीक्षा पासही झाले. परंतु हा अभ्यास पुरा होण्याच्या आतच त्यांना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची नोकरी पत्करण्याची परिस्थिति निर्माण झाली. सयाजीराव महाराजांना एक 'वाचक' व खाजगी कामात मदतनीस म्हणून विश्वासू माणूस हवा होता. त्या शोधात महाराज असता सरदेसाई यांचे एक हितचिंतक बापूसाहेब आठल्ये यांनी सरदेसाई यांची शिफारस केली व १ जानेवारी १८८९ पासून सरदेसाई या नवीन कामावर रुजू झाले. बडोद्याच्या त्यांच्या या नोकरीने त्यांच्या आयुष्याला एक दिशा लागली.

सयाजीरावांचे वाचक म्हणून काम करीत असताना अनेक उत्तमोत्तम इतिहासग्रंथ त्यांच्याकडून वाचले गेले. शिक्षण, राज्यकारभार, समाजशास्त्र, अर्थव्यवहार व इतरही अनेक विषयांवर वाचन, कर्तव्य पार पाडीत असतानाच सहज होत गेले. सयाजीरावांना निद्रानाशाचा विकार असल्यामुळे रात्र रात्र त्यांच्यापुढे वाचीत बसण्याची पाळी सरदेसायांच्यावर आली. आपल्या मनोरंजनार्थ तरुण सेवकाला रात्रीच्या रात्री जाग्रणे पडतात याची खंत सयाजीरावांना कधी वाटली नाही व निष्ठेने कर्तव्य करण्याच्या मनोवृत्तीने सरदेसायांनी याबद्दल कधी तक्रार केली नाही. न कुरकुरता अन्यायाविरुद्ध देखील फारसा लढा न देता आपले कर्तव्य चोख बजवावयाचे व अंगीकृत काम नेकीने पार पाडावयाचे ही जी सवय तरुणपणी सरदेसायांना लागली तीच त्यांच्या हातून डोंगराएवढे काम होण्यास त्यांना उपयोगी पडली.

राजपुत्र फत्तेसिंगराव सात वर्षांचे झाल्यावर त्यांना शिक्षण देण्यासाठी 'राजपुत्र-शिक्षक' म्हणून नंतर सरदेसायांची नेमणूक झाली व याच ठिकाणी रियासतीच्या प्रचंड उद्योगाचा पाया घातला गेला. यापूर्वी महाराजांच्या आज्ञेवरून त्यांनी काही इंग्रजी पुस्तकांची मराठी भाषांतरे केली होती. परंतु पत्त्याचे खेळ, काही सामान्य संस्कृत ग्रंथ असे त्याचे

किरकोळ स्वरूप होते. राजपुत्राला इतिहास शिकविण्यासाठी उत्तम पुस्तकांची टिपणे तयार करून त्याचे मराठी लेखन करावयाचे असा परिपाठ सुरुवातीपासूनच त्यांनी ठेवला. ही टिपणे वाचून शंकर मोरो रानडे व 'वाईकर भटजी' कर्ते धनुर्धारी या दोघांनी त्यांना पुस्तकरूपाने ही टिपणे प्रसिद्ध करण्याचा आग्रह केला व सरदेसायांना इतिहास लेखनाच्या प्रांतात ढकलले. इतिहास विभागाला रियासत हे नाव देण्याचे श्रेयही श्री. रानडे यांचेच आहे.

सुरुवातीला हिंदुस्थानचा इतिहास तीन विभागांत–मुसलमानी रियासत, मराठी रियासत व ब्रिटिश रियासत–असे लिहिण्याचे त्यांनी ठरविले. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यावर सरदेसायांना ते तीन भागांत आटोपता येईना. म्हणून हिंदुस्थानच्या इतिहासाचे ११ भाग–मुसलमानी एक, मराठ्यांच्या इतिहासाचे आठ व ब्रिटिश दोन– त्यांनी लिहून प्रसिद्ध केले. मुसलमानी रियासतीची पहिली आवृत्ति १८९८ मध्ये प्रसिद्ध झाली. या खंडाचे दोन भाग करून पुन्हा त्याच्या दोन आवृत्त्या निघाल्या. मराठी रियासत पहिला खंड १९०२ व शेवटचा म्हणजे मराठी रियासत उत्तर विभाग ३ हा खंड १९३२ साली प्रथम प्रसिद्ध झाला. शेवटचा खंड प्रसिद्ध होण्यापूर्वीच पूर्वीच्या खंडांच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या निघत होत्या हा भाग निराळाच. ब्रिटिश रियासत पूर्वार्ध १९०८ साली प्रसिद्ध झाला व उत्तरार्ध १९३९ साली प्रसिद्ध झाला. अशा रीतीने अर्वाचीन हिंदुस्थानचा संपूर्ण इतिहास लिहिण्याचे हाती घेतलेले पहिल्या आवृत्तीचे काम त्यांनी ४१ वर्षांच्या दीर्घ परिश्रमांनी हातावेगळे केले.

विष्णूशास्त्री चिपळूणकर, न्यायमूर्ति रानडे इत्यादींच्या विचारसरणीमुळे १८७० पासून पुढे महाराष्ट्रात प्रबोधन होत होते. याच वेळी पारतंत्र्याविरुद्ध झगडणारी नवीन पिढी महाराष्ट्रात निर्माण झाली. आपली संस्कृति, आपली भाषा व आपला इतिहास यांविषयी लोकांत विलक्षण कुतूहल निर्माण झाले. १८९० पासून पुढे महाराष्ट्रात इतिहाससंशोधनाला चालना मिळाली. रावबहादूर का. ना. साने, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, वासुदेव वामनशास्त्री खरे, रावबहादूर पारसनीस इत्यादींनी इतिहास संशोधनात प्रचंड खटाटोप करून इतिहासलेखनासाठी प्रचंड प्रमाणावर नवीन साधन-

साहित्य उपलब्ध करून दिले. स्वत: रियासतकार सरदेसाई व यदुनाथ सरकार या दोघांनी पेशवेदप्तरामधील महत्त्वाचे कागदपत्र प्रसिद्ध करण्याचे काम मुंबई सरकारच्या गळी उतरविले. १९२९ पासून पुढे सतत चार वर्षे ५।६ साहाय्यकांच्या मदतीने रियासतकार सरदेसाई यांनी पेशवे दप्तराचे आलोडन केले व ४५ खंडांचे साधन साहित्य संपादित करून प्रसिद्ध केले. त्याचप्रमाणे पेशवे दप्तरातील इंग्रज वकिलांच्या कागदपत्रांचा अभ्यास करून त्यांचेही दहा बारा खंड प्रसिद्ध केले. ५० वर्षांतील प्रसिद्ध झालेल्या या प्रचंड साहित्यामुळे बरीच नवीन माहिती उपलब्ध झाली व या माहितीच्या आधारे आपल्या रियासती दुरुस्त करून पुन्हा प्रसिद्ध करण्याचे काम सरदेसाई यांनी आरंभिले.

मराठी रियासतीचे पुनर्मुद्रण पूर्वीप्रमाणेच विभाग पाडून न करता व्यक्तिगत भागांनी प्रसिद्ध करण्याचे ठरवून सरदेसायांनी शहाजीराजांपासून नारायणराव पेशव्यापर्यंतचा इतिहास दुरुस्त करून नऊ खंडांत प्रसिद्ध केला. यापुढील तीन खंड त्यांनी दुरुस्त करून लिहून ठेविले असून प्रसिद्ध होण्याची वाट पाहात आहेत. माधवराव पेशव्यांच्या खंडात प्रस्तावनेत ते म्हणतात, " (पुढील) तीन भाग पुनर्मुद्रणास पात्र असून मी दुरुस्त करून ठेवले आहेत. प्रस्तुतच्या महागाईत हे काम माझ्या ह्यातीत सिद्धीस जाते कीं नाही याची शंका वाटते. मी आपल्या डोळ्यांदेखत रियासतीचा संपूर्ण संच सुधारून वाचकांस द्यावा अशी विवंचना अहर्निश मनात वागत आहे. या उपर नेमानेम असतो तो खरा! "

मराठी वाचकांच्या उदासीनतेमुळे म्हणा, मुंबई सरकारच्या हलगर्जी-पणामुळे म्हणा किंवा प्रकाशकाच्या व्यापारी वृत्तीमुळे म्हणा हे पुढील तीन भाग लिहून तयार असूनही त्यांच्या ह्यातीत प्रसिद्ध होण्याचे भाग्य व नेमा-नेम सरदेसायांच्या नशिबी नव्हता हे खरे.

सुरुवातीला अर्वाचीन हिंदुस्थानचा सबंध इतिहास लिहिण्याचे जरी सर-देसायांनी अंगावर घेतले व पार पाडले तरी आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी स्वत:ला मराठ्यांच्या इतिहासालाच वाहून घेतले. मराठ्यांच्या इतिहासाला महाराष्ट्राशिवाय इतरत्र योग्य स्थान नाही म्हणून सरदेसाई यांना नेहमी हळहळ वाटे. रियासतीचे लेखन पूर्ण झाल्यानंतर मराठ्यांचा इतिहास इंग्रजीत

लिहावा असा विचार त्यांच्या मनात आला व नवीन संशोधित साहित्याच उपयोग करून त्यांनी तो सिद्धीसही नेला. 'New History of the Marathas' म्हणून तीन खंड सरदेसाई यांनी प्रसिद्ध केले. यामुळे सरदेसाई यांचे नाव इतर प्रांतांतील लोकांना कळालेच. पण त्याहीपेक्षा या दीर्घ परिश्रमांनी त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची मोठीच सेवा केली आहे पाटणा विद्यापीठात व्याख्यान देण्याच्या निमित्ताने "मराठ्यांच्या इतिहासातील प्रमुख प्रवाह" म्हणून एक ग्रंथ त्यांनी इंग्रजीत प्रसिद्ध केला.

सरदेसाई यांच्या दीर्घ व्यासंगाचे फळ म्हणून भारतीय इतिहास परिषदेने त्यांना १९५१ साली जयपूर अधिवेशनाचे अध्यक्षस्थान देऊन त्यांचा बहुमान केला. पुणे विद्यापीठानेही त्यांना 'सन्माननीय डॉक्टरेट' अर्पण केली. १९३४ साली साताऱ्च्या महाराजांनी सरदेसाई यांना साडेतीन वस्त्रांचा आहेर करून त्यांचा बहुमान केला. त्यांचा ७१ वा वाढदिवस उत्साहाने साजरा झाला. १९३७ साली हिंदुस्थान सरकारकडून त्यांना 'रावबहादूर' ही पदवी मिळाली. १९४६ साली धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळाने त्यांना सुवर्णपदक व "इतिहास-मार्तंड" ही पदवी दिली. राजवाडे यांनीच ही पदवी पूर्वी त्यांना खासगी रीत्या दिली होती आणि महाराष्ट्राच्या शंभर कर्त्या पुरुषांत त्यांची गणना केली होती. मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्षस्थान मिळूनही काही कारणांनी त्यांनी ते नाकारले. त्यांच्या कार्याची अशी अंशत: फेड केल्याचे समाधानच आता आपणाला मानून घेणे भाग आहे.

रियासती, पेशवे दप्तरातील संपादित खंड, इंग्रज वकिलांच्या कागदपत्रांचे खंड व इतर अनेक संशोधित, लिखित व भाषांतरित पुस्तकांचा विचार करता सरदेसायांच्या हातून शंभरच्या जवळ ग्रंथसंख्या निर्माण केल्याचे श्रेय जाते. याशिवाय निबंध, प्रासंगिक लेख, जवळजवळ पाचशे भरतील. सतत ७० वर्षे कामाचा हा व्याप सरदेसाई सांभाळीत होते. मात्र सुखी व स्वस्थ जीवनामुळे हे शक्य झाले असे कोणाला वाटल्यास त्याचा गैरसमज दूर व्हावा.

सुख तर दूर राहोच—पण दु:ख व दुर्भाग्य याने जन्मभर सरदेसायांची साथ केली. सरदेसाई यांनी ३६ वर्षे रात्रंदिवस निष्ठेने व तळमळीने सयाजीराव महाराजांची सेवा केली, परंतु स्वत:चे चरित्र लिहिले नाही व

सेवानिवृत्त न होण्याचा सल्ला ऐकला नाही, म्हणून महाराजांनी त्यांचे पेन्शन बंद केले. घरातील सर्वांचे नीटनेटके पाहून धाकट्या भावांची शिक्षणे केली, त्यांना पुढे आणले, परंतु एका भावाने त्यांना चांगलेच गोत्यात आणले. डॉक्टरेट मिळविलेला एकुलता एक हुषार व चुणचुणीत मुलगा श्यामकांत डोळ्यादेखत वारला. इतिहासाच्या प्रांतात त्यांनी एवढी कामगिरी केली की, त्यांच्या रियासती हातात धरल्यावाचून कोणालाही संशोधनाला सुरवातच करता येऊ नये; परंतु याच प्रांतातल्या सज्जनांनी त्यांना तुच्छतापूर्वक वागणूक देऊन त्यांची मानखंडना केली. मराठीत इतिहासाचे एवढे प्रचंड वाङ्मय निर्माण करूनही साहित्य संमेलनाचे साधे अध्यक्षपद देण्यासही फार खळखळ झाली. ६० वर्षे आयुष्यात साथ दिलेली पत्नी निवर्तल्यामुळे शेवटची सोळा वर्षे त्यांना अक्षरशः एकाकी जीवन जगावे लागले. त्यांचे एक बंधु नेत्रतज्ज्ञ डॉ. सरदेसाई यांनी कामशेतला नानासाहेबांना राहण्याची व अन्य सोय करून त्यांना लेखनासाठी व संशोधनासाठी स्वास्थ्य व निवांतपणा मिळवून दिला. ९५ वर्षांच्या दीर्घ कालखंडात सुखदुःखाचे अनेक प्रसंग त्यांनी अनुभवले. फलाची किंचितही आशा न धरता अंगीकृत कार्य पूर्ण करण्याची भगवद्‌गीतेची शिकवण त्यांनी तंतोतंत पाळली होती. सुखदुःखाच्या प्रसंगी मनाची स्थिरताही त्यांनी ढळू दिली नाही. मुलाच्या निधनानंतर जीवन उदास झाले असता संस्कृतचा अभ्यास करून महाभारत स्वतः वाचून इतरांना वाचून दाखविणे या गोष्टी यामुळेंच त्यांनी केल्या. स्थितप्रज्ञवृत्ति अंगी बाळगणे ही साधी गोष्ट नव्हे. हे महत्तम पुरुषाचे लक्षण मानले जाते.

रियासतकार सरदेसाई वारले व इतिहास पोरका झाला. संशोधक व अभ्यासक यांच्यावरील तीन पिढ्यांचे छत्र गेले. विद्यालये, महाविद्यालये व विद्यार्थी आहेत तोपर्यंत इतिहासाचे अध्ययन व अध्यापन होत राहीलच. इतिहासातील गोष्टींना बाजारभाव आहे तोपर्यंत लिहिणारेही आढळतील. परंतु धंदा किंवा श्रम यांकडे लक्ष न देता, घरातील किंवा बाहेरील संकटांना तोंड देत सतत ७० वर्षे इतिहासाचा अभ्यास, संशोधन व लेखन करणारा पुरुष यापुढे निघणे कठीण. रियासतकारांना आमचे शतशः प्रणाम !

* * *

७

बृहन्महाराष्ट्रातील इतिहासाभ्यासक कै. डॉ. अ. स. आळतेकर

नोव्हेंबर १९५९ च्या शेवटच्या आठवड्यात महाराष्ट्रातील दोन व्यासंगी इतिहासकार कैलासवासी झाले. दिनांक २५ नोव्हेंबर, १२५९ या दिवशी डॉ. अनंत सदाशिव आळतेकर यांचे पाटणा मुक्कामी झालेले निधन व दिनांक २९ नोव्हेंबर १९५९ रोजी रियासतकार डॉ. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे कामशेत येथे झालेले निधन इसिहासाच्या प्रांतात विशेष जाणवणारे असे आहे. एकाच वर्षात किंवा एकाच महिन्यात नव्हे तर चार दिवसांच्या अंतरानेच दोन महाराष्ट्रीय नाणावलेले इतिहास अभ्यासक आपल्यातून कायमचे निघून जावेत हा दुर्दैवाचा आपल्यावरील मोठा घालाच म्हणावयाचा. एकाच वेळी दोघांचा मृत्युलेख लिहिण्याचे दुर्भाग्य यामुळे महाराष्ट्रावर ओढवलेले आहे.

कै. डॉ. आळतेकर व कै. डॉ. गो. स. सरदेसाई या दोन इतिहासकारांच्या अभ्यासाच्या प्रांतात व इतरही अनेक गोष्टींत भिन्नत्व आढळते. इतिहासाचे

अप्रसिद्ध : लेखन डिसेंबर १९५९.

जाणकार, अभ्यासू व संशोधक, महाराष्ट्राचे सुपुत्र एवढाच काय तो सारखेपणा त्यांच्यात होता. रियासतकार डॉ. सरदेसाई यांनी आपल्या आयुष्याच्या पहिल्या ३६ वर्षांत बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांची सेवा करीत असताना इतिहासाचा अभ्यास व लेखन यथाशक्ति केले; व नंतरच्या उत्तर आयुष्यात इतिहासाच्या अभ्यासाला स्वतःला सर्वस्वी वाहून घेतले. त्यांची ही विद्यार्थिदशा कधी संपलीच नाही. विद्यापीठात पदवी मिळविण्याच्या निमित्ताने त्यांनी अध्ययनास जी सुरवात केली ती शेवटपर्यंत. अध्ययन, अध्यापन, लेखन व संशोधन यांतच त्यांनी आपल्या आयुष्याचा सर्वकाळ खर्ची घातला. रियासतकार सरदेसाई यांच्या अभ्यासाचा विषय "भारताचा अर्वाचीन इतिहास" व विशेषतः "मराठ्यांचा इतिहास" हा होता. त्यांनी आपले बहुतांशी लेखन मराठीत लिहिले. "शालोपयोगी भारतवर्ष" हे नानासाहेब सरदेसाई यांचे पुस्तक पाठ्यपुस्तक म्हणून बरेच दिवस वापरात होते; व त्याच्या तिसापेक्षा अधिक आवृत्त्याही प्रसिद्ध झाल्या. यामुळे व रियासतींचा उपयोग सर्वसामान्य विद्यार्थ्यांपासून संशोधकापर्यंत सर्वांना होत असल्यामुळे रियासतकारांना लोकप्रियता मोठ्या प्रमाणावर मिळाली. या उलट डॉ. आळतेकर यांची स्थिति होती. महाराष्ट्रात शिक्षण घेतल्यावर डॉ आळतेकर हे उत्तर हिंदुस्थानात गेले तो तेथेच त्यांनी आपल्या आयुष्याची अखेर गाठली. त्यांच्या अभ्यासाचा विषय "प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृति" हा होता; व त्यांनी आपले सर्वच लिखाण इंग्रजीतून केले. यामुळे विद्वानांच्या मेळाव्यात डॉ. आळतेकरांचे नांव अत्यंत आदराने घेतले जात असले तरी सर्वसामान्य मराठी माणसाला ते बव्हंशी अपरिचित राहिले. त्यांच्या निधनामुळे प्राच्य विद्येचा एक नाणावलेला अभ्यासक गेला याची जाणीव मराठी मनाला जेवढी व्हावयास हवी होती तेवढी झाली नाही; याचे कारण हेच आहे. त्यांच्या इंग्रजी लिखाणामुळे सर्वसामान्य मराठी वाचकाला ते अज्ञातच राहिले.

डॉ. आळतेकर यांचे घराणे पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानातील 'कागल' या ठिकाणचे. त्यांचे वडील सदाशिव खंडोबा आळतेकर हे त्यांच्या पिढीतील उदारमतवादी पुढारी, परंतु लोकमान्य टिळकांचा अभिमान असणारे असे होते. ३० ऑगस्ट १८९८ साली अनंतरावांचा जन्म झाल्यानंतर सदाशिवराव

आळतेकर त्या वेळच्या कोल्हापूर संस्थानच्या दूषित वातावरणाला कंटाळून कऱ्हाड येथे आले व त्याच ठिकाणी त्यांनी पुढील आयुष्यक्रम घालविला. सदाशिवराव आळतेकर हे संत वाङमयाचे, विशेषत: रामदासी वाङमयाचे चहाते होते. अनंतरावांनी आपल्या अभ्यासाचा व्यासंग वडिलांपासून घेतला असे म्हणावयास हरकत नाही.

१९१५ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तम रीतीने उत्तीर्ण झाल्यानंतर आळतेकर पुण्याला आले व त्यांनी आपला पुढील अभ्यास पुण्यातील सुप्रसिद्ध डेक्कन कॉलेजमध्ये केला. इंटरच्या परीक्षेत पहिला वर्ग व पारितोषिकांचे ते मानकरी होते. बी. ए. च्या परीक्षेतही पहिला वर्ग व "भाऊदाजी पारितोषिक" त्यांनी मिळविले. नंतर दोन वर्षांनी ते एम्. ए. च्या परीक्षेला बसले. त्यांनी आपले संपूर्ण पेपर लिहून पर्यवेक्षकांच्या हातात देताना ते खोडून टाकले. हेतु हा की पुढील वर्षी संस्कृत विषयाला दिले जाणारे 'कुलगुरु सुवर्णपदक' मिळवावयाचे; आणि पुढील वर्षी त्यांनी ते मिळविलेही. या परीक्षेतील त्यांची उत्तरे अनुभवी व नाणावलेल्या संशोधकांच्या तोडीची आहेत असा शेरा त्या वेळी परीक्षकांनी दिला होता.

डॉ. अ. स आळतेकर यांचे सर्व लिखाण (काही छोटया पुस्तिका वगळता) इंग्रजीत केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या पुस्तकांचा परिचय करून देताना त्यांचे मराठी भाषांतर केले आहे हे मराठी वाचकांनी कृपया ध्यानात घ्यावे. एम्. ए. झाल्यानंतर त्यांनी संशोधनास सुरुवात केली. 'गुजराथ व काठेवाड येथील नगरे व पुरे' आणि 'पश्चिम भारतातील ग्रामीण राज्यव्यवस्थेचा इतिहास' या दोन संशोधनात्मक प्रबंधामुळे त्यांना एकदम कीर्ति मिळाली. बनारस हिंदु विद्यापीठाचे संस्थापक व संवर्धक पं. मदन मोहन मालवीय यांनी त्यांना काशी येथे नेऊन दोन वर्षे अभ्यास-वेतन दिले. त्या वेळी त्यांनी 'राष्ट्रकूट आणि त्यांचा काळ' या विषयावर प्रबंध लिहिला. १९३० साली 'प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति' या विषयाच्या 'महींद्रचंद्र नंदी प्राध्यापक' या आसनावर त्यांची नेमणूक झाल्यापासून त्यांना संशोधन करण्यास स्थिरता लाभली. १९३९ पर्यंत ते हिंदु विद्यापीठात होते. काशी क्षेत्रातील व्यासंगी परंपरेत त्यांच्या अभ्यासास बहर आल्यास नवल नाही 'हिंदु संस्कृतीतील स्त्रियांचे स्थान'

" वाकाटकांचा इतिहास ", " प्राचीन भारतातील राज्य आणि कारभार ", " प्राचीन भारतातील शिक्षणपद्धति ", " वाराणसीचा इतिहास ", " बनारस व सारनाथ ", "पूर्वी आणि आता " इत्यादि नामवंत ग्रंथ त्यांनी या काळात लिहिले. त्यांच्या अभ्यासाची कीर्ति याच काळात अखिल भारतात झाली.

१९४९ पासून १९५७ पर्यंत डॉ. आळतेकर यांनी पाटणा विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. पाटण्यालाही त्यांचा व्यासंग व लिखाण चालूच होते. " हिंदु धर्माची साधने ", " गुप्त काळातील नाणी " व इतर अनेक संशोधनात्मक निबंध त्यांनी या वेळी लि न प्रसिद्ध केले. पाटणा विद्यापीठातन १९५७ साली सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी तेथेच काशीप्रसाद जयस्वाल संशोधन संस्थेचे संचालकत्व स्वीकारून आपले संशोधन पुढे चालू ठेवले.

डॉ. आळतेकरांच्या संशोधनाचे स्वरूप चतुरस्र होते. शिलालेख, ताम्रपट, बौद्ध, जैन व हिंदूंचे इतर प्राचीन वाङमय व नाणी या सर्व विषयांचा त्यांचा व्यासंग गाढा होता. विशेषतः नाण्यांचा सशास्त्र व चौरस अभ्यास करून त्यांनी इतिहाससाधनाचे एक दालन समृद्ध केले. भारतीय नाणी-शास्त्रसंशोधन संस्था स्थापन करून त्यांनी १९५१ पासून त्या संस्थेचे अध्यक्षपदही भूषविले. नाणे संशोधक पत्रिकेचे ते १५–१६ वर्षे प्रधान संपादक होते. नाण्यावर अभ्यास करताना नवीन संशोधकाला संदर्भ म्हणून उपयोगी पडावा असे नाणे विषयक अनेक ग्रंथ प्रसिद्ध करण्याची त्यांची मनीषा होती. परंतु या विषयावर ४–५ ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर काळानेच त्यांच्यावर झडप घातल्याने त्यांचे हे कार्य अपुरे राहिले.

डॉ. आळतेकरांची विद्वत्ता विद्वत्सभेमध्ये मान्यता पावलेली असून त्यांनी काही विद्वत्सभा व मानाच्या जागा भूषविलेल्या आहेत. १९४७ साली मुंबई येथे भरलेल्या 'न्यूमिसमॅटिक सोसायटी' च्या वार्षिक बैठकीचे तें अध्यक्ष होते. १९५० साली अमेरिकेतील 'येल विद्यापीठा'चे ते 'अभ्यागत प्राध्यापक' होते. त्याच वर्षी ब्रिटिश वेस्ट इंडीज बेटांमध्ये 'भारतीय संस्कृति' या विषयावर व्याख्याने देण्यासाठी भारत सरकारने त्यांची नियुक्ति केलेली होती. १८५७ साली पश्चिम जर्मन सरकारचें

पाहुणे-प्रतिनिधि म्हणून ते जर्मनीत जाऊन आले. त्याच वर्षी दिल्ली येथील अखिल भारतीय प्राच्य विद्यापरिषदेचे ते अध्यक्ष होते. अखिल भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्षस्थानही त्यांना या पूर्वीच मिळावयाचे, परंतु ते लांबले आणि १९५९ साली गौहत्ती येथे भरणाऱ्या अखिल भारतीय इतिहास परिषदेच्या २२ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून ते निवडले गेले. परंतु काळाने अवेळी झडप घातल्याने दुर्दैवाने ते स्थान त्यांना भूषविता आले नाही. २४ नोव्हेंबर १९५९ च्या मध्यरात्रीनंतर पोटात अल्सर विकार होऊन व तो फुटून रक्तस्राव व रक्ताच्या ओकाऱ्या होऊन ते वारले. गौहत्ती अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचे भाषण लिहून ते दुरुस्त करीत असतानाच त्यांचा हृदयद्रावक अंत झाला. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे हे भाषण महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी वाचून दाखविले. गौहत्ती अधिवेशनात इतिहास परिषदेच्या कोणत्याही अधिवेशनात आजपर्यंत कधीही न आलेली अवकळा या वेळी आलेली होती.

डॉ. आळतेकर यांना कर्तव्य करीत असतानाच मृत्यु आला. यातच त्यांच्या चरित्राचे सार साठविलेले आहे. मृत्यूपूर्वी दोनच दिवस इतिहास संशोधनाची एक सहल त्यांनी पुरी केली होती. तिबेटमधील ग्रंथांचा अभ्यास त्यांनी शेवटी सुरू केला होता. तत्संबंधीचा त्यांचा एक इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. डॉ. आळतेकर हे राहणीने अत्यंत साधे, अबोल, वृत्तीने सज्जन व सतत परिश्रम करणारे असे होते. प्राच्य विद्येचा त्यांना फार अभिमान होता. या विद्येच्या प्रसाराचा समाजाला उपयोग आहे अशी त्यांची नितान्त श्रद्धा होती. म्हणूनच मृत्यूने झडप घालीपर्यंत त्यांनी आपल्या बुद्धीला मालिन्य व लेखणीला आळस येऊ दिला नाही. डॉ. आळतेकरांच्या ६१ वर्षापर्यंतच्या कार्याकडे पाहिले असताना कोणालाही त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक पटावी व परिश्रमाबद्दल हेवा वाटावा असे कार्य त्यांनी करून ठेविले आहे. त्यांच्या इंग्रजी ग्रंथांचे मराठी भाषांतर करण्याचे काम महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृति मंडळाने तज्ज्ञांकडून करून घेतले पाहिजे. इंग्रजी न जाणणाऱ्या अभ्यासू मराठी वाचकांपुढे या महाराष्ट्रीय प्रकांड पंडिताचे सर्व संशोधन आले पाहिजे. त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास हेच त्यांचे ऋण फेडण्याचे एकमेव साधन आपल्याजवळ उपलब्ध आहे.

* * *

८

१७१४ चा अहमदाबाद येथील दंगा

गेल्या वर्षी अहमदाबाद व या वर्षी भिवंडी, जळगाव इत्यादि ठिकाणी जातीय दंगे झाले व देशाच्या भल्याविषयी मनात चिंता असणारे लोक विचारात पडले. केंद्र-सरकार, राज्य-सरकारे व विचारवंतांच्या संघटना यांच्यातर्फे कार्यकारण-मीमांसाही सुरू झाली आहे. वृत्तपत्रे व राजकीय पक्ष यांच्यामार्फतही भरपूर चर्चा सुरू आहे. राजकीय पक्ष या दंग्यांची जबाबदारी एकमेकावर टाकून एकमेकांना बदनाम करण्याचा जोरात प्रयत्न करीत आहेत. स्वातंत्र्य मिळण्या-पूर्वी जातीय दंगा झाला की, त्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारवर टाकून रिकामे होता येई. 'फोडा व झोडा' या नीतीतून हे दंगे होतात हे त्या वेळी नेहमी सांगितले जाई. स्वातंत्र्यपूर्व-काळातील ब्रिटिश सरकारविरुद्ध असंतोष निर्माण करणारी ही दंग्यांची मीमांसा किंवा राजकारणातील आपला 'धंदा' टिकविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी एकमेकांवर केले जाणारे आरोप, याविषयी काहीही न म्हटलेले बरे. परंतु ऐतिहासिक दृष्ट्या हिंदु-मुसलमान दंग्यांचा प्रश्न हा आजकालचा नाही. ब्रिटिशांचे राज्य येथे स्थिर होण्यापूर्वी व मुसलमानी अंमलातही हिंदु-मुसलमानांचे दंगे होत असत. अहमदाबादला १७१४ साली झालेल्या हिंदु-मुसलमान दंग्यासंबंधी

प्रसिद्धि : 'सह्याद्रि' मासिक, पुणे, जुलै, १९७०.

बरीच माहिती मला काही फारसी ग्रंथांत मिळाली. ती मी एका संशोधन-निबंधाद्वारे भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, या संस्थेच्या या वर्षाच्या वार्षिक संमेलनात साधार मांडली. ही माहिती स्वातंत्र्यकाळापूर्वीची, ब्रिटिश-पूर्वकाळातील, फार काय, मराठ्यांचे साम्राज्य प्रस्थापित होण्यापूर्वीची अस-ल्यामुळे, हिंदु-मुसलमान दंग्याच्या कारणांचा मूलभूत अभ्यास करण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. हे दंगे कां होतात, कसे पसरतात व त्यांचा शेवट काय होतो, हे समजण्याच्या दृष्टीने ही हकीकत महत्त्वाची असल्याने साररूपाने मी ती वाचकांच्या समोर ठेवीत आहे.

ही हकीकत इ. स. १७१४ साली अहमदाबाद शहरात झालेल्या हिंदु-मुसल-मान दंग्याची आहे. 'मिराते अहमदी' या फारसी ग्रंथाचा लेखक अलीमहमद-खान व 'सियर-उल-मुताखेरिन' या फारसी ग्रंथाचा लेखक सय्यद गुलाम हुसेन-खान यांनी ही हकीकत आपल्या इतिहासग्रंथात सविस्तर दिलेली आहे. हे लेखक व त्यांनी लिहिलेले ग्रंथ मान्यवर समजले जातात, हे इतिहासप्रांतातील जाणकारांना माहीतच आहे. बॉबे गॅझेटियर व कमिशरियतसारखे नामवंत इतिहास-लेखक या माहितीचा आपल्या लेखनासाठी आधार घेतात एवढे सांगितले म्हणजे पुरे. माहिती लिहिणारे हे लेखक मुसलमान आहेत. तसेच १७१४ साली अहमदाबादला राज्य मोंगलांचे होते. (मराठ्यांचा अजून तेथे अधिकार प्रस्थापित व्हावयाचा होता.) दाऊदखान पन्नी हा या वेळी अहमदा-बाद सुभ्याचा मोंगलदरबारतर्फे सुभेदार होता. पुढील हकीकत वाचण्यापूर्वी या गोष्टी लक्षात ठेवणे जरूर आहे.

१७१४ च्या होळीच्या सणाच्या निमित्ताने हरिराम नावाच्या एका साव-काराच्या गुमास्त्याने आपल्या काही मित्रमंडळींना व आपल्या व्यवसायातील लोकांना अहमदाबादच्या आपल्या झवेरीवाड्यात (सराफगल्लीत) सण साजरा करण्यासाठी बोलावले. आगत–स्वागत, पानसुपारी झाल्यावर सर्व मंडळी बाहेर येऊन होळी साजरी करू लागले. रंग उडविणे, गुलाल उधळणे इत्यादि गोष्टी करीत करीत मंडळी ऐन रंगात आली. योगायोगाने त्या वेळी, त्या रस्त्याने एक मुसलमान जात होता. त्याला पाहताच, त्याला आपल्या खेळात ओढावा या उद्देशाने त्याला या लोकांनी वेढले व त्याला गुलाल लावून त्याच्या अंगावर रंगही टाकला. या गोष्टीचा त्या मुसलमानाला फार

अपमान वाटला व तो तशाच अंग रंगलेल्या स्थितीत आपल्या काही मित्रां-समवेत महमदअली नावाच्या धर्मगुरूपुढे जाऊन उभा राहिला. या गोष्टीचा बभ्रा होऊन बरेच मुसलमान त्या धर्मगुरूपुढे जमले व त्यांनी त्या धर्मगुरूला ओढून जामा मशिदीत नेले. सुन्नी बोहरी मुसलमानाचा प्रमुख अब्दुल अझीझ यालाही बोलाविण्यात आले. तोपर्यंत ही वार्ता चोहोकडे पसरली व सर्व थरातील मुसलमानांनी मोठ्या जमावाने 'दीन दीन' करीत त्या मशिदीवर आपले मोर्चे आणले. मोगली लष्करातील मुसलमान शिपाईही यात पुढे सामील झाले. या घटनेने काही तरी भयंकर घडले आहे, अशी त्या सर्वांची भावना होती. पुढे ते सर्वजण अहमदाबादच्या प्रमुख काजीच्या घराकडे गेले. ही धर्माची बाब आहे. काजी हा (त्या वेळी) सरकारी अधिकारी असल्याने त्याने या गोष्टीचा निकाल दिला पाहिजे, अशी त्या सर्वांची भावना होती. काजी खैरुल्लाखान घर बंद करून लपून बसला. शेवटी त्या जमावाने काजीच्या घराला आग लावून, त्याला बाहेर काढून आपल्याबरोबर घेतले. काजी बरोबर असला म्हणजे आपली सर्व कृत्ये योग्य ठरतील, निदान पचतील, ही त्या जमावाची भावना होती.

एका विशिष्ट कारणाने जमलेला तो जमाव अनावर बनला व लूट, जाळपोळ, हिंदूंच्या कत्तली कराव्यात अशी त्याच्या मनात तीव्र इच्छा झाली. "(The whole crowd was bent upon killing and looting Hindus." Mirat-i-Ahmadi. English Translation, P. 358)

त्या इच्छेप्रमाणे काजी, धर्मगुरु, बोहरी धर्मप्रमुख इत्यादि नेते ज्यांच्यात होते तो मुसलमानांचा जमाव, हिंदूंच्या दिसेल त्या घराला लुटीत व जाळीत पुढे चालला. कापड बाजार, शहरातील प्रमुख बाजार त्यांनी जाळून-लुटून फस्त केला. सराफबाजारातील सोने, नाणे व दागिने लुटून शेवटी सर्व सराफ बाजार जाळून टाकला. ही सर्व लुटालूट व जाळपोळ एकतर्फी होती हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. यानंतर हा जमाव झवेरीवाड्याकडे (सराफ आळीकडे) जाळपोळीसाठी निघाला. झवेरीवाड्यात पिढीजात श्रीमंत व नामवंत सावकारांच्या हवेल्या होत्या. त्यांच्यापैकी कपूरचंद भन्साळी हा त्या वेळी त्यांचा पुढारी होता. कपूरचंद भन्साळी हा अहमदाबादचा नगरशेठ म्हणून मानला जात असे. झवेरीवाडा जाळावयास मुसलमानांचा जमाव जमलेला पाहून त्याने गल्लीचे मोठे दरवाजे लावून घेतले. आपल्याजवळची शस्त्रास्त्रे वाटून संरक्ष-

णाची व्यवस्था केली. विशेष म्हणजे काही गुजराथी मुसलमान लढवय्ये बेकार असत, असे अनेक मुसलमान त्यांनी संरक्षणासाठी नोकरीला ठेवले. दोन दिवस मोठी धुमश्चक्री झाली व वित्तहानि व प्राणहानि फारच झाली. शेवटी दौऱ्यावर गेलेला सुभेदार दाऊदखान पन्नी परत आल्यावर, त्याने सैनिकांच्या करवी शांतता प्रस्थापित केली.

या दंगलीचे आणखीही एक कारण एका मुसलमान लेखकाने दिले आहे. एका हिंदूच्या घराला लागूनच मुसलमानाचे घर होते. (बहुधा ते भावकीचे असावे.) होळीच्या रात्री तो हिंदु होळी पेटवणार एवढ्यात शेजारच्या मुसलमानाने या कृत्याला हरकत घेतली. 'मी माझ्या घराचा मालक आहे' असे म्हणून त्या हिंदूने ती हरकत फेटाळून लावली व होळी पेटवून आपल्या धर्माप्रमाणे सर्व विधि केले. दुसऱ्याच दिवशी हरकत घेणाऱ्या शेजारच्या मुसलमानाने एक गाय आणून आपल्या दारात बांधली. आपल्या काही बांधवांना गोमांसाची मेजवानी देऊन, गरिबांना बाकीचे गोमांस वाटून टाकू असे त्याने जाहीरही केले. शेजारच्या हिंदूने हरकत घेतली. तेव्हा त्याने 'मी माझ्या घराचा मालक आहे. मला वाटेल ते मी करीन' असे म्हणून ती गाय आपल्या घरी कापली. यामुळे त्या गल्लीतील हिंदु संतप्त झाले व गाय कापलेल्या जागी धावून आले. जमलेले मुसलमान पळून गेले किंवा लपून बसले. संतप्त हिंदु जमावाने गाय कापलेल्या कसायाचा शोध चालविला. तो घरी नव्हता तेव्हा त्याच्या १४ वर्षांच्या मुलाला आणून गाय कापलेल्या ठिकाणी त्याला मारून टाकले. या घटनेमुळे संतप्त होऊन मुसलमानांनी जाळपोळ, लुटालूट व कत्तली केल्या. या दोहोंपैकी एक किंवा दोन्हीही कारणे या दंग्याला कारणीभूत असण्याची शक्यता आहे.

दंगा शांत झाल्यावर (आजच्याप्रमाणेच) एकमेकाशी जुळवून घेण्याकरिता पुढारी एकत्र जमले; पण मुसलमानांना सुभेदाराकडून आपल्यावर अन्याय होतो आहे असे वाटले. म्हणून तक्रार करण्यासाठी त्यांचे पुढारी बादशहाकडे दिल्लीला गेले. सुभेदाराने—दाऊदखान पन्नीने—हिंदूंच्या पुढाऱ्यांनाही दिल्लीस जाण्यास सुचविले. स्वतः सुभेदाराने जी सविस्तर हकीगत बादशहाला अधिकृत म्हणून पाठवली त्यात "या दंग्यात हिंदूंचा काहीही दोष नाही, दंग्याची सर्व आगळीक मुसलमानांची आहे. आक्रमक वृत्ति मुसलमानांनी दाखविली

आहे" अशी माहिती होती. या इतिवृत्तावर किंवा माहितीपत्रावर सुभेदार, सुभ्याचा सेनापति, अहमदाबादचा प्रमुख काजी व सर्व प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांच्या सह्या होत्या आणि विशेष म्हणजे हे बहुतेक सर्व मुसलमान होते.

मुसलमानांचे तीन पुढारी दिल्लीला येताच, सय्यद बंधूंपैकी दिल्लीचा कारभारी अबदुल्ला सय्यद याच्या विश्वासातील अधिकारी रतनचंद याने त्या तिघांना तुरुंगात टाकले. खोजा महमद जाफर या धर्मप्रेमी मुसलमानाने शेवटी त्यांची तुरुंगातून सुटका केली.

दिल्लीला घडलेला सविस्तर वृत्तान्त अहमदाबादच्या अलीमहमदखानाने थोडा वेगळा दिला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, अहमदाबादच्या दंग्याची व हिंदूंच्या घरांची व व्यापारी पेठांच्या जाळपोळीची हकीकत दिल्लीला पोचताच, तेथील सावकार व व्यापारी अस्वस्थ झाले. बादशहा शहराबाहेर लष्करी तळावर कोठें तरी निघाला होता. त्याच्या तळावरील हिंदु व गुजराथी व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद करून, आजच्या भाषेत हरताळ पाडून बादशहाकडे एकमुखाने एक तक्रार अर्ज दिला. ही जाळपोळ, कत्तली करण्यामागे मौलवी महमदअली व बोहरी धर्मप्रमुख अबदुल अझीझ हे दोघे पुढारी आहेत म्हणून लेखी निवेदन दिले. बादशहाने त्यांना पकडून आणण्यासाठी आपले खास 'गुर्झबारदार' पाठविले. परंतु ते येण्यापूर्वीच ही माहिती लागल्याने मुसलमान पुढारी आपण होऊन बादशहाकडे भेटण्यासाठी म्हणून गेले. त्यांच्या पाठोपाठ कपूरचंद भन्साळी व हरिराम हे हिंदूंचे पुढारीही दिल्लीला गेले.

मौलवी महमदअली हा अत्यंत प्रभावी वक्ता होता. तो बोलू लागताच पुढचे श्रोते मंत्रमुग्ध होऊन जात असत. दिल्लीला गेल्याबरोबर तो एका मोठ्या मशिदीत गेला व त्याने कुराणावर भाष्य करावयास सुरवात केली. पुढच्या श्रोत्यांवर त्याची फार चांगली छाप पडली व तो एकदम लोकप्रिय ठरला. त्याची कुराणावरील प्रवचने ऐकण्यासाठी गरीब व श्रीमंत मुसलमानांच्या झुंडीच्या झुंडी मशिदीकडे लोटू लागल्या. दिल्लीला त्याला बरेच अनुयायी मिळाले. लौकरच त्याची प्रशस्ती एका सरदारामार्फत बादशहाच्या कानावर गेली. बादशहाने त्याला आपल्या भेटीला बोलावले. त्याच्या बोलण्याचा बादशहाच्या मनावरही परिणाम झाला. त्याच्या तोंडून सर्व

हकीकत ऐकल्यावर अशा सज्जन व विद्वान् माणसाला, हिंदु व्यापाऱ्यांच्या खोट्या तक्रारीमुळे दिल्लीला येण्याचा त्रास झाला याबद्दल बादशहाला खेद वाटला. बहुधा त्याच्या बोलण्याच्या प्रभावामुळे, त्याच्या निर्दोषित्वा-बद्दल बादशहाची खात्री झाली. बादशहाने रागाने कपूरचंद भन्साळी, हरिराम या हिंदु व्यापाऱ्यांना तुरुंगात टाकले. महमदअलीच्या कान भरण्याच्या कृतीने बिचाऱ्या भन्साळीच्या पायांत बेड्या घातल्या गेल्या. बादशहाच्या हुकुमाने भन्साळीची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आली. सुभेदार दाऊदखान पन्नीच्या दंग्याच्या अहवालापेक्षा मौलवी महमदअलीचे कुराणा-वरील प्रवचन जास्त प्रभावी ठरले. असे बरेच दिवस तुरुंगात गेल्यावर भन्साळीच्या लक्षात आले की, महमदअली व अबदुल अझीझच्या साहाय्या-वाचून आपली सुटका होणे आता कठीण आहे. तेव्हा त्याने तुरुंगातून त्या दोघांना गुप्तपणे निरोप पाठविला. "आपण सर्वजण एका प्रांतातले व एका गावचे शेजारी आहोत. आता आपण शत्रुत्व विसरून त्याचे रूपांतर मैत्रीत करू या. म्हणजे आपणाला आपल्या बायका-मुलांत परत जाता येईल." बहुधा या निरोपाबरोबर काही मौल्यवान भेटीही पाठवल्या गेल्या असाव्यात. अबदुल अझीझ परत जाण्यासाठी बादशहाची परवानगी मागण्यासाठी गेला तेव्हा त्याने हिंदु व्यापाऱ्यांचीही बादशहाकडून सुटका करून घेतली. अशा रीतीने ते सर्वजण सुखरूपपणे परत आपल्या गावी आले. त्या वेळच्या परिस्थितीत या सगळ्या गोष्टीत एक-दोन वर्षे सहज गेली असतील.

या सर्व हकीकतीचा सारांश म्हणजे दंग्याची सुरवात मुसलमानांनी केली. बुद्धिपुरस्पर केली. ठरवून सामुदायिक लुटमार, जाळपोळ व कत्तली केल्या. आपल्यावर एखाद्याने रंग उडविला किंवा घरासमोर होळी पेटवलेली दिसली या क्षुल्लक कारणास्तव, एवढ्या मोठ्या प्रमाणावर दंगा करताना व हिंदूंच्या मालमत्तेचे व जीवनाचे विध्वंसन करताना त्यांना काहीही वाटले नाही. हिंदूंच्या भावना डिवचण्यासाठी गाय दारात कापून व गोमांस उघड वाटून देताना त्यांनी कोणताही विचार केला नाही. आपल्या एखाद्या मुसलमान बांधवावर, स्वधर्मीयावर अन्याय होत आहे असे कोणी म्हणताच, गरीब व श्रीमंत, खेड्यातील व शहरातील सर्व मुसलमान एकदम एकत्र येतात व कायदा हातात घेतात ही वस्तुस्थिति चिंतनीय आहे. या घटना

होताना मौलवी, धार्मिक नेते, काजी या लोकांनी लूटमार, जाळपोळ व कत्तली करण्यात जमावाला मार्गदर्शन केले व उत्तेजन दिले, ही गोष्ट महत्त्वाची आहे. अत्याचार करण्यात निर्धास्तपणा आहे असे मुसलमान समाजाला वाटले व त्यामुळे त्यांनी मागेपुढे न पाहता अविचाराने भयानक गोष्टी केल्या. जरूर पडली तर बादशहा व वजीर मुसलमान असल्याने आपणांला काही उपसर्ग होणार नाही हीच भावना मुसलमान समाजाने ठेवली. मौलवी महमदअलीचे कुराणावरील प्रवचन आवडल्यामुळे, फरुखशिअर बादशहाने त्याला निर्दोष ठरवून, प्रतिस्पर्धी कपूरचंद भन्साळीच्या पायांत बेड्या ठोकल्या व त्याची मालमत्ता जप्त करून टाकली. मोगली कारभाराचा हा नमुना अभ्यासण्याजोगा आहे.

या उलट हिंदु समाजाच्याही काही गोष्टी तपासून पाहण्याजोग्या आहेत. आपल्या धर्माच्या सणात, परधर्मीयाला त्याच्या इच्छेविरुद्ध सामील करून घेणे बरोबर नाही. शेजाऱ्याने गाय कापली म्हणून रागावून कसायाच्या मुलाला अद्दल म्हणून तेथे ठार मारणे आततायीपणाचे आहे. झवेरीवाड्यातील श्रीमंतांची घरे जाळण्यास जमाव येईपर्यंत हिंदु संघटित होऊन संरक्षणास उभे राहिले नाहीत व संरक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबतीत, हिंदु-मुसलमान दंग्याच्या ऐन धुमश्चक्रीत गुजराती श्रीमंत सावकार मुसलमान शिपाई नोकरीला ठेवून संरक्षण करू इच्छीत होते. सुभेदार मुसलमान असूनही दंग्याची हकीकत सरकारात कळविताना हिंदु निर्दोष आहेत, आगळीक व आक्रमणवृत्ति मुसलमानांची आहे हे तो स्पष्टपणे बादशहाला कळवितो हा या प्रकरणातील दिलासा आहे. या वृत्तीमुळेच तो दंगा लवकर मिटवू शकला. बेकार मुसलमान शिपाई, पैशासाठी हिंदु सावकाराच्या संरक्षणास उभे राहिले ही आर्थिक बाबही ध्यानात धरण्याजोगी आहे.

हिंदु-मुसलमान दंगे थांबले पाहिजेत. त्याशिवाय देशाची ऊर्जितावस्था येणार नाही, याबद्दल कोणाचेच दुमत नाही. परंतु हे दंगे कां होतात याचा मूलग्राही व वस्तुनिष्ठ विचार केल्याशिवाय त्यावर तोडगा सापडणार नाही. 'साप साप' म्हणून भुई धोपटण्याने साप तर मरणार नाही, परंतु हात मात्र दुखतील. दंग्याला आजकाल कारणीभूत होणाऱ्या घटना व पूर्वी

घडलेल्या घटना अभ्यासून यावर तोडगा निश्चित काढता येईल. परंतु पूर्वग्रहदूषित दृष्टि सोडावी लागेल. त्याशिवाय दंग्याचा प्रश्न सुटणार नाही. हे स्पष्ट करण्यासाठीच, मुसलमान लेखकांनीच दिलेल्या हकीकतीच्या आधारे २५० वर्षांपूर्वी घडलेल्या एका दंग्याची वस्तुस्थिति मी समाजासमोर ठेवीत आहे. जातिधर्मनिरपेक्ष, वस्तुनिष्ठ दृष्टीने व आपल्या विरोधी पक्षांना व संघटनांना बदनाम करण्यासाठी, त्यांचेवर आरोप-प्रत्यारोप करण्यासाठी या दंग्यांचा उपयोग न करता या दंग्यांचा कायम उपशम करण्याचे दृष्टीने हा प्रश्न अभ्यासावा एवढीच विनंती मला सर्वांना करावीशी वाटते.

* * *

१

छ. शिवाजी महाराज

काही देशांच्या मोठेपणामुळे तेथील व्यक्ती मोठ्या ठरतात. या उलट काही व्यक्तींच्या मुळे देशाचे नाव मोठे होते. महापुरुष किंवा मोठ्या व्यक्ति त्या देशाचे किंवा विभागाचे तत्कालीनच भवितव्य घडवितात असे नव्हे, तर ते आपल्या देशाला व समाजाला कायमचा आदर्श घालून देतात. महाराष्ट्राच्या निसर्गाने व भौगोलिक परिस्थितीने शिवाजी राजाला अनुकूल वातावरण तयार करून दिले; तर शिवाजी राजाने महाराष्ट्राचे नाव, हिंदुस्थानच्या इतिहासात गौरवास्पद करून ठेवले. महाराष्ट्राचा मोठेपणा शिवाजीराजांमुळे उजळून निघाला. शिवाजी व महाराष्ट्र हे न तुटणारे नाते आहे. शिवाजीच्या कर्तबगारीचा वारसा स्वीकारून, मराठ्यांनी हिंदुस्थानच्या इतिहासात दोडशे वर्षे जी कामगिरी केली, हिंदुस्थानच्या इतिहासाला जे वळण लावले तो आपल्या अभिमानाचा व गौरवाचा विषय आहे. या दृष्टीने शिवाजीचे चरित्र व कार्य समजून घेणे मोठे उद्बोधक ठरेल.

शिवाजीचा वारसा

शिवाजीचा जन्म, जुन्नरजवळील शिवनेरी किल्ल्यावर दिनांक १९ फेब्रुवारी १६३० (फाल्गुन वद्य ३ शके १५५१)या दिवशी झाला. शिवाजीचे जन्माचे वेळी, त्याचे वडील शहाजीराजे हे मोगलांच्याविरुद्ध निकराने झुंजत होते.

अप्रसिद्ध.

मोगलांच्या तडाख्यातून, अहमदनगरची निजामशाही वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी केला. शेवटी नाउपायाने तह करावा लागला. या तहाचे वेळी पुणे व सुपे प्रांताची जहागीर त्यांना मोंगलांकडून मिळाली व या जहागिरीला विजापूर दरबारकडून मान्यताही मिळाली. यानंतर शहाजी विजापूरचा सरदार बनून कर्नाटकात गेला. शहाजीचे पुढील सर्व कार्य व पराक्रम दक्षिणेत दूर कर्नाटकात घडल्यामुळे महाराष्ट्राला त्याच्या पुढील कार्याची ओळख नाही. शिवाजीला आईकडून वारसाही चांगला मिळाला होता. जिजाबाई ही शिंदखेडच्या (वऱ्हाड) जाधव घराण्यातील होती. देवगिरींच्या यादवांचे हे घराणे, देवगिरीच्या राज्यनाशानंतर इतस्तत: पांगले. त्यातील शिंदखेडची ही शाखा प्रमुख होती. आई व वडील या दोन्ही घराण्यांकडून, अनेक पिढ्यांच्या पराक्रमाचा वारसा शिवाजीला मिळाला होता, हा वारसा स्वीकारून शिवाजीने अधिक गौरवास्पद रीतीने पुढच्या पिढीला दिला.

शिवाजीचे बालपण

बाल शिवाजीची पहिली सहा वर्षे फार हालअपेष्टेत गेली. शहाजीची मोगलांशी लढाई चालू असल्यामुळे कोणत्याही एके ठिकाणी त्याला स्थिर रहाता येत नव्हते. एका किल्ल्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर, एका दरीतून दुसऱ्या दरीत, एका जंगलातून दुसऱ्या जंगलात, अशी त्याची सारखी धावपळ चालू होती. यामुळेच महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांचा व निसर्गाचा परिचय शिवाजीला बालपणापासून झाला. शहाजी कर्नाटकात गेल्यानंतर पुणे-सुपे प्रांताची जहागीर सांभाळण्यासाठी, त्यांनी दादाजी कोंडदेव या नेकीच्या व निष्ठेच्या माणसाची नेमणूक केली. शिवाजीची व्यवस्था पाहण्यासाठी जिजाबाई त्याच्या जवळच या प्रांतात राहिली. दुर्दैवाने वडिलांचे कृपाछत्र व शिकवण यांचा लाभ शिवाजीला फारसा झाला नाही.

शिवाजीचे शिक्षण

दादाजी कोंडदेव हा विजापूर दरबारचा, नावाजलेला महसूल अधिकारी होता. यापूर्वी या प्रांतात निजामशाहीतील कामगिरीही त्याने मोठ्या नाव लौकिकाने केली होती. दादाजी कोंडदेवाने बालशिवाजीवर आपले सर्व लक्ष केंद्रीभूत करून, त्याच्यावर राजपुत्राला योग्य असे संस्कार घडविले. दादाजीने

प्रथम ओसाड पडलेल्या या प्रांताची लागवड केली. लोकांना आणवून तेथील वस्ती वाढविली. सर्वत्र कायद्याचा अंमल करून, रयतेची आबादानी वाढविली. कामासाठी मुलुखात हिंडताना, बालशिवाजीला बरोबर घेऊन त्याची सर्वत्र ओळख करून दिली. महसूल, न्यायदान व शासनाच्या इतर अंगांची शिवाजीला ओळख करून देऊन, त्याला एक उत्तम शास्ता बनविण्याची तयारी केली. विजापूर दरबारची त्या वेळी डळमळती परिस्थिति लक्षात घेऊन " हिंदवी स्वराज्याची कल्पना" त्याच्या मनात रुजवून दिली. खुद्द शिवाजीने लिहिलेल्या एका पत्रात "श्री रोहिरेश्वराचे मंदिरात, दादोपंतांचे विद्यमाने श्रीपाशी इमान घेतले व हिंदवी स्वराज्याचे मनोरथ श्री रोहिरेश्वर पूर्ण करील" असे स्पष्ट म्हटले आहे. दादाजी कोंडदेव फार दूर दृष्टीचा माणूस होता. त्याची शिस्त व शिक्षण शिवाजीला बालपणी लाभली हा योगायोग मोठा भाग्याचा म्हटला पाहिजे. दादाजीप्रमाणेच शिवाजीची आई जिजाबाई हिने देखील शिवाजीवर त्याचे बालपणी केलेले संस्कार व त्याला दिलेली शिकवण फार महत्त्वाची आहे. धर्मावर व समाजावर होणाऱ्या आघाताबाबत, तिने शिवाजीला सावध केले. रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथांचे आधारे त्याचें धर्मप्रेम जागे केले. माहेरच्या व सासरच्या मोठेपणाच्या गोष्टी सांगून, त्याच्यात आत्मविश्वास निर्माण केला. स्वराज्यस्थापनेला अनुकूल अशी त्याच्या मनाची घडण तयार केली. दादाजीने दिलेले शिक्षण व जिजाबाईने तयार केलेले मन शिवाजीला पुढच्या जीवनात फार उपयोगी पडले.

जावळीवरील स्वारी

विजापूर दरबारची बिघडलेली परिस्थिति व जवळचे अनुकूल वातावरण लक्षात घेऊन शिवाजीने स्वराज्यस्थापनेचा उद्योग सुरू केला. नेताजी पालकर, बाजी पासलकर इत्यादि सवंगडी जमवले व त्यांच्यात स्वतःविषयी प्रेम व निष्ठा निर्माण केली. सिंहगड, राजगड, तोरणा, पुरंदर इत्यादि महत्त्वाचे व बळकट किल्ले घेऊन, जावळीच्या मोऱ्यांच्या मुलुखावर स्वारी केली. जावळीचे हे मोरे, शिवाजीला विरोध करून, विजापूर दरबारला मदत करीत असत, म्हणून शिवाजीचा त्यांचेवर राग होता. जावळीचे खोरे घनदाट अरण्यांनी व्यापलेले होते. अशा बळकट ठिकाणी मोऱ्यांनी आपले आसन पक्के केलेले होते. अनेक पिढयांनी कर्तबगारी गाजविल्यामुळे त्यांना 'चंद्रराव' ही

पदवी आणि 'राजे' हा किताब विजापूरचे बादशहाकडून मिळालेला होता. मोऱ्यांचा नाश करून अनेक पिढ्यांची त्यांची साठलेली संपत्ति शिवाजीने त्यांचे-पासून हिरावून घेतली. जावळी, प्रतापगड, रायरी (रायगड) ही पुढच्या काळात अत्यंत उपयोगी पडलेली बळकट ठाणी व किल्ले त्याला या वेळी मिळाले. यामुळे त्याची हद्द समुद्राला जाऊन भिडली.

अफझलखानाचा वध

एकामागून एक किल्ले घेत, विजापूरकरांचा मुलूख आपल्या ताब्यात घेऊन, शिवाजी स्वराज्याचा विस्तार करू लागला. यामुळे विजापूर दरबारात चिंता उत्पन्न झाली. कोणातरी प्रबळ सरदाराला पाठविल्यावाचून शिवाजीचा बंदोबस्त होणे कठीण आहे हे लक्षात आल्यावर, अफजल-खानाची नेमणूक या कामावर झाली. विजापूरच्या दरबारात पैजेचा विडा उचलून, चालत्या घोड्यानिशी शिवाजीला धरून आणतो, अशी प्रतिज्ञा करून अफझलखान विजापुराहून शिवाजीविरुद्ध स्वारीस निघाला. कारण नसता वाकडी वाट करून तो प्रथम तुळजापूरला गेला व तेथील श्री अंबेच्या मूर्तीचे तुकडे करून व त्या तुकड्याचे पीठ करून त्याने त्या देवतेची विटंबना केली. पंढरपूर क्षेत्रीही उपसर्ग लावला. नंतर वाईला येऊन शिवाजीविरुद्ध त्याने हालचाली सुरू केल्या. अफझलखानाचे बरोबर मुबलक सैन्य, दारूगोळा व बऱ्याच तोफा होत्या. आपल्या सैन्याला त्याचेशी उघड लढाई करणे जमणार नाही म्हणून शिवाजीने पंताजी गोपीनाथ या आपल्या वकिलामार्फत तहाचे बोलणे लावले व मोठ्या खुबीने वाटाघाटीसाठी प्रतापगड किल्ल्याच्या मध्यावर उभारलेल्या शामियान्यात त्याला आणले. खानाला आपल्या शक्तीचा व पराक्रमाचा गर्व असल्यामुळे तो फारशी तयारी न करताच शिवाजीच्या भेटीला आला. भेटीच्या वेळी शिवाजीला ओढून घेऊन आपल्या डाव्या हाताच्या पकडीत त्याची मान दाबून खानाने उजव्या हाताने शिवाजीवर कट्यारीचे वार केले. शिवाजीने कोणतीही आगळीक केली नसता खानाने आपल्या शक्तीचा उपयोग करून त्याची मान मुरगळण्याचा व कट्यारीने त्याला ठार मार-ण्याचा प्रयत्न केला ही वस्तुस्थिति लक्षात घेणे जरूर आहे. शिवाजी सावध असल्यामुळे खानाचा त्याला ठार मारण्याचा प्रयत्न फसला. कुस्तीचे

डावपेच माहीत असलेल्या शिवाजीने खानाच्या वज्रमिठीतून आपली मान सोडवून घेतली. अंगात पोलादी चिलखत घातले असल्याने खानाची कट्यार त्याला लागू शकली नाही. सावधगिरी म्हणून जवळ बाळगलेल्या वाघनखाने शिवाजीने खानाचे पोट फाडले व दुसऱ्या हातातील जंबियाने त्याचा कोथळाच बाहेर काढला. प्रचंड शक्तीच्या व बलाढ्य देहाच्या अफझलखानाचा शिवाजीने नायनाट केला. जय्यत तयार असलेल्या मावळ्यांनी त्याच्या खुणेसरशी अफजलखानाच्या इतस्ततः पसरलेल्या व थोड्याशा बेसावध स्थितीत असलेल्या सैन्याचा धुव्वा उडविला. शिवाजीच्या सैन्याला या वेळी प्रचंड लूट मिळाली. अफजलखानाच्या या वधामुळे शिवाजीचा सर्वत्र दरारा वाढला व जवळपासचे लोक त्याला घाबरून वागू लागले.

मराठ्यांची पावनखिंड[1]

अफझलखानाच्या वधामुळे विजापुरकर अधिकच चिडले आणि त्यांनी सिद्दीजौहर या पराक्रमी सरदाराला शिवाजीला पकडून आणण्यास पाठविले. अफझलखानाचा मुलगा फाझलखान हा वडिलांच्या वधाचा बदला घेण्यास उतावीळ होता. त्या दोघांनी शिवाजीला पन्हाळगडच्या वेढ्यात अडकवून टाकले. शेवटी चोरवाटेने तेथून बाहेर पडून, मध्यरात्री शिवाजीने विशाळगडचा रस्ता धरला. जुलै (१६६०) महिन्यातील पावसाळी रात्र, आकाशात ढग भरलेले, रस्ता डोंगरकपारीचा, पाठीवर घोड्यावरून पाठलाग करणारा व पकडावयाची जिद्द बाळगणारा शत्रु, अशाही अडचणीत सतत १५–१६ तास शिवाजीने मोजक्या लोकांनिशी अंतर कापले. सायंकाळचे वेळी गजापुराजवळ घोडखिंडीत शत्रु अगदी नजीक येऊन ठेपला. विशाळगडाला जाईपर्यंत कोणीतरी शत्रूला थोपविणे जरूर होते. जवळच्या निष्ठावंत सेवकांपैकी बाजी प्रभु देशपांडे यांनी ही जबाबदारी स्वीकारली. निमुळत्या खिंडीत त्यांनी शत्रूच्या लागोपाठ होणाऱ्या हल्ल्यात खिंड अडवून ठेविली. परंतु वरचेवर त्यांचे सैन्य कमी होत चालले. स्वतः बाजी प्रभु

१ या संबंधीचा उल्लेख 'शिवभारतात' नाही. काही संशोधकांच्या मते ही घटना संशयास्पद आहे.

जखमी स्थितीतच आपल्या लोकांना धीर व उत्तेजन देत लढतच होते. शेवटी विशाळगडावर शिवाजी पोचल्याची खूण म्हणून तोफांचे आवाज झाले व बाजी प्रभूने कर्तव्यकर्म केल्याच्या समाधानात त्या घोडखिंडीत प्राणार्पण केले. त्या वेळेपासून ती खिंड मराठ्यांच्या दृष्टीने 'पावन खिंड' ठरली. जिवाला जीव देणाऱ्या अशा निष्ठावंत माणसांच्या साहाय्याने शिवाजी शत्रूशी तोंड देत होता. आपल्या चिमुकल्या स्वराज्याचे रक्षण करीत होता.

शायिस्तेखानावरील छापा

शिवाजीचे सर्व आयुष्य शत्रूशी झगडण्यात गेले. एका संकटातून सुटका होण्याच्या आत, दुसरे संकट त्याच्या समोर दत्त म्हणून उभे असे. न डगमगता एकेका संकटाला तोंड देत तो पुढे जात असे. अफजलखानाच्या संकटातून रिकामा होतो तोच सिद्दी जौहरच्या स्वारीचे संकट त्याच्यापुढे उभे राहिले. त्यातून मार्ग काढतो तो मोंगलांचा दख्खनचा सुभेदार शायिस्तेखान याची आपल्या राज्यावर स्वारी येत असल्याचे त्याला कळले. शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न दख्खनच्या विजापूरकरांना जसा नापसंत होता तसाच तो उत्तरेच्या औरंगजेब बादशहालाही नापसंत होता. शिवाजीला बुडविण्यासाठी औरंगजेबाने आपला मामा शायिस्तेखान या बड्या सरदाराला, प्रचंड सैन्यानिशी व परिपूर्ण तयारीनिशी पाठविले होते शायिस्तेखानाने शिवाजीच्या मुलुखात धुमाकूळ घालून, खुद्द त्याच्या पुण्याच्या वाड्यातच आपला मुक्काम ठोकला. शायिस्तेखानाचे हे संकट साध्या मार्गाने नाहीसे होणार नाही हे ध्यानात घेऊन शिवाजीने अत्यंत साहसी मार्ग स्वीकारला. ५ एप्रिल १६६३ ला मध्यरात्री लाल महालात शायिस्तेखान आरामात विश्रांति घेत असता, शिवाजीने अचानक त्याच्यावर छापा घातला. रोझाचे (उपवासाचे) दिवस असल्यामुळे स्वयंपाकी लोकांची गडबड चालू आहे असे समजून सर्वांनी त्याच्या येण्याकडे दुर्लक्ष केले. घराच्या सर्व वाटा माहीत असल्याने, शिवाजीने खानाला घेरले. रात्रीच्या अंधारात त्याचा ठावठिकाणा शोधून त्याच्यावर अंधारातच वार केले. पळून जात असता तरवारीचा वार त्याच्या पंजावर पडला व खानाचा जीव वाचला. परंतु त्याची बोटे मात्र कापली गेली. मोंगलांच्या प्रचंड सैन्यातून शिवाजी व त्याच्याबरोबर आलेले अनुयायी मोठ्या शिताफीने निसटून गेले. या छाप्या-

मुळे शायिस्तेखान इतका गांगरून गेला की, त्याने वेढा उठवून, सरळ औरंगाबादचा रस्ता धरला. या धाडसामुळे शिवाजीचा नावलौकिक आणखी वाढला व त्याच्या लोकांना नवी धाडसे करण्याचे स्फुरण चढले.

सुरत बेसुरत झाली

शायिस्तेखानाच्या पाडावानंतर शिवाजीने मोगलांविरुद्ध आणखी एक धाडसी डाव टाकला. मोगलांचे हल्ल्यामुळे मुलखातले उत्पन्न घटले व सैन्यावरचा खर्च वाढला. हा वाढता खर्च मोगलांच्या मुलुखांतून पैसे आणूनच भागवावयाचा असे त्याने ठरविले. त्याच्या हेरांनी पश्चिम किनाऱ्यावरील सुरत या बंदराची माहिती काढून आणली. तापीच्या मुखावरील हे बंदर त्या वेळी फार प्रसिद्ध होते. मक्केच्या यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंना येथूनच जावे यावे लागे. मोगलांच्या साम्राज्याचा परदेशाशी व्यापार या बंदरातूनच चालत असे. हे शहर अत्यंत संपन्न व भरभराटीला आलेले होते. रामनगरच्या कोळी राजाच्या प्रदेशातून जाऊन शिवाजीने अकस्मात् सुरतेबाहेर मुक्काम केला. सुरतेचा अधिकारी इनायतखान याने शहराचे रक्षण करण्याऐवजी तेथील किल्ल्यात आश्रय घेतला. या भ्याडपणाबरोबरच शिवाजीवर मारेकरी घालण्याचाही प्रयत्न त्याने केला. त्यामुळे चार दिवस (६ ते १० जानेवारी १६६४) शिवाजीने शहर यथेच्छ लुटून जाळून टाकले. सुरत बेसुरत झाली. सुरतेची प्रचंड लूट घेऊन शिवाजी परतती तो त्याला शहाजी राजांच्या मरणाची दुःखद बातमी कळाली. हौदेगिरी (कर्नाटक) येथे २३ जानेवारी १६६४ ला शहाजीराजांचे घोड्यावरून पडून अपघाती निधन झाले. जिजाबाईला अतिशय दुःख झाले. सती जाण्याची त्यांची इच्छा होती; परंतु शिवाजीराजांच्या आग्रहाखातर व त्यांच्यावरील प्रेमाने त्यांनी सती जाण्याचे रहित केले. शहाजीच्या मृत्यूमुळे शिवाजीला विजापूरकरांसंबंधी आता कोणतेच बंधन शिल्लक राहिले नाही. मोकळेपणाने राजकारणाचे डाव खेळावयास तो स्वतंत्र झाला.

जयसिंगाची स्वारी

शायिस्तेखानावरील छापा व सुरतेची लूट, यांमुळे औरंगजेब बादशहा

अतिशय संतप्त झाला. त्याने यानंतर मिर्झा राजा जयसिंग या अनुभवी व कसलेल्या सेनाधिकाऱ्याला शिवाजीविरुद्ध लढण्यासाठी पाठविले. जयसिंगाबरोबरच दिलेरखान हा लढवय्या व कडवा पठाण सरदारही त्याने पाठविला. या दोघांनी, अगदी थोडक्या काळात, शिवाजीला जेर करून त्याला तह करण्यास भाग पाडले. आपल्या मुलुखातील २३ किल्ले व चार लाख होनांचा प्रदेश औरंगजेबाला देऊन, शिवाजीने हा लढा थांबविला. पुरंदरच्या या तहाने शिवाजीला आपल्या मुलाला–संभाजीला–मोंगलांच्या तैनातीला द्यावे लागले एवढेच नव्हे तर जयसिंगाच्या आग्रहाखातर, औरंगजेबाच्या भेटीसाठीही उत्तरेला जावे लागले. आग्रा येथे ही भेट झाली.

आग्र्याहून सुटका

आग्र्याच्या भेटीत औरंगजेबाने शिवाजीला वाईट वागणूक देऊन त्याचा अपमान केला. शिवाजीच्या मानी स्वभावाला हे सहन न झाल्यामुळे तो दरबारातून रागावून निघून गेला. लौकरच औरंगजेबाने त्याला कैद केले. संभाजीला घेऊन आपण येथे कोठून आलो असे शिवाजीला वाटले. परंतु त्याने या अटकेतूनही हुशारीने मार्ग काढला. प्रथम शिवाजीने दिल्ली दरबारच्या अनेक लोकांना पैसे व इतर भेटी देऊन वश करून घेतले. नंतर आजारीपणाचे सोंग घेऊन, त्याने साधुसंतांना, गोसावी-बैराग्यांना व फकीर-मौलवींना मेवामिठाई पाठविण्यास सुरुवात केली. ही मिठाई प्रथम शिवाजीकडे तुरुंगात येई व नंतर त्याच्या इच्छेप्रमाणे ती बाहेर वाटली जाई. मिठाई येत असता प्रथम त्याची कसून तपासणी होत असे. पुढे ही मिठाई व पेटारे येणे जाणे, रोजचेच झाल्यामुळे तपासणी हळूहळू सौम्य होत होत नंतर बंदच झाली. या परिस्थितीचा फायदा घेऊन, एके दिवशी तो व संभाजी पेटाऱ्यांतून निसटले. शिवाजी व त्याचे लोक गुप्तपणे एकत्र जमले व दक्षिणेकडे चौकशीसाठी स्वार जातील हे ओळखून उलट दिशेला मथुरेला गेले. तेथे एका ब्राह्मणाकडे संभाजीस ठेवून, गोसावी वेशाने त्रिस्थळी यात्रेच्या मार्गाने ते चालू लागले. मथुरेहून प्रयाग, काशी, गया, जगन्नाथपुरी, भागानगर (गोवळकोंडा) व विजापूर या मार्गाने राजगडास सुखरूप येऊन

पोचले.[२] वाटेत त्यांच्यावर अनेक संकटे आली. परंतु त्यांतून अत्यंत हुशारीने व सावधगिरीने त्याने मार्ग काढला. "शिवाजीची आग्र्याहून सुटका" ही एक अत्यंत रोमांचकारी घटना आहे. शिवाजी निसटून गेल्याने औरंगजेबाला फार दुःख झाले. त्याला वाटेत पकडण्यासाठी औरंगजेबाने जंग जंग पछाडले परंतु शिवाजीने बेमालूम त्याच्या हातावर तुरी दिल्या. परत आल्यावर शिवाजीने आपले गेलेले किल्ले व दिलेला मुलूख जिंकून घेतला.

शिवाजीचा राज्याभिषेक

विजापूर व दिल्ली या बादशाहांविरुद्ध लढून, विजय मिळवून, शिवाजीने स्वराज्य स्थापन केले, परंतु त्याला 'राजा' म्हणून मान्यता मिळेना. जवळपासचे लोक त्याला विजापूरकरांचा 'बंडखोर' जहागिरदार म्हणूनच संबोधित असत. त्याला वरिष्ठ मानून, त्याच्या आज्ञा ऐकण्यात बऱ्याच लोकांना कमीपणा वाटे. तेव्हां सर्वांच्या सल्ल्याने त्याने राज्याभिषेक करून घेण्याचे ठरविले. श्रीकाशीक्षेत्राच्या गागाभट्ट या अत्यंत विद्वान् पंडिताने यथाशास्त्र व यथाविधि अभिषेक करून त्याला 'छत्रपति' पद दिले. अनेक शतकांनंतर हिंदु समाजाला स्वतंत्र व सार्वभौम 'छत्रपति' मिळाला. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातच नव्हे तर अखिल हिंदुस्थानात आनंदाची एक लाट उसळून गेली. अपमानित व लाचारीचे जिणे संपून, हिंदुमात्राला आज मान ताठ करून जगणे शक्य आहे हे शिवाजीने सिद्ध करून दिले. राज्याभिषेकाचे वेळी शिवाजीने भरपूर दानधर्म केला व आपल्या राज्याची व्यवस्था नव्या पायावर उभारली.

राज्याभिषेकानंतर जुन्या परंपरेप्रमाणे शिवाजीने दिग्विजय करण्यासाठी बाहेर पडून, दूर कर्नाटकात बराच मुलूख जिंकून घेतला. आपल्या सावत्र भावाशी जुळवून घेऊन त्याच्याशी संबंध प्रस्थापित केला. जिंजी, वेलोरसारखा दूरचा दुर्गम प्रदेश ताब्यात घेऊन अडीअडचणीचे वेळी आपल्या मुलांना उपयोगी पडतील अशी अजिंक्य व संपन्न स्थळे मिळविली.

---

२ अलीकडे राजस्थानी कागदपत्रे प्रसिद्ध झाली आहेत. त्यात शिवाजीने परतीचा प्रवास नरवरच्या घाटाने केला असे वृत्त आहे. या माहितीस अद्याप दुजोरा मिळावयाचा आहे.

शिवाजीच्या दक्षिण दिग्विजयाने, त्याच्या हुशारीची, दूरदृष्टीची आपणांला काहीशी कल्पना येते. स्वराज्यप्राप्तीसाठी व रक्षणासाठी शिवाजीला अतोनात श्रम करावे लागले व सर्व आयुष्य झगडण्यात घालवावे लागले. सतत पडणारा हा ताण न सोसल्याने, त्याला काहीसा अकाली मृत्यु आला. ३ एप्रिल १६८० ला (चैत्र शुद्ध पौर्णिमा) त्याची प्राणज्योत मालवली व एक पराक्रमी व तेजस्वी व्यक्तिमत्त्व काळाने नजरेआड केले.

शिवरायाचा आठवावा प्रताप !

शिवाजीचे सर्व आयुष्य ५० वर्षांचे व त्यातील कर्तबगारीची वर्षे केवळ ३५ असूनही, त्याने मिळविलेले यश पाहून त्याच्या कर्तृत्वाविषयी आपल्या मनात अत्यंत आदर निर्माण होतो. अवमानित जीवन जगण्यात भूषण मानणाऱ्या व लाचारीत पिढ्यानुपिढ्या वाढलेल्या समाजाला त्याने स्वाभिमानाचा आदर्श निर्माण करून जागे केले व स्वातंत्र्याची महती पटवून दिली. "शिवाजी निर्माण झाला नसता तर हिंदुस्थान मुसलमानमय झाला असता," या वाक्यात भूषण कवीने त्याच्या कार्याचा गौरव केला आहे. क्षात्रतेज नष्ट होते असे वाटत असतानाच त्याने सर्व समाज कर्तृत्वाने जागा केला व आपल्या स्वराज्याच्या कामास गोवून टाकला. शिवाजीची सर्व माणसे, जिवाला जीव देणारी व त्याच्यावरून आपला जीव ओवाळून टाकणारी निघाली, एवढा विश्वास त्याने सर्वांच्या मनांत निर्माण केला. हिंदुस्थानात हिंदु धर्माचा कोणी वाली नाही अशी परिस्थिति निर्माण झाली असताना, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून विजय मिळवीत एक राष्ट्र त्याने निर्माण केले. त्याच्या राज्यात इतर धर्मीयांवर कधी अन्याय झाला नाही. सर्व धर्मीयांना समान लेखून, 'आदर्शराज्य' शिवाजीने निर्माण केले, हा त्याचा मोठेपणा इतिहासात, विशेषत: १७ व्या शतकाच्या इतिहासात अत्यंत उठून दिसतो.

शून्यांतून ब्रह्मांड निर्माण केले

शिवाजीची राज्यव्यवस्था व लष्करी शिस्त अत्यंत कडक होती. त्याने सर्व अधिकारी पगारी नेमिले व परंपरागत वतनदारी बंद करून टाकली; त्यामुळे कर्तृत्ववान् माणसांच्या गुणांना वाव मिळाला. त्याची लष्करी

शिस्त मोडणाऱ्यांना – विशेषतः स्त्रियांना व शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या सैनिकांस–तो देहान्त शासन देण्यासही मागेपुढे पाहात नसे. समाजाच्या सर्व थरांतील लोकांना मोठ्या कुशलतेने त्याने राष्ट्रकार्यात गुंतविले व समाज संरक्षणाची जबाबदारी त्याने वाटून टाकली. त्याच्या कर्तृत्वाने नवराष्ट्रवाद निर्माण झाला. शिवाजीच्या मृत्यूनंतर सतत पाव शतक प्रचंड शक्तिसामर्थ्यानिशी प्रयत्न करूनही औरंगजेबाला हे राज्य जिंकता आले नाही, यातच शिवाजीचे कार्य स्पष्ट होते. व्यक्ति व समाज, धर्म व राष्ट्र, यांच्या यथायोग्य निष्ठा निर्माण करून, त्या निष्ठा त्याने राष्ट्राच्या निर्मितीला, प्रगतीला, व संरक्षणाला, कायमच्या उपयोगी पडतील अशी त्यांची गुंफण करून ठेवली. शून्यातून ब्रह्मांड निर्माण करणारी अशी मोठी माणसे इतिहासात पुनःपुन्हा निर्माण होत नसतात. युगायुगातून असा एखादाच युगपुरुष निर्माण होत असतो. असा महापुरुष व युगपुरुष, महाराष्ट्राच्या–आपल्या–वाट्याला आला हे आपले महद्भाग्य !

* * *

१०

दौलताबाद

दौलताबादला जाण्यासाठी औरंगाबादहून एस्. टी. च्या बसमधून निघालो तसे मनात विचारांचे काहूर माजले. महाराष्ट्रातील सर्वांत बळकट पुरातन किल्ला म्हणून तर दौलताबादचे महत्त्व आहेच; पण दौलताबादच्या या परिसरामध्ये इतिहासकालात राजकारणाचे डावपेच सतत खेळले गेले. या किल्ल्याशी निगडित अशा पराक्रमी कथा आहेत. तशाच हृदयद्रावक कथांनाही वाण नाही. याच्याच आसपास वेरूळ, अजिंठ्याची लेणी असल्यामुळे या किल्ल्याच्या जवळ धर्मघोष निनादत असत. औरंगाबाद ते दौलताबाद हे अंतर ९ मैलांचेच आहे. औरंगाबाद शहराची तटबंदी सोडून बाहेर आल्यावर लगेच दौलताबादचा किल्ला दिसू लागतो. वळणे घेत घेत गाडी जसजशी दौलताबादनजीक येऊ लागते तसे मन इतिहासकालातील वातावरणातून अलीकडील वातावरणात येऊ लागते..

या किल्ल्याचे मूळचे नाव 'देवगिरी' किंवा 'देवगड' असे आहे. देवगिरीच्या यादव घराण्यातील भिल्लम या राजापासून या किल्ल्याविषयी ऐतिहासिक नोंदी सापडतात. मुसलमानांचे साम्राज्य नर्मदेच्या उत्तरेला सर्वत्र पसरले तरी या किल्ल्याने दक्षिण हिंदुस्थान त्या आक्रमणापासून सांभाळून धरला होता. जेव्हा हा किल्ला मुसलमानांनी जिंकला तेव्हापासून

प्रसिद्धि : 'वाङमयशोभा', पुणे. फेब्रुवारी १९६२.

दक्षिण हिंदुस्थानात मुसलमानांनी स्वैरसंचार सुरू केला. रामदेवराव यादव आणि त्याचा पराक्रमी मुलगा शंकरदेव हे इतिहासप्रसिद्धच आहेत. रामदेवरावांच्या कारकिर्दीत अल्लाउद्दिन खिलजी एकदम दौलताबादच्या तटाजवळ येऊन थडकला. "आपला चुलता दिल्लीचा बादशहा जलालुद्दिन खिलजी याच्याशी भांडून मी राजमहेंद्रीच्या राजाकडे चाकरीस जात आहे" अशी बतावणी वाटेने येताना त्याने केली. देवगिरीच्या पायथ्याशी तो आला, त्याच वेळी दुर्दैवाने पराक्रमी राजपुत्र शंकरदेव मोहिमेवर बाहेर निघून गेलेला होता. गडबडीत थोडेसे लोक जमा करून रामदेवरावाने आक्रमणाला तोंड देण्याचा प्रयत्न केला. पण त्याला किल्ल्याचा आसरा घ्यावा लागला. किल्ल्यात बेगमी करण्यासाठी धान्याची पोती वर नेली. पण चुकून ती मिठाचीच आहेत, असे मागाहून आढळून आले. आतली शिबंदी अशा स्थितीत जास्त टिकणेच शक्य नव्हते. तशातच "दिल्लीची प्रचंड फौज घेऊन माझा चुलता बादशहा मागोमाग येतोच आहे," अशी आवई अल्लाउद्दिनाने उठविली. घायकुतीला येऊन रामदेवरावाने भरपूर द्रव्य देऊन शेवटी त्याच्याशी तह केला. तो परत फिरणार तोच राजपुत्र शंकरदेव त्याला आडवा आला. घेतलेले सर्व द्रव्य परत दिल्याशिवाय पुढे जाऊ देणार नाही असे त्याने अल्लाउद्दिनाला निक्षून सांगितले. त्यामुळे निकराने लढाई करणे अल्लाउद्दिनाला भाग पडले. त्यात त्याचा बहुतेक पराभव होत आला असताना, शंकरदेवाच्या मदतीला किल्ल्यावरील सैन्य आले. पण मदतीऐवजी या सैन्याच्या येण्यामुळे शंकरदेवाच्या सैन्यात भलताच ग्रह झाला. मागाहून येणारे दिल्लीच्या बादशहाचे सैन्य ते हेच अशा समजुतीने व या सैन्यापुढे आपला निभाव लागणे शक्य नाही म्हणून शंकरदेवाचे सैन्य दशदिशा पळू लागले आणि विजयश्रीने अल्लाउद्दिनाला माळ घातली. विजयाने बेहोष होऊन अल्लाउद्दिनाने देवगिरीची सर्व दौलत लुटून नेली व यादवांना अपमानास्पद तह पत्करावा लागला. १२९४ सालच्या या घटनेनंतर दौलताबादेवर अल्लाउद्दिनचा सरदार मलिक काफूर याने अनेक स्वाऱ्या केल्या व १३१२ त शंकरदेवाला मारून यादव घराणे नष्ट करून किल्ला कायमचा आपल्या ताब्यात घेतला व मुसलमानांना दक्षिणेचा मार्ग मोकळा करून दिला. शंकरदेवाने गुजराथमधील अनहिल-

पट्टणच्या कर्णरायाच्या देवलदेवी या राजकन्येशी लग्न करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. पण कर्णरायाने आपण राजपूत व यादव मराठे म्हणून ही मागणी फेटाळून लावली होती. अल्लाउद्दिनाने अनहिलपट्टणच्या स्वारीत राजधानी उद्ध्वस्त करून व राणी कमलकुमारी हिला दिल्लीला नेऊन आपली पट्टराणी केली. पराभूत कर्णराय देवलदेवीसह शंकरदेवाच्या आश्रयास आला. कमलकुमारीने देवलदेवीला भेटीसाठी दक्षिणेतून आणण्याचा तगादा बादशहामागे लावला आणि मलीक काफूरचे सैन्य वेरूळजवळ असताना अचानक त्यांना ती राजकन्या हाती लागली. तिची त्याने उत्तरेत रवानगी केली. या सुकुमार राजकन्येच्या देहाचे नंतर जे धिडवडे निघाले तो एक इतिहासाचा हृदयद्रावक असा स्वतंत्र विषयच होईल. दौलताबादच्या जवळ येत असताना या सगळ्या आठवणींनी मन भरून येते. तो रामदेवराव, तो शंकरदेव, ती देवलदेवी किंवा दिल्लीचा तो मदांध अल्लाउद्दीन यांपैकी कोणीच आता जिवंत नाही. पण दौलताबादच्या या परिसरात डोळे मिटले असता हे सर्वजण आपल्याला स्पष्ट दिसतात.

किल्ला ज्यावर आहे ती देवगिरीची टेकडी सुळक्याप्रमाणे चौहोकडे सपाट जमीन आणि मध्ये निमुळती उंच अशी आहे. पायापासून टेकडीची उंची साधारणत: ७०० फूट भरेल. याच टेकडीच्या दोन बाजूंना पूर्वेला आणि दक्षिणेला यादवांच्या राजधानीचे जुने देवगिरी शहर बसले होते. आता झाडाझुडुपांच्यामधून पडलेले अवशेष पाहून त्याचा मागोवा घ्यावा लागतो. खालपासून वरपर्यंत संरक्षणासाठी किल्ल्याला भक्कम अशा तीन तटबंद्या असून बाहेरची पूर्वीच्या शहराची मोठी तटबंदी सोडल्यास महाकोट आणि कालाकोट अशा आणखी दोन तटबंद्या आत आहेत. बालेकिल्ला, खंदक व तटाची अजस्त्र भिंत हे काम दक्षिणेतील एक महान् पंडित हेमाद्रिपंत यांचे आहे. बाहेरच्या तटबंद्या दिल्लीचा बादशहा महंमद तुघ्लख ऊर्फ वेडा महंमद याने बांधल्या किंवा दुरुस्त केल्या असाव्यात. सर्वांत बाहेरचा शहराचा तट पावणेतीन मैलांचा आहे. आतल्या शहराचा आता विध्वंस झालेला असल्यामुळे बाहेरच्या तटाला खिंडारे व भगदाडे पडली आहेत हे पाहून आश्चर्य वाटत नाही. औरंगाबादच्या या परिसरात

अजंठा, वेरूळ यांसारखी कलाकुसरीची जगप्रसिद्ध ठिकाणं असल्यामुळे प्रवासी फार घाईने हा किल्ला पाहतो आणि यामुळे या किल्ल्याचे वैशिष्ट्य पुरतेपणी त्याच्या मनावर ठसत नाही.

खुल्या पटांगणातून एकातून एक अशा तीन मोठ्या प्रवेश द्वारांतून आत शिरावे लागते. या दरवाजांच्या सभोवती बुरूज असून त्यावर हत्ती, सिंह इत्यादि प्राण्यांच्या कोरीव आकृत्या पहाण्यासारख्या आहेत. दरवाजाच्या वर असलेल्या घुमटात वरच्या बाजूस कमळाच्या आकृति आहेत. या तटबंदीतून महाकोटाकडे जाताना अगणित अशा वास्तु पडलेल्या डोळ्यांना दिसतात. कोठे राजवाडा, कोठे मंदिर, कोठे सामान्य वाडा तर कोठे मशीद, कोठे दरगा तर कोठे समाधि यांची रेलचेल आढळते. हे सर्व जीर्ण, भग्न व अवशिष्ट अशा स्वरूपातच आहे. विषारी व हिंस्र प्राणी, उडणारे व लोंबकळणारे पक्षी यांनी आता या ठिकाणी आपला मुक्काम ठोकला आहे. या सर्वांची माहिती करून घेणे असल्यास किल्ल्यावर चातुर्मास वस्ती करून रहावे लागेल. तरी माहिती मिळेल का ? इतिहासाला, वाटाड्याला व जवळपासच्या रहिवाशांनाही अपरिचित असणाऱ्या वा वास्तू प्रवाशाला थोडीच आपली माहिती करून देणार आहेत ? हं ! तो जर मांत्रिक असला किंवा दगडास बोलावयास लावणारा चिकट इतिहास संशोधक असला तर त्यांची थोडी माहिती त्याला होईलही ! पण अजून या वास्तू अशा संशोधकाची वाट पहात शेवटच्या अवस्थेत पायाच्या रूपाने उभ्या आहेत.

महाकोटाच्या शेवटच्या दरवाजाजवळ उजव्या बाजूला भवानीचे एक जीर्ण मंदिर आहे. विस्तीर्ण मोकळे पटांगण. आजूबाजूला पडलेले अजस्र कोरीव दगड व भग्न दीपमाळा यांमुळेच केवळ याला भवानीचे मंदिर म्हणावयाचे. एरवी आत भवानीही नाही व त्यामुळे षोडशोपचाराची पूजाही नाही. भवानीच्या या मंदिराने अवस्थांतर केले असले तरी समोरचा पीरकादुसाहेबांचा दर्गा व्यवस्थित व स्वच्छ आहे. भग्न मंदिराजवळ सुव्यवस्थित दर्गा किंवा मशिद ही मुसलमानांनी भारताला दिलेली देणगी, सर्व हिंदुस्थानात कोठेही जा, तुम्हांला पहावयास मिळेल. याजवळच १०० फूट चौकोनी, ४० फूट खोल अशी घडीव दगडांनी बांधलेली प्रचंड विहीर

व त्याहून मोठा चिरेबंदी तलाव आपल्या भव्यतेने आदर व आश्चर्य निर्माण करतात.

जवळच उजव्या बाजूकडे पाहिले असताना एक सुरेख, सुंदर, उत्तुंग व भव्य असा मीनार आपले लक्ष वेधून घेतो. बहामनी राजघराण्यातील पांचवा सुलतान अल्लाउद्दिन अहमदशाँ याने हा मीनार बांधलेला आहे. १४३५ साली दौलताबाद काबीज केल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी त्याने हा विजयस्तंभ ऊर्फ चांदमीनार बांधला आहे. याचा परिघ ७० फूट असून उंची सुमारे २०० फूट असावी. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या कारागिरीचे वैशिष्ट्य व दक्षिणेतील मुसलमानांची सर्वोत्तम कारागिरी या दृष्टीने हा मीनार प्रवाशांना थोडा वेळ थांबवून घेतोच. मात्र या मीनारावरून दिसणाऱ्या देखाव्यापेक्षा किल्ल्याच्या शिखरावरून दिसणारा देखावा अधिक चांगला व विस्तीर्ण असल्यामुळे प्रवाशाने वेळ नसल्यास पुढे चलावे.

मीनाराच्या डाव्या बाजूस एक पडके परंतु अजूनही भव्य दिसणारे मंदिर आहे. या मंदिराला १५२ खांब असून प्रेक्षकाला ते पाहून थोडे भांबावल्यासारखे होते. दौलताबादच्या किल्ल्याप्रमाणेच कालपुरुषाचे अनेक तडाखे या मंदिराने खाल्ले आहेत. दक्षिणेकडे जैनांची राज्ये असताना या ठिकाणी जैनांचे मंदिर होते. पुढच्या काळात या मंदिराचे रूपांतर कालिमातेच्या मंदिरात झाले. थोडी उलटापालट करून मूर्ति फेकून देऊन आणि पश्चिमेकडे ओटा घालून मुसलमानांनी त्याची मशिद बनवली. पण काळ पालटला. निजामावरील पोलीस कारवाईच्या वेळी हिंदूंनी भारतमातेची एक सुंदर मूर्ति येथे बसवून आता याचे भारतमाता मंदिर बनविले आहे. मंदिराची मशिद करणाऱ्या महंमद तघलकाच्या आत्म्याला हे रूपांतर पाहून काय वाटले असेल ते असो; पण मशिदीचे मंदिरात अभावानेच होणारे रूपांतर पाहून हिंदु प्रवाशाच्या मनाला आनंद झाल्यावाचून रहाणार नाही.

चौथ्या दरवाजापासून कालाकोट या नावाने प्रसिद्ध असलेली संरक्षणाची नवीन तटबंदी सुरू होते. उजव्या बाजूला असलेला एक प्रचंड दगडी रांजण आपले लक्ष वेधून घेतो. पाणी गार रहाण्यासाठी मातीचे रांजण सर्वत्रच वापरतात. पण दगडी रांजण कोरणारा हेमाद्रिपंत धन्य होय.

येथून पुढचे तीन दरवाजे जवळजवळ असूनही मोठे भव्य आहेत. या दरवाजावरील कमानी व पडक्या इमारती ही कारागिरी हिंदु पद्धतीची आहे हे स्पष्ट करतात. डाव्या बाजूचा एक हिंदु राजाचा पडका राजवाडा फारसा प्रेक्षणीय नसला तरी आठव्या दरवाजाजवळील उजव्या बाजूला असलेला भग्न चिनी महाल आपले लक्ष वेधून घेतो. हा महाल आज पडला आहे. आणि फक्त समोरच्या दरवाजाची कमान व भिंत उभी आहे. पूर्वी हा महाल तीन मजली व सुंदर बांधणीचा असून त्यावर सर्वत्र निळे, पिवळे, पांढरे आणि विविधरंगी चिनी फरशांचे तुकडे भिंतीत बसविले होते. हा चिनी महाल शहाजहानने बांधला असे म्हणतात. ताजमहाल बांधल्यावर तेथील सुंदर फरशांचे तुकडे वाया जाऊ नयेत म्हणून तर याने हा चिनी महाल बांधला नसेल? पण ताजमहाल तर शुद्ध पांढऱ्या संगमरवरी दगडांचा आहे. औरंगजेबाने गोवळकोंड्याच्या बादशाहीचा नाश केल्यानंतर शेवटचा कुतुबशहा सुलतान तानशहा याला चिनी महालात कोंडून ठेवले होते. कैदी म्हणून का होईना सुलतान आणि नबाब, सरदार आणि राजे यांचे वास्तव्य या महालाला लाभले. आज मात्र पाकोळ्या आणि तत्सम प्राणी यांचा सहवास या महालाला पत्करणे भाग आहे.

या चिनी महालाजवळ आणि कोणी म्हणतात, आत पूर्वी प्रचंड दारूगोळ्याचे कोठार होते. वरच्याच बाजूस एका बुरुजावर एक प्रचंड तोफ आजही आपणांला दिसेल. १८ फूट लांबीची ही तोफ औरंगजेबाने तयार करवून येथे आणली. तोफेच्या तोंडाला मेंढ्याचे तोंड असल्यामुळे या तोफेला 'मेंढा तोफ' असे म्हणतात. धर्मनिष्ठ औरंगजेबाने "अल्ला हिचे रक्षण करो व आम्हांला यश देवो" असा पर्शियन लेख या तोफेवर कोरला आहे. औरंगजेब जिवंत होऊन आज जर येथे आला तर अल्लाने दिलेले यश त्याला दिसेल. मात्र परमेश्वराने हिचे अजूनही रक्षण केले आहे हे मात्र खरे.

येथून पुढे खंदकावरून प्रमुख किल्ल्यात जाण्याचा पूल आहे. पूल सुरू होण्यापूर्वी डाव्या बाजूला एक जुना राजवाडा अजूनही शोभा देतो. हा राजवाडा देवगिरीचे प्रमुख यादव यांचा आहे, अजून टिकून असलेले लाकडावरील काम, भव्य तुळया आणि विविध दालने पाहून मनाला

समाधान वाटते. युद्धाच्या वेळी गोळागोळी सुरू झाल्यानंतर राणीवंशातील स्त्रियांना लपण्यासाठी राजवाडयाच्या खालच्या बाजूस एक जागा आहे. येणारे आणि जाणारे सर्व अग्निगोलक येथून दिसतील पण अंगावर मात्र एकही येणार नाही अशी ही खुबीची जागा आहे. आलेले अग्निगोल पचविण्यासाठी प्रचंड व खोल खंदक जवळच आहे, आज कोणीही प्रवासी हा सगळा चमत्कार मोकळेपणाने पाहू शकतो. पण आपण जर रामदेव-रावाच्या काळात असतो तर! तर काय? दरवाजा पाहूनच आपणाला समाधान मानावे लागले असते.

राजवाडयापासून वर जाताना आपणाला खंदकाच्यावर असलेल्या पुलावरून जावे लागते. हा पूल बालेकिल्ल्यात किंवा किल्ल्याच्या मुख्य भागात जाण्यासाठी एकुलता एक असा रस्ता आहे. पुलावरून गेल्यावर प्रथम–पण नंतरची माहिती कशाला? या किल्ल्याचे खरे आश्चर्य तुम्हांला खंदकावरील या पुलावरूनच पहावयाला मिळेल. खंदकाचे वर जवळ जवळ २५० फूट तट पाषाण छिन्नीने कोरून तयार केला आहे. पुलावरून या तटाकडे पाहिले असता गुळगुळीत अशा या पाषाणावर माणसाला तर सोडाच पण मुंगीला किंवा मुंगळयालादेखील जाता येणे शक्य वाटत नाही. हेमाडपंताने या पाषाणाची परीक्षा करून असा २५० फुटांचा हा दगडाचा तट तयार केला. तटाच्या पायथ्याशी पाण्याने भरलेला खंदक असून तोही सुमारे १०० फूट खोल आहे. या तटाकडे पाहिले असताना "धन्य धन्य तुझी" असेच उद्‌गार कोणीही हेमाडपंताविषयी काढील. कोणी म्हणतात जवळच्या वेरुळचे कैलास लेणे वरून खाली अशा पद्धतीने ज्या कारागिरांनी कोरले त्यांचीच ही कामगिरी असावी. कर्ता करविता कोणी का असेना, पण हा तट बाराव्या शतकामध्ये दुर्लंध्य असा होता हे निश्चित.

पुलावरून गेल्यानंतर एका छोटया प्रवेशद्वारातून आत जावे लागते. हातात नागवी तलवार घेतलेला एक दमदार शिपाई या ठिकाणी शत्रूंच्या शेकडों सैनिकांना थोपवू शकेल अशी ही मोक्याची जागा आहे. इथून पुढचा वर जाण्याचा रस्ता पाषाण खोदून तयार केला आहे. पण या किल्ल्यावरील आणखी एक वैशिष्टय पुढेच आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी येथून पुढचा रस्ता पाषाण कोरून भुयारी असा तयार केला आहे. या भुयारी रस्त्यातून साधारण एकच

माणूस एका वेळी जाऊ शकेल इतका तो अरुंद आहे. पण भुयार असले तरी मशालीच्या उजेडात तुम्हाला छोटीशी देवडी दिसेल या देवडीत पाषाणाचे घोटीव खांब आहेत. डाव्या बाजूला शत्रूवर हल्ला करण्यास उभे राहण्यासाठी पहारेकऱ्यांना जागा आहेत. चढउतार करीत एका छोट्याशा विवरातून तुम्हाला पाषाणातून कोरलेल्या पायऱ्यांवरून वर जावे लागेल. पण वर गेल्यानंतर सरक्षणाची आणखी एक तरतूद तुम्हांला मुग्ध करील. हा वर जाण्याचा रस्ता प्रचंड, जाड आणि अजस्त्र अशा लोखंडी तव्याने बंद करण्याची तरतूद आहे. शत्रू येथपर्यंत जर आला तर वरच्या एकदोन लोकांना हा तवा सरकवून रस्ता बंद करता येईल पण तो अशा खुबीने भिंतीत बसतो की शेकडो लोकांनी खालून ढकलले तरी तो हलणार नाही. हा तवा कोणी केला ? वर कसा आणला ? ही योजकता आणि बुद्धिचातुर्य कोणाचे ? हे इतिहासज्ञही सांगू शकणार नाहीत; पण आमच्याबरोबर असणाऱ्या वाटाड्याने हा हेमाडपंतानेच तयार केला असून किल्ल्याच्या वर तयार करून नंतर जागा खोदून तेथे ठेवला असे सांगितले. पण तव्याचा हेतु रस्ता बंद करणे एवढाच नाही. तव्यावर प्रचंड लाकडाचे ओंडके टाकून जाळ व धूर करावयाचा आणि तव्याला ठेवलेल्या भोकातून हा धूर भुयारात गेल्यानंतर गुदमरलेल्या लोकांना परत पळवून लावावयाचे अशीही सोय यात आहे. धुराने गुदमरलेल्या लोकांना फसवून, आलेल्या रस्त्याने परत जाऊ देण्याऐवजी खंदकाकडे जाणाऱ्या रस्त्याने त्यांनी जावे आणि निमुळत्या टोकाने एकदम खाली पडावे अशीही सोय परतीच्या रस्त्यावर या भुयारात आहे. अशा रस्त्यांना " भुलभुलावणीची जागा " असे म्हणतात. वर रस्ता बंद नसताना, तव्यावर विस्तव पेटलेला नसताना, धुराचा अभाव असूनही आमच्यासारख्या प्रवाशांना हाच खरा रस्ता आहे असे वाटले मग घाबरून पळणाऱ्या सैनिकाना खंदकात जलसमाधि मिळत असेल हे सांगायलाच नको. आता मात्र कडेच्या बाजूला सिमेंटची भिंत बांधून कोणी खाली पडू नये अशी व्यवस्था केली आहे.

भुयारातून वर गेल्यानंतर गणपति मंदिर लागते. पूर्वी या ठिकाणी फकीर सुलतानाचा दर्गा होता. कोणता सुलतान फकीर झाला कोणास माहीत ? पण हा दर्गा पूर्वीचे देवीचे मंदिर पाडून तयार केला असावा असें वाटते. या ठिकाणी नवसाच्या फिरकीवर आकड्यात मान अडकवून आणि फेरी घेऊन

लोक नवस फेडीत असत. या मंदिराच्या उजव्या बाजूला 'कवडी झरना' म्हणून एक झरा छोटासा पाषाण खोदून तयार केलेला आहे. एवढा प्रचंड पाषाणी तट आणि १५० फूट पाषाणातून भुयार कोरणाऱ्या लोकांना हा झरा पाषाणात कोरणे म्हणजे एक खेळच म्हणावयाचा. तिथून थोड्या अंतरावर 'हत्ती तलाव' म्हणून आणखी एक पाण्याचा हौद आढळतो. इतक्या उंचीवर इतके मुबलक पाणी कसे मिळते हे आश्चर्यच होय.

फकीर सुलतानाच्या दर्ग्यावरून खडी चढण चढल्यानंतर 'बारा दरी' म्हणून एक इमारत लागते. इमारत अष्टकोनाकृति असून आत बारा कमानी, शेजारी मोकळे व्हरांडे व खिडक्या आणि वर गॅलऱ्या इतके यात आहे. चौकाच्या मध्यभागात एक दगडी ओटा असून ती औरंगजेबाची गादी म्हणून पूर्वी वापरली जात होती. चढण्याच्या श्रमामुळे कंटाळा येऊन औरंगजेबाच्या गादीवर आम्ही बसलो. कवडी झऱ्यातून गार पाणी आणून वाटसरूंना देऊन चार पैसे मिळविणारे लोक सध्या येथे आहेत. हे पाणी आम्हांला अतिशय गार व गोड वाटले आणि सर्व श्रम परिहार झाला. शहाजहान आणि औरंगजेब उन्हाळ्यामध्ये कधीकधी या 'बारा दरीत' येऊन रहात असत. दख्खनचा सुभेदार असताना औरंगजेबाचे हे अत्यंत आवडते ठिकाण होते.

बारादरीच्या पुढे किल्ल्यावरील सर्वांत शेवटची व सर्वांत उंच अशी टेकडी आहे. ३०० फूट परिघाच्या या टेकडीसभोवती भिंत व बुरूज बांधलेले आहेत. टेकडीवर 'श्री दुर्गा तोफ' अद्यापही पहावयास मिळते. उत्तराभिमुख असणाऱ्या या तोफेवर "मंगलजी किसनराम सामजी या गुजराथी गृहस्थाने ही ओतली" असे लिहिले आहे. या तोफेच्यावर पांच दहा पायऱ्या चढल्यावर छोटाच पण निशाण रोवण्याचा बुरूज आहे. हा बुरूज या किल्यावरील सर्वांत उंच आहे. यावर उभे राहून चारी बाजूस दृष्टि टाकली असता कालपुरुषाने इतिहासात निर्माण केलेले पट आपल्याला दिसतात. खालचा सपाट असा प्रदेश आणि एकाहून एक मजबूत आणि अभेद्य अशा तटबंदी येथून दृष्टीस पडतात. बहामनी सुलतानाने उभारलेला चांदमीनार अगदी खुजा वाटतो. यादवांच्या जुन्या देवगिरीचे दर्शन येथून होते. तसेच वेड्या महंमदाने बांधलेल्या दौलताबाद शहराचेही दर्शन येथून होते. दक्षिण देश दूरच्या दिल्लीहून सांभाळण्याला कठीण आणि उत्तम हवामान व समृद्धि

असलेला देवगिरीचा हा भाग राजधानी करण्यास योग्य आहे, असा निर्णय महंमदाने घेतला होता. पण राजधानी तयार करावयाची त्याची कल्पना मात्र अद्‍भुत होती. एके दिवशी दिल्लीच्या सर्व नागरिकांना सामानसुमान व जनावरे यांसह देवगिरीकडे चलण्याचा त्याने हुकूम दिला. कोणीही तेथे राहू नये म्हणून सैनिकांकडून आजारी, अपंग आणि म्हातारी माणसे यांनाही त्याने सक्तीने बाहेर काढले. दिल्ली ते देवगिरी या ७०० मैल अंतरात अक्षरश: हजारो माणसे मृत्युमुखी पडली. पण सुलतानाने आपला आग्रह कायमच ठेवला. देवगिरीला आल्यावर त्याच्यापुढे एक विलक्षण पेच पडला. लाखो लोकाना बळाने आणले खरे पण त्यांनी रहावे कोठे ? देवगिरीचे दौलताबाद झाले म्हणून इमारती आपोआप थोड्याच तयार होणार ? इमारतीचे बांधकाम "तहान लागल्यावर आड" या न्यायाने सुरू झाले. हे सर्व होत असताना राहिलेल्यापैकी अनेकजण पैगंबरवासी झाले. राजधानी बदलण्याचा हा उपक्रम चुकला हे लक्षात आल्यावर राहिलेल्या सगळ्या लोकांना त्याने पुन्हा दिल्ली-कडे जाण्याचा हुकूम दिला. पुन्हा तोच ७०० मैलांचा प्रवास आणि तोच तोच छळ आणि परत गेलेल्या लोकांना दिल्लीत काय आढळले ? वस्तीअभावी इमारतीमधून हिंस्र श्वापदे, वन्य जनावरे आणि पशुपक्षी यांनी त्या जागा भूषविल्या होत्या. या बुरुजावरून खाली दृष्टि टाकली असता वेड्या महंमदाचा शहाणपणा आपणांला दिसतो. येथून दौलताबादच्या परिसरातील सर्व इतिहास डोळ्यापुढे उभा रहात असला तरी तुफानी वाऱ्यामुळे डोके गरगरायला लागते आणि नाईलाजाने खाली उतरावे लागते.

खाली उतरत असताना तोफेच्या खालच्या बाजूस अंधारातून आणखी एक भुयार लागते. या भुयारात जनार्दनस्वामींची समाधि आहे. हे स्वामी मूळचे खानदेशातील चाळीसगावचे. निजामशहाच्या पदरी दौलताबादचे किल्लेदार म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम केले. पण यावनी बादशहाची चाकरी करण्याचा कंटाळा येऊन त्यांनी किल्ल्या दुसऱ्याच्या स्वाधीन केल्या व तेथून खाली जाणाऱ्या एका गुंफेत ते अदृश्य झाले. याच ठिकाणी स्वामींना दत्तगुरूंचा अनुग्रह झाला होता असा समज आहे. अनुग्रहाच्या समाधानात स्वामींनी खाली जाणाऱ्या गुंफेत कोठेतरी समाधि घेतली असावी असे वाटते. मात्र अशिरगड आणि येथे काही विशिष्ट दिवशी रात्रीचे वेळी स्वामी दुरून

दिसतात असे भावडेपणाने सांगणारे लोकही आहेत. पैठणचे महान् सुधारक व साहित्यिक एकनाथस्वामी यांनी जनार्दनस्वामींना गुरु केले असल्यामुळे स्वामींना भेटण्यास ते नेहमी येथे येत असत.

या भुयाराच्या जवळच आणखी एक दारूगोळ्याचे कोठार आहे. आणि कोठारातील एका हौदात पूर्वीच्या काळचे तूप आहे, तंबाखू आहे, विविध आकारांच्या तोफांच्या गोळ्यांचे भांडार आहे असे समजले. पण इतके पाहून झाल्यावर मन आणि शरीर थकते, पाहाण्याचा उत्साह मावळतो आणि परतीकडे प्रवाशाचा ओढा लागतो. दौलताबादला काय पहावे यापेक्षा किती पहावे, असा प्रश्न विचारणे अधिक चांगले. येथे इतिहास आहे, येथे भूगोल आहे, येथे विलास आहे, येथे संन्यास आहे, येथे पराक्रम आहे, येथे क्रूरता आहे, येथे नवरस उत्पन्न करणारे काव्य आहे. मात्र ऐकणारा आणि पाहणारा, समजावून घेणारा आणि समजावून देणारा पाहिजे !

"माझे मित्र प्रा. दिगंबर केशव देशपांडे यांचा व माझा परिचय सुमारें दोन तपांचा आहे. कांहीं वर्षें त्यांनीं प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्या मार्गदर्शनाखालीं इतिहासाचा विशेष अभ्यास केला. व्यवसाया-निमित्त पुणे सोडून अमळनेरला गेल्यावर हाताशीं अवश्य असा ग्रंथसंग्रह नसतांहि त्यांनीं अभ्यासांत खंड पडू दिला नाहीं. आपल्या इतिहासा-भ्यासाचें फलित आत्मानंदापुरतें मर्यादित न ठेवतां ग्रंथरूपानें व लेखरूपानें जनतेपुढें मांडले. प्रा. देशपांडे यांनीं आतापर्यंत एक पुस्तक व सुमारें ७५ लेख प्रसिद्ध केले आहेत. यांतील बहुतेक लेख मराठ्यांचा इतिहास व चालू आंतरराष्ट्रीय राजकारण यांवर लिहिलेले असून ते त्या त्या वेळीं अद्ययावत् व अतिशय उद्बोधक ठरले होते.

यांपैकीं अगदी थोडे लेख या अत्यंत महागाईच्या काळांत प्रस्तुत पुस्तकांत प्रकाशित केले आहेत. त्यांचें वैशिष्ट्य हें आहे कीं हे लेख केवळ पुनर्मुद्रण या स्वरुपाचें नाहींत. ते अद्ययावत् करण्याकरितां आव-श्यक त्या सर्व ठिकाणीं त्यांनीं भर घातली आहे. या पुस्तकांतील प्रत्येक लेख मी बारकाईनें वाचून पाहिला आहे. सर्व लेख त्यांच्या खोल व्यासंगाला साजेसे असे आहेत. प्रा. देशपांडे यांची भाषा रसाळ व ओघवती असून ती वाचकांच्या मनाची पक्कड घेईल अशी आहे. हें पुस्तक प्रत्येकास संग्राह्य असेंच वाटेल असा माझा पक्का विश्वास आहे."

प्रा. ग. ह. खरे
भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

महाराष्ट्र प्रोत्सेजक संस्था, पुणें
(डे. व्ह. प्रा. सोसायटी, पुणें)
११३३, सदाशिव पेठ, पुणें ३०